# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन अपद्वारे)

**सभा क्रं. - २४** **दि.१६/१२/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. १६/१२/२०२० बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सोनवणे भारती कैलास, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| खडके सुनिल वामनराव, उपमहापौर | पाटील चंद्रशेखर शिवाजी | सोनार रंजना विजय |
| जोहरे प्रिया मधुकर | कापसे मयुर चंद्रकांत | खडके विश्वनाथ सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | देशमुख प्रतिभा गजानन | भंगाळे विष्णु रामदास |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे प्रतिभा चंद्रकांत | सोनवणे राखी शामकांत |
| सोनवणे कांचन विकास | पाटील विजय पुंडलिक | तायडे ज्योती शरद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | सोनवणे सुरेश माणिक | लढढा नितीन बालमुकुंद |
| शिंदे गायत्री उत्तम | बारी शोभा दिनकर | चौधरी मनोज सुरेश |
| बाविस्कर किशोर रमेश | शेख हसीनाबी शरिफ | बरडे नितीन मनोहर |
| सपकाळे मिना धुडकु | भिल पार्वताबाई दामु | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | शेख शबानाबी सादीक |
| सपकाळे रंजना भरत | कोल्हे सिंधु विजय | नाईक प्रशांत सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | कोल्हे ललित विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| चौधरी चेतना किशोर | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| सोनवणे मुकुंदा भागवत | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| काळे अमित पांडुरंग | तायडे सुरेखा नितीन | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| चौधरी मंगला संजय | चव्हाण ज्योती बाळासाहेब | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | मराठे जितेंद्र भगवान | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | **स्विकृत सदस्य** |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम | सोनवणे कैलास नारायण |
| काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील राजेंद्र झिपरु | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील सचिन भिमराव | अत्तरदे रजनी प्रकाश | चौधरी महेश रतन |
| भोईटे लताबाई रणजीत | आहुजा मनोज नारायणदास | जैन भागचंद मोतीलाल |
| पाटील प्रतिभा सुधीर | पाटील मिनाक्षी गोकुळ | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी,उपायुक्त श्री.किरण देशमुख, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे, सहा.आयुक्त श्री.पवन पाटील व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्या शेख सैईदा युसुफ तसेच सन्मा .सदस्य श्री.सनकत चेतन गणेश, श्री. पाटील कुलभुषण विरभान यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३१८ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दांजलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सोनवणे भारती कैलास,<br>मा.महापौर | १)मनपा सन्मा. सदस्या, सौ. रेश्माताई कुंदन काळे यांचे सासरे स्व.मधुकर तुकाराम काळे, २)मनपा सन्मा. सदस्य,श्री. प्रशांत सुरेश नाईक यांच्या मातोश्री स्व.सुभद्राताई सुरेश नाईक, ३)मनपा सन्मा.सदस्या,श्रीमती सरिताताई नेरकर यांच्या आई स्व. सुमनबाई सुभाष पाटील, ४)मनपा माजी सन्मा.सदस्य,स्व.लिलाधर सरोदे, ५)शहरातील प्रसिध्द उदयोगपती स्व.नरेश खंडेलवाल, ६)मनपा कर्मचारी श्री.नितीन पटवे यांचे बंधु स्व.विवेक पटवे, ७)शहरातील प्रतिष्ठीत सराफ व्यापारी तथा शाकाहाराचे प्रणेते स्व.रतनलालजी बाफना, ८)मनपा कर्मचारी रविंद्र मुळे यांच्या पत्नी स्व.मिना मुळे, ९)प्रभाग समिती सदस्य,श्री रमाकांत पाटील यांच्या मातोश्री स्व.यमुनाबाई पाटील, १०)प्रभाग समिती सदस्य, श्री.मनोज रमेश भांडारकर यांचे वडील स्व.रमेश गोविंदा भांडारकर यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | खडके सुनिल वामनराव<br>मा.उपमहापौर | १)माजी नगरसेवक स्व.लिलाधर नथ्थु सरोदे, २)पोलादी पुरुष अशी ख्याती असलेले देशाचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्मृति दिनानिमित्त, ३) सन्मा.सदस्या, सौ.रेश्मा कुंदन काळे यांचे सासरे स्व.मधुकर तुकाराम काळे, ४)यापुर्वी मनपा पॅनलवर कार्यरत राहीलेले श्री.आनंदा सरोदे यांचे वडील स्व.रामचंद्र देवाजी सरोदे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | महाजन सुनिल सुपडू<br>मा.विरोधी पक्षनेता | पाटील वाडा मेहरुण,जळगांव येथिल रहिवासी स्व. सुहास प्रकाश कोल्हे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | भिल पार्वताबाई दामु | सन्मा.सदस्या,सौ.भिल पार्वताबाई दामु यांचे पुतणे स्व.ईश्वर जुलाल भिल यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | भंगाळे विष्णु रामदास | विठ्ठल पेठ, जुने जळगांव येथिल रहिवासी माजी नगराध्यक्षा, गं.भा.मिनाक्षी सरोदे यांचे पती माजी नगरसेवक स्व.लिलाधर नथ्थु सरोदे, २) जुने जळगांव येथिल नगरसेविका रेश्मा कुंदन काळे यांचे सासरे, श्री.कुंदन काळे यांचे वडील तसेच माजी नगरसेविका |

| | | |
|---|---|---|
| | | शालिनी काळे यांचे पती स्व.मधुकर तुकाराम काळे, ३)योगेश्वर नगर,जळगांव येथिल माजी नगरसेवक स्व.यशवंत रघुनाथ खडके यांच्या पत्नी व प्रमोद व प्रविण खडके यांच्या मातोश्री स्व.इंदुमती यशवंत खडके, ४) जिल्हापेठ येथिल इंजिनिअर शंभु सोनवणे व सुनिल सोनवणे यांचे वडील स्व.जी.आर.सोनवणे यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३१९ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सोनवणे भारती कैलास<br>मा.महापौर | १) जळगांव शहर महानगरपालिका सन्मा.सदस्य, प्रा.डॉ.श्री.सचिन भिमराव पाटील यांना राजस्थान मेवाड युनिर्व्हसिटीतर्फे यंत्र अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या अभियांत्रिकीत पी.एच.डी पदवी प्रदान करण्यात आलेली आहे त्यामुळे शहराचे व मनपाचे नांव लौंकिक झालेले आहे करीता त्यांचे हार्दीक अभिनंदन.<br>२) जळगांव शहर महानगरपालिका नगरसचिव विभागाकडील संगणक चालक श्री.प्रकाश गिरधर सपकाळे यांनी दि.४ ते ७ डिसेंबर २०२० रोजी अमरावती येथे संपन्न झालेल्या वर्ल्ड पॉवरलिफ्टींग स्पर्धेत प्रथम क्रमांकाने सुवर्ण पदक मिळवून शहराचे व मनपाचे नांव लौंकिक केलेबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. |
| २. | भंगाळे विष्णु रामदास | १) मा.श्री.सुनिल वामनराव खडके यांची जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव उपमहापौर पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन.<br>२) मा.श्री.नयन राणे जळगांव जिल्हा बॉक्सिंग समीती उपसचिव पदी निवडीबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, आमच्या सन्मा.सदस्या सौ.दिपमालाताई काळे यांनी त्यांच्या प्रभागातल्या अतिक्रमण संदर्भात काही मोर्चा महानगरपालिकेत आणलेला आहे. अस कळलेल आहे. या संदर्भात काय चर्चा झालेली आहे प्रशासनाची, सगळया सदस्यांना हे जाणुन घ्यायला हवे महापौर महोदया, आमचे सन्मा.सदस्या

सौ.दिपमाला काळे हे वर्षभरापासुन ज्या विषयाचा पाठपुरावा घेत आहे. त्या संदर्भात आज या प्रभागातले नागरीक आणि नगरसेवकांना येथे याव लागलेल आहे. या संदर्भात प्रशासनाने काय भुमिका घेतलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**मा.महापौर :-** बोला, बोला,

**श्री.कैलास सोनवणे :-** मिटींग संपल्यानंतर महापौरांच्या दालनात आयुक्त साहेब जे काही गोष्टी असतील ते बोलणार आहेत. तर मी विनंती करतो की, अजेंडयावरचे विषय सुरु करावे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, मला एक मिनीट बालायचे आहे. मला परवानगी मिळावी.

**मा.महापौर :-** बोला ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, जेव्हा कोणी महिला सदस्या किंवा नगरसेवक असतो ते त्या प्रभागातील २० ते २५ हजार जनतेचे प्रतिनिधी म्हणुन काम करत असतो. एखाद्या विषयासंदर्भात नगरसेविकेला वर्ष वर्ष पाठपुरावा करावा लागत. तरी ही तो विषय मार्गी लागत नाही. आणि अस काय आहे त्या विषयात की, सगळयांसमोर प्रशासन काही बोलु शकत नाही. अस काही नाही त्या विषयात. महापौर महोदया माझी आजही मागणी आहे प्रशासनाकडे की, या विषयाचा सोक्षमोक्ष आताच लागला पाहिजे याच वेगळ धोरण का ? प्रशासनाकडुन एखादी नगरसेविका पाठपुरावा करीत आहे. आणि मिटींगच्या दिवशी तुम्ही म्हणत आहात की, आपण सगळया समोर बोलु शकत नाही तर अश्या कोणत्या गोष्टी आहे. सगळयांसमोर येऊ द्या ना त्या गोष्टी. अतिक्रमण काढण्या संदर्भात ती नगरसेविका पुढाकार घेत आहे.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बोला ताई.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ, मिटींग झाल्यानंतर आपण बैठक घेतलेली आहे आपल्या हॉल मध्ये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** याचा निपटारा होऊ शकतो महापौर महोदया, हे फक्त वेळ घालु धोरण आहे. महापौर महोदया, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण स्वत: प्रशासनाला धारेवर घेतले पाहिजे या विषयासंदर्भात. प्रशासन फक्त दिशाभुल करत आहे. वर्ष भरापासुन फक्त टोलवा टोलवी या विषयाची सुरु आहे.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ, शुचितातार्इ,

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आम्हाला बोलण्याची संधी मिळावी.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ, मिटींगच्यानंतर ठेऊ ना आपण हा विषय.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आम्हाला बोलण्याची संधी मिळावी.

**मा.महापौर :-** बोला विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आता ज्या बाबतीत काळे ताई बसलेले आहे आणि अप्पा साहेबांनी सांगितल. त्याच्यावरती आपण निर्णय घेणार आहोत. परंतु नक्की हे परत पुन्हा लेट नाही झाल पाहिजे.पुर्ण जळगांव शहराच्या ट्रॅफिकचा विषय आहे. आम्ही पाठिंबा देतो त्यांना. आम्ही शिवसेनेतर्फे पाठिंबा देतो.

**मा.महापौर :-** नक्की विष्णु भाऊ.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** या विषयावर आपण कोणीही काही बोलु नका. मिटींग झाल्यावर या विषयावर परिपुर्ण लक्ष देणार आहोत आणि ते लवकरात लवकर करणार आहे आपण.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चालेल, चालेल, महापौर महोदया, माझा दुसरा अभिनंदनाचा विषय आहे. अभिनंदन मांडायचे आहे मला, जळगांव महानगरपालिकेला उपमहापौर म्हणुन श्री.सुनिल खडके हे विराजमान झाले त्यांच अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवत आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया आणि उपमहापौर साहेब मी पुन्हा एकदा आपल लक्ष वेधु ईच्छिते दिपमालाताईच्या प्रश्नाकडे की, आता सुध्दा प्रशासनाने जे सांगितलेल आहे की, मिटींगच्या नंतर या विषयाबद्दल निर्णय घेऊ. हे फक्त वेळ टाळु धोरण आहे, टोलवा टोलवी फक्त सुरु आहे. महापौर महोदया आणि उपमहापौर साहेब आपण

स्वत: प्रशासनाकडुन शब्द घ्या की, मिटींग झाल्यानंतर या विषयावर चर्चा नाही, कृती झाली पाहिजे. ते अतिक्रमण आजच्या आज काढायला पाहिजे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** शुचिताताई, मिटींगच्यानंतर आपण ठेवणार आहोत बैठक.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ताई माझी एकच विनंती आहे की, मिटींग संपल्यानंतर ते अतिक्रमण ताबडतोब निघाले पाहिजे असा प्रशासनाकडुन शब्द घ्या. माझी आपल्याला पक्षाची सदस्य म्हणुन विनंती आहे. महापौर महोदया, उपमहापौर साहेब प्रशासनाकडुन शब्द घ्या की, आपण ते अतिक्रमण आजच्या आज काढु या.

**मा.महापौर :-** शुचिताताई,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बोला,

**मा.महापौर :-** शुचिताताई, मिटींग झाल्यावर आपली मिटींग आहेच या विषयावर. तेव्हा तुम्ही पण राहणारच आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मी पॉझिटीव्ह असल्यामुळे तेथे येऊ शकत नाही. नाही तर त्या आंदोलनात मी सुध्दा राहिली असती. आज मी कोरोना पॉझिटीव्ह असल्यामुळे घरून अटेंड करत आहे मिटींग, मी येऊ शकणार नाही तेथे, म्हणुन मला मोबाईल वरुन सगळं बोलाव लागत आहे.

**मा.उपमहापौर :-** दि.११/११/२०२० रोजी उपमहापौर पदाची निवडणुक होती सदर निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षातर्फे मी निवडणुक लढवली, सदर निवडणुकीत पक्षनेत्यांनी माझ्यावर विश्वास दाखवुन मला बिनविरोध निवडुन आणले त्या बद्दल भारतीय जनता पक्षाचे पक्षश्रेष्ठी व पदाधिकारी यांचे मनापासुन आभार मानतो. तसेच धन्यवाद देतो. तसेच माझी उपमहापौर पदी माझी निवड झाली व त्या मध्ये शिवसेना व एम.आय.एम. या पक्षांनी सहकार्य केले व त्यांनी मला बिनविरोध निवडुन दिले त्या बद्दल मी त्यांचे व पदाधिकाऱ्यांचे सन्मा.सदस्यांचे आभार मानतो व त्याच प्रकारे सभागृहाने व सन्मा.सदस्यांनी सहकार्य करावे ही विनंती धन्यवाद.

**सौ.दिपमाला काळे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला ताई.

**सौ.दिपमाला काळे :-** गेल्या मागील वर्षापासुन मी अतिक्रमणाचा विषय मांडत आहे. माझ्या गणेश कॉलनीतील ख्वाजामियाँ दर्गातला तो विषय आहे. तर प्रशासन का धिम्म झालेले आहे ते मला काही समजत नाही. माझे नागरीकांची समस्या आहे. तेथे वारंवार त्यांची समस्या असते. मी ते फॉलोअप सुध्दा घेत आहे. कोणी नगरसेवक जर नाही म्हणत असतील तर ते सांगाव आयुक्तांनी, आयुक्तांनी मला आश्वासन द्यायच की, ते लवकरात लवकर निघुन जाईन. किती दिवसात निघुन जाईल व काढले जाईल असे मला आश्वासन द्याव.

**मा.महापौर :-** दिपमाला, मिटींग झाल्यावर आपण याच्यावर बैठक घेणारच आहे.

**सौ.दिपमाला काळे :-** ताई बैठक होत नाही, एक वर्ष झाल मी फॉलोअप घेत आहे. आयुक्तांनी मला फक्त आश्वासन द्याव की, ते लवकरात लवकर काढण्यात येईल.

**मा.महापौर :-** आपली बैठक मिटींग झाल्यावर होणार आहे. त्यात आपण सर्व चर्चा करणार आहोत.

**सौ.दिपमाला काळे :-** पॉझिटिव्ह होईल का ? की पुन्हा वेळ लागेल. ही बैठक नेहमीची होते तशीच होईल की, काही तरी पॉझिटिव्ह रिझल्ट निघेल. आयुक्तांकडुन मला महासभेमध्ये आश्वासन हव आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** दिपमाला, आपण मिटींग झाल्यावर करणार आहोत.

**सौ.दिपमाला काळे :-** हो ताई, तुम्ही तर सांगत आहे पण आयुक्तांनी पण मला आश्वासन द्याव. महासभेत आश्वासन द्याव.

**मा.महापौर :-** आपण बैठकीत बोलणार आहोत.

**सौ.दिपमाला काळे :-** हो, बैठक तर होणारच आहे. आम्ही बैठकीला हजर राहणारच आहोत. पण महासभेत सुध्दा आयुक्तांनी आम्हाला आश्वासीत कराव की, लवकरात लवकर हे काम करतील.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, मला बोलायच आहे.

**मा.आयुक्त :-** सन्मा.महापौर, या विषयाच्या बाबतीमध्ये आता सभा सुरु होण्यापुर्वी त्या भागा मधील सन्मा.सदस्य, उपमहापौर आणि त्या भागा मधील सर्व नागरीक या विषयाबाबत मिटींग केली, या संदर्भामध्ये वेळोवेळी अतिक्रमणाच्या

उपायुक्तांकडुन त्या दृष्टीने कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापी त्याच्या मध्ये जे काही अडचणी आलेल्या होत्या. कदाचित त्या अडचणींमुळे त्यांना ही कार्यवाही हाती घेता आलेली नाही. आता या सर्व बाबींची चर्चा आपण एकत्रीतपणे त्या विभागामधील मोजके काही असतील, त्या भागातील १-२ नागरीक, आणि त्या भागातील काही असतील नगरसेवक, महापौर, उपमहापौर यांच्या उपस्थितीत आपण करणार आहोत. या बैठकी मध्ये आता पर्यंत काय कार्यवाही झाली, आणि याच्या मध्ये अतिक्रमण विभागाची भुमिका काय ? ते स्पष्ट होईल. मला खात्री आहे या चर्चेअंती कुठल्याही सदस्याच्या किंवा नागरीकांच्या मनामध्ये हे अतिक्रमण काढण्यासंदर्भात महापालिका प्रशासनाविषयी कुठल्याही प्रकारची शंका राहणार नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, मला बोलायच आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपण दिलेल्या आश्वासन प्रमाणे नक्कीच तो निर्णय व्हावा अशी इच्छा आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेबांशी बोलायच आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषय पाहता कलम ४४ अन्वये प्रश्नउत्तराचा तास या सभेत घेऊ नये. पुढील सभेत घ्यावा. नगरसचिव यांनी विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करावी.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, मला बोलायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चालेल आम्ही त्या विषयाला मान्यता देतो महापौर महोदया की, हा विषय पुढील सभेत घ्यावे कारण की, विषय जास्त आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बोलता बोलता माईक बंद करुन टाकत आहे ते. जर माईकच बंद करायचे आहे तर मग सभा कशाला घेता.

**मा.महापौर :-** ईबा भाई,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बोला मॅडम,

**मा.महापौर :-** विषय खुप आहे. सगळे विषय चर्चेला घेऊ नका,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नाही, नाही, हे माईक खालुन कट करत आहे म्हणजे आम्ही बोलायचेच नाही का ?

**मा.महापौर :-** नाही, बोलायचा विषय नाही, तुम्ही विषय सोडुन बोलु नका, विषयावरती बोला तुम्ही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नाही,नाही, दिपमालाताईचा विषय आलेला होता, त्यालाच लागुन माझा विषय होता.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, मला बोलायचे आहे. महापौरताई, मला बोलायचे आहे. गेल्या एक वर्षापासुन सत्ताधारी गटातील नगरसेविका सौ.दिपमालाताई पाठपुरावा करत आहे. त्याच भागातील माजी महापौर, माजी उपमहापौर, अस्तीत्वात असलेले आमदार यांच निवासस्थान त्याच प्रभागात आहे. आणि अश्या सत्ताधारी गटाच्या नगरसेविकेला एक एक वर्ष लागत असेल तर ही शोकांतीका आहे. सत्ताधारी गटानी सत्ता सांभाळावी. अस आमच सुचक मत राहील. त्यांची प्रशासनाला कुठेही पकड दिसत नाही. तरी सत्ताधारी गटाने सत्ता सोडावी, आपल्या सत्ताधारी नगरसेविकेला न्याय देत नसतील तर आपण सत्ता सोडावी. प्रशासनात आपली कुठेही पकड दिसत नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** हे तर प्रत्येक वार्डात आहे. संपुर्णसाठी एक मिटींग घ्यावी.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दि.२३/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय मंजुर आहे.

**सौ.सरिता नेरकर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.२३/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** १५ व्या केंद्रीय वित्त आयोग निधी प्राप्त अनुदान व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चिती बाबत दि.२६ मे २०२० व दि.२८ ऑक्टोबर २०२० च्या पारित शासन निर्णयाची माहिती घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माहिती घेतली, प्रशासनाचा प्रस्ताव मान्य.

**श्री.दिलीप पोकळे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.एफएफसी - २०२०/प्र.क्रं.४०/नवि-४ मंत्रालय, मुंबई दिनांक २६ मे, २०२० अन्वये केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Non-Million Plus Cities अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थीक वर्षातील अंतरीम मुलभूत अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.एफएफसी - २०२०/प्र.क्रं.५६/नवि-४ मंत्रालय, मुंबई दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२० अन्वये केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Non-Million Plus Cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत नगरविकास विभागामार्फत शासन निर्णय पारीत झालेला आहे.

वर नमूद १५ व्या केंद्रीय वित्त आयोग निधी प्राप्त अनुदान व अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चितीबाबत पारीत शासन निर्णयाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** जळगांव शहर महानगरपालिकेतील डॉ.सौ.हेमलता नेवे, न्यायालयीन रोजंदारी मानधन तत्वावर कार्यरत वैदयकीय अधिकारी यांचे (वेतनवाढ) मानधनात वाढ करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौर महोदया, जळगांव म.न.पा. दवाखाना विभागातील सौ.हेमलता नेवे, मागील अनेक वर्षापासुन मानधन तत्वावर काम करीत आहे. कोरोना काळामध्ये ही त्यांनी चांगली सेवा केली आणि दवाखान्याच्या सर्व डॉक्टरांमुळे जळगांव शहराच्या नागरीकांना चांगली ट्रिटमेंट मिळालेली आहे. अनेक वर्षापासुन प्रशासनाच्या धिम्म कारभारामुळे मानधन वाढविण्यात आलेल नव्हत. परंतु भारतीय जनता पार्टीच्या वतीने आणि प्रशासनाकडुन जो आलेला प्रस्ताव आहे. त्याच्यामध्ये प्रशासनाचे, शासनाचे नियमाप्रमाणे त्यांना वेतनवाढ देण्यात यावी. असा प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

**सौ.रंजना सोनार :-** मी जो विषय मांडलेला आहे त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.उपायुक्त, श्री.किरण देशमुख :-** विषय क्र.३ याच्यामध्ये श्रीमती नेवे यांच्या मानधन वाढीचा जो विषय आहे. तो सन्मा.सभागृहाने निश्चित करायचा आहे. यामध्ये शासनाचे कुठलेही मार्गदर्शन नाही. ही नियुक्ती जी आहे ती मानधन तत्वावरची नियुक्ती आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आवाज येत नाही, महापौर महोदया, आवाज काहीच येत नाही.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ, बोला बोला, आवाज येत नाही नितीन भाऊ,

**मा.उपमहापौर :-** बोला नितीन भाऊ बरडे.

**श्री.नितीन बरडे :-** विष्णु भाऊंना बोलायच आहे भाऊ.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ, बोला

**श्री.विष्णु भंगाळे :-** या क्रमांक .०३ च्या प्रस्तावावर सांगितल जात आहे. त्याचा आवाज आम्हाला आलेला नाही. माझ्या सोबत बरेच व्यक्तींना आलेला नसेल. अस मला वाटत आहे.

**मा.महापौर :-** हो ठिक आहे.

**मा.उपायुक्त, श्री.किरण देशमुख :-** सदरचा जो विषय आहे, श्रीमती नेवे यांच मानधन वाढीचा विषय आहे. त्यांची नियुक्ती मानधन तत्वावर झालेली आहे. मानधन तत्वावर मानधन वाढीबाबत शासनाची कुठलेही मार्गदर्शन आपल्याकडे प्राप्त नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, आवाज येत नाही.

**मा.उपायुक्त, श्री.किरण देशमुख :-** येत आहे आवाज, हॅलो

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आवाज येत नाही. काही कळत नाही सभागृहात काय चालु आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आवाज बराबर येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे:-** आता येत आहे. चालु द्या.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** शासन निर्णयाप्रमाणे मंजुर करण्यात यावा.

**मा.उपायुक्त, श्री.किरण देशमुख :-** या संदर्भात कुठलही शासन निर्णय किंवा परिपत्रक नाही. त्यांच जो मानधन वाढ करायच आहे ते महासभेने निश्चित करुन वाढ करायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ज्या नगरसेवकांचे गाणे सुरु आहे. त्यांनी कृपया बंद कराव.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** कोविडच्या धरतीवर यांना रु.३०,०००/- मानधन देण्यात यावे. महापौर महोदया आवाज येत नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौरताई आवाज येत नाही, बोला.

**मा.उपमहापौर :-** डॉ.चंद्रशेखर पाटील,

**श्री.विष्णु भंगाळे :-** तुम्ही चालु ठेवा सुनिल भाऊ, आता आवाज येत आहे.

**मा.उपमहापौर :-** डॉ.चंद्रशेखर पाटील बोला, विशाल त्रिपाठी, विशाल भाऊ बोला,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** डॉ.चंद्रशेखर पाटील बोलत आहे, सुचक ते आहे. पण त्यांचा आवाज तुमच्या पर्यंत येत नाही.

**मा.महापौर :-** येत नाही त्यांचा आवाज इकडे. तुमचा आवाज येत आहे विशाल भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कोविडला जे डॉक्टर आपण मानधनला लावले आहे. त्यांच्या धरतीवर त्यांना मानधनावर लावण्यात यावा. जे काही २५-३० हजार असेल. ते त्यांना देण्यात यावे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** कोविडच्या धरतीवर त्यांना ३० हजार मानधन देण्यात याव.

**मा.आयुक्त :-** सन्मा.महापौर, हा जो विषय आहे. याच्या मध्ये या मेडीकल ऑफिसरची अपॉईंटमेंट महानगरपालिकेने मानधन तत्वावर केलेली आहे. ही विहीत पध्दतीने त्या वेळेला पध्दतीचा अवलंब करु न केलेली अपॉईंटमेंट दिसत नाही. त्याच्यासाठी आपल्या आस्थापनेवर मंजुर केलेल कुठलही पद नाही. त्यामुळे ते अजुन ही मानधन तत्वावर काम करत आहे. परंतु महानगरपालिकेला त्याला कामाची गरज असल्यामुळे त्यांना वेळोवेळेला महासभेच्या मान्यतेने आपण मानधन अदा करत आलेलो आहोत. आता याच्यामध्ये सन्मा.सदस्यांनी विषय मांडलेले आहे की, शासनाच्या आदेशाप्रमाणे त्यांना मानधन देण्यात याव. अश्या प्रकारे मानधनावर नियुक्ती करणे कुठल्याही शासन धोरणामध्ये नाही आहेत. दुसरी गोष्ट याच्या संदर्भामध्ये नगरपालिकेन किंवा महानगरपालिकेने नेमलेले जे कर्मचारी असतील. त्याच्या बाबतीमध्ये शासन कुठलाही धोरण निश्चित करत नाही. शासनाने मंजुर केलेल्या पदावरती विहित कार्यपध्दतीच अवलंब करुन जे कर्मचारी नेमले जातात. त्यांच्यासाठी वेतनश्रेणी कशी असावी. आपल्याकडे नेमलले कंत्राटी पध्दतीने कोविडसाठी जे कर्मचारी आहे त्याच्यासाठी राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने प्रत्येक महानगरपालिकेला काही पदे मंजुर करुन दिलेली होती. याच्या व्यतिरिक्त नेमायचे असेल तर महानगरपालिकेच्या निधीतुन नेमा. अश्या

पध्दतीने कोविडसाठीच मानधन हे वेगवेगळे आहे, वॉर्डबॉय असेल, नर्स असेल, ए.एन.एम असतील किंवा मेडीकल ऑफिसर असतील, त्याच्या मध्ये BAMS, MBBS, यांच्यासाठी मानधन शासनाने ठरवुन दिलेल आहे. परंतु शासनाने ठरवुन दिलेल मानधन हे कोविडसाठी ठरवुन दिलेल्या कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपाच वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी आहे. तर त्यामुळे आपण जे वैद्यकीय अधिकारी नेमलेले आहे महानगरपालिकेने. जसे २०१० मध्ये त्यावेळेस महानगरपालिकेने रु.१०,०००/- च मानधन ठरविलेल होत. तस आता आपल्याला या सगळया बाबींचा विचार करुन महासभेला नेमके किती मानधन त्यांना द्याव. याबद्दलच निश्चित निर्णय घेणे गरजेच आहे. आपण मोघम स्वरुपात जर निर्णय घेतला, तर त्याची अंमलबजावणी करतांना पुन्हा अडचणी निर्माण होऊ शकता.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, येथे आयुक्त साहेबांना काही प्रश्न विचारु ईच्छिते.

**मा.महापौर :-** बोला शुचितााताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, प्रशासनाने येथे खुलासा करावा की, आपले जे इतर कायम कर्मचारी आहे इतर जे डॉक्टर्स आहेत त्यांना आपण काय मानधन देत आहोत. म्हणजे महासभेला निर्णय घेणे सोपे जाईल. मला वाटत डॉ.हेमलता नेवे हे आपल्याकडे पुर्ण वेळ डॉक्टर म्हणुन काम करत आहे. आणि गेल्या ८ वर्षापासुन ते अत्यंत कमी मानधनावर काम करत आहे. तर अश्या वेळेला आपण इतर डॉक्टरांना जे मानधन देतो, त्याच प्रपोरशन मध्ये त्यांना मानधन दिल गेल पाहिजे. आता महासभेला निर्णय घेण्या कामी या सर्वांनीच मदत करायला हवी. इतर डॉक्टरांना काय मानधन देतो हे सांगाव प्रशासनाने म्हणजे महासभा ठरवु शकेल की, डॉ.हेमलता नेवे यांना काय मानधन दिल पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर साहेबा मला बोलायचे आहे.

**मा.उपायुक्त, श्री.आकाश डोईफोडे :-** सन्मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारला, त्याची माहिती अशी की, हे जे वैद्यकीय अधिकारी आहेत ते जे काम करतात तेच काम नेवे मॅडमपण करतात तर त्यांना सद्याला रु.३१०००/- पेमेंट दिलं जात. त्याच प्रमाणे एन.यु.एच.एम. अन्डर सेवा व अभियान संचालक यांच्या परिपत्रकानुसार अर्धवेळ अधिकारी आणि पुर्ण वेळ अधिकारी यांचे पण वेगवेगळे पेमेंट आहे. अर्धवेळसाठी रु.२८,०००/- आहे. पुर्ण वेळसाठी रु.४५०००/- आणि त्याच प्रमाणे कोविड-१९ ची जी विशेष भरती महानगरपालिकेने राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार केली, त्या प्रमाणे आयुष्य वैद्यकीय अधिकारी या अन्डर शैक्षणिक पात्रता असणारे पदवीधरांना रु.३०,०००/- असे पेमेंट आपण दिलेल आहे. अश्या प्रकारचे हे पेमेंट आहे. तर महासभेने सुचना द्यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला बोलायचे आहे या विषयावर.

**मा.महापौर :-** बोला विशाल भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा प्रशासनाचा प्रस्ताव असल्यामुळे प्रशासनाचा प्रस्ताव असा मोघम का पाठविला, आता मानधन ठरावायच, आता समजा एक लाख रुपये त्यांना जर मानधन द्यायायच ठरविल आणि ऑडिट शक निघाला तर त्याला कोण जबाबदार राहणार. इकडे प्रशासन सांगतो, हे यांच्यासाठी नाही. ती नियुक्ती अशी आहे. त्यांच्या नियुक्तीचा प्रश्न येतो. मग त्यांच मानधन ठरविण्यासाठी प्रशासन स्पष्ट अभिप्राय का देत नाही. तुम्ही जी उदाहरणे दिलेली आहे की, कोविडसाठी शासनाचा निर्णय असा असा आहे त्याचे मानधन इतक इतक आहे. त्याच्यानंतर एन.यु.एच.एम.अंतर्गत इतकं म्हणत आहे. म्हणजे शासनाने कुठेतरी ठरविलेल असेल की, मानधनावरती आपण महासभेचा सुध्दा ठराव केलेला आहे की, मानधनावर डॉक्टर्स नेमायचे तर त्यांच मानधन आम्ही कसे ठरविणार, टेक्नीकल बाबी आहे या. प्रशासनाने त्याचा निर्णय घेतला पाहिजे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** शासनाने याचा निर्णय घ्यावा, हा विषय असा मांडा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** किंवा प्रशासनाने सांगाव की, आपण इतका इतका देऊ शकतो. आम्ही मंजुर करतो,

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.महापौर, मा.महापौर.

**मा.महापौर :-** विशाल भाऊ काय करायच आहे विषयाच, मान्य करायच की काय ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** पुढच्या मिटींग पर्यंत तहकुब करा, जर प्रशासनच या निर्णयाला ठाम नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विशाल भाऊ, शासनाने हा निर्णय घ्यावा, अस करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.महापौर महोदया, मा.महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला विष्णु भाऊ,

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.महापौर महोदया जस विशाल भाऊंनी सांगितल, जर प्रशासनाला त्या डॉक्टरांच्या माध्यमातुन योग्य ते निर्णय प्रशासनाने आपल्या महासभेच्या पटलावर ठेवावा, मान्यता महासभा द्यायला तयार आहे. परंतु त्यांच्या माध्यमातुन जो आकडा असेल तो त्यांनी महासभेसमोर ठेवावा ही विनंती आहे आपणास.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** किंवा आयुक्त साहेबांनी सांगाव की, त्यांना आपण इतक मानधन देऊ शकतो. संपुन जाईल विषय. प्रशासनाने सांगाव, इतक मानधन देऊ शकतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** उद्या येणाऱ्या अडचणींना सामोरे जाणेस नगरसेवकांना सांगु नका. जे योग्य असेल ते करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**मा.महापौर :-** बोला अप्पासाहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब हा विषय तहकुब करावा आणि पुढे विषय क्र.४ ते ७ ची एकत्रित चर्चा करावी.

**मा.महापौर :-** ठिक आहे, हा विषय तहकुब करा, पुढचे विषय घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.४ ते ७ ची एकत्रित चर्चा करा.

**नगरसचिव :-** विषय क्र.३ तहकुब आहे ना ?

**श्री.कैलास सोनवणे :-** हो तहकुब आहे.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ, विषय क्र.३ तहकुब आहे ना ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो, तहकुब आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.४ ते ७ मंजुर,

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ मंजुर आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो, विषय क्र.४ ते ७ मंजुर,

**नगरसचिव :-** रियाज भाई मंजुर आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर, मंजुर.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.८ वर चर्चा करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मानधनावर कार्यरत डॉ.हेमलता जयंत नेवे, वैदयकीय अधिकारी यांना दरमहा किती मानधन देणे योग्य होईल असे प्रशासनाने प्रस्तावात स्पष्ट नमुद केलेले नसल्याने डॉ.हेमलता जयंत नेवे, न्यायालयीन रोजंदारी मानधन तत्वावर कार्यरत वैदयकीय अधिकारी यांना शासन निर्णयाप्रमाणे दरमहा किती मानधन देता येईल याबाबतचा नियमाप्रमाणे स्वयंस्पष्ट परिपूर्ण फेरप्रस्ताव प्रशासनाने पूढील महासभेत सादर करावा तोपर्यंत सदर प्रस्ताव तहकूब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- सोनार रंजना विजय**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहरातील सार्वजनीक शौचालय दुरुस्त करणे कामाची मक्तेदार गजानन एंन्टरप्राईजेस यांचे देयकातुन कपात केलेली एकूण रक्कम रु.१,१४,९३९/- मात्र सुरक्षा अनामत परत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी सुचक आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहरातील सार्वजनीक शौचालय दुरुस्त करणे कामाची मक्तेदार गजानन एंन्टरप्राईजेस, जळगांव यांची सुरक्षा अनामत पावती क्रं.४१३२८

दि.०७/०६/२०१७ अन्वये रक्कम रु.४१,४८४/- मात्र व पावती नं.४४२४६ दि.०३/०८/२०१७ अन्वये रक्कम रु.७३,४५५/- मात्र अशी एकुण रक्कम रु.१,१४,९३९/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

सदर कामी मक्तेदार यांना पत्र क्रं.पवडी/१२३ दि.१४/०२/२०१७ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला त्यानुसार मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी मागणी केलेनूसार मक्तेदार गजानन एंन्टरप्राईजेस यांचे देयकातुन क्रं.४१३२८ दि.०७/०६/२०१७ अन्वये रक्कम रु.४१,४८४/- मात्र व पावती नं.४४२४६ दि.०३/०८/२०१७ अन्वये रक्कम रु.७३,४५५/- मात्र अशी एकुण रक्कम रु.१,१४,९३९/- मात्र कपात केलेली सुरक्षा अनामत मक्तेदार गजानन एंन्टरप्राईजेस यांना परत करणेस महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ चे नियम १६८ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी लेखा संहिता/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** विशेष अनुदाना अंतर्गत प्रभाग क्रं.२८ टि.पी. स्कीम नं.३ फायनल प्लॉट नं.७२ ते १५१ व १८८ ते ७२ अ तसेच १९८ मधील रस्ते डांबरी करणे कामी मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे देयकातुन कपात केलेली रक्कम रु.१४,७५०/- मात्र सुरक्षा अनामत परत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी सुचक आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, विशेष अनुदाना अंतर्गत प्रभाग क्रं.२८ टि.पी. स्कीम नं.३ फायनल प्लॉट नं.७२ ते १५१ व १८८ ते ७२ अ तसेच १९८ मधील रस्ते डांबरी करणे कामी मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांची सुरक्षा अनामत पावती क्रं.१५८६९ दि.२७/०२/२०१५ अन्वये रक्कम रु.१४,७५०/- मात्र इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

सदर कामी मक्तेदार यांना पत्र क्रं.पवडी/१०१ दि.२०/०३/२०१५ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला त्यानुसार मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.२९/०४/२०१५ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी मागणी केलेनूसार मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांचे देयकातुन पावती क्रं.१५८६९ दि.२७/०२/२०१५ अन्वये रक्कम रु.१४,७५०/- मात्र कपात केलेली सुरक्षा अनामत मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन,

जळगांव यांना परत करणेस मनपा लेखा संहिता १९७१ चे कलम ४५ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी लेखा संहिता/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.२८ मध्ये बॅरिस्टर निकम चौक ते आस्वाद हॉटेल चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे देयकातुन कपात केलेली रक्कम रु.१३,५००/- मात्र सुरक्षा अनामत परत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी सुचक आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.२८ मध्ये बॅरिस्टर निकम चौक ते आस्वाद हॉटेल चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांची इसारा अनामत पावती क्रं.१५८२४ दि.१५/०१/२०१५ अन्वये रक्कम रु.१३,५००/- मात्र इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

सदर कामी मक्तेदार यांना पत्र क्रं.पवडी/८३ दि.२२/०१/२०१५ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला त्यानुसार मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.०४/०३/२०१५ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी मागणी केलेनूसार मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांचे देयकातुन पावती क्रं.१५८२४ दि.१५/०१/२०१५ अन्वये रक्कम रु.१३,५००/- मात्र कपात केलेली सुरक्षा अनामत मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांना परत करणेस मनपा लेखा संहिता १९७१ चे कलम ४५ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी लेखा संहिता/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.३१ तांबापुरा भागामध्ये गुलाबबाबा कॉलनी मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी मक्तेदार एल एच पाटील

कंन्स्ट्रक्शन यांचे देयकातुन कपात केलेली रक्कम रु.४,४००/- मात्र सुरक्षा अनामत परत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी सुचक आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.३१ तांबापुरा भागामध्ये गुलाबबाबा कॉलनी मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांची इसारा अनामत पावती क्रं.१५८२३ दि.१५/०१/२०१५ अन्वये रक्कम रु.४,४००/- मात्र इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

सदर कामी मक्तेदार यांना पत्र क्रं.पवडी/८४ दि.२२/०१/२०१५ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला त्यानुसार मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.२५/०५/२०१५ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी मागणी केलेनूसार मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांचे देयकातुन पावती क्रं.१५८२३ दि.१५/०१/२०१५ अन्वये रक्कम रु.४,४००/- मात्र कपात केलेली सुरक्षा अनामत मक्तेदार एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव यांना परत करणेस मनपा लेखा संहिता १९७१ चे कलम ४५ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी लेखा संहिता/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** शासन निर्णय क्रं.संकीर्ण २०१७/प्र.क्रं./१८३/नवि-२०/ दि.१२/०१/२०१८ तसेच महाराष्ट्र शासन ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.अपाऊ-२०१५ प्र.क्रं.३७८/ऊर्जा ७ दि.२२/०६/२०१७ नुसार जळगांव शहरात महानगरपालिका हद्दीत एस्को तत्वावर ईईएसएलच्या माध्यमातुन एलईडी पथदिवे बसविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला शुचितातार्इ

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, विषय क्र.८ संदर्भात बोलत आहे. एल.ई.डी.पथदिव्यांसंदर्भात.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ नंतर बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, आवाज येत आहे सभागृहाला ?

**मा.महापौर :-** हो,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या विषयासंदर्भात विद्युत विभाग प्रमुखांना बोलवुन घ्याव. कारण त्यांना काही प्रश्न विचारायचे आहे. प्रशासनाचा प्रस्ताव येथे मान्य करण्यात येत आहे मात्र तत्पुर्वी विद्युत विभाग प्रमुख एस.एस.पाटील साहेब यांनी प्रश्नांचे काही उत्तरे, काही माहिती सभागृहाला देणे अपेक्षित आहे.

**मा.महापौर :-** आवाज येत नाही शुचितातार्इ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरतार्इ, महापौरतार्इ.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ थांबा जरा, नंतर बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, विद्युत विभाग प्रमुखांना सभागृहात बोलवाव. कारण माझे काही प्रश्न विचारायचे आहे त्यामुळे त्यांना सभागृहात बोलवावे अशी माझी विनंती आहे सभागृहाला.

**मा.महापौर :-** एस.एस.पाटील आलेले आहे येथे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, विद्युत विभाग प्रमुख नसतील तर त्यांच्या वतीने मा.आयुक्त यांनी उत्तर द्याव.महापौर महोदया,

**मा.महापौर :-** शुचितााताई बोला ना.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, मी प्रश्न विचारु का माझे ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई, आमचही म्हणण ऐकुन घ्याव मग एकत्र उत्तर त्यांनी द्याव.

**मा.उपमहापौर :-** शुचिताताई बोला तुम्ही.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ, नंतर बोला तुम्ही, प्रत्येकाला परवानगी देत आहे, तुम्हीनंतर बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, मी काही प्रश्न विचारु ईच्छिते.

**मा.उपमहापौर :-** बोला ताई. तुम्ही बोला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ऐकु येत आहे सुनिलभाऊ माझा आवाज.

**मा.उपमहापौर :-** हो एकु येत आहे. बोला ताई तुम्ही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हा जो विषय आहे एस.एस.पाटील साहेब. आपल्याला माझा प्रश्न आहे की, या विषयाचा आपण पुर्वी सुध्दा डि.पी.आर.नसतांना सुध्दा काम सुरु केल होत. आता तरी अंतिम डि.पी.आर. आलेला आहे का साहेब. पाटील साहेब, अंतिम डी.पी.आर. आता प्राप्त झालेला आहे का महापालिकेला ?

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** हो झालेला आहे, पुर्णपणे सर्व्हे रिपोर्ट जो आहे महापालिकेला प्राप्त झालेला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कधी आला ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्राप्त झालेला आहे, महानगरपालिका समाधानी आहे का ? त्या डि.पी.आर. संदर्भात आपण काम सुरु करत आहोत.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** आहे समाधानी आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-**महापालिका आणि ठेकेदार यांच्यातला समन्वय झालेला आहे का पुरेसा.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** हो समन्वय झालेला आहे, समन्वय झाल्यानंतरच आपला हा सर्व्हे रिपोर्ट चालेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-**मला सांगा साहेब , हे डि.पी.आर. कुठे जाणार आता. ठिक आहे आता आपण काम सुरु करत आहोत. एल.ई.डी. लाईट लावण्यासाठी किंवा मेनटेनन्ससाठी मनपाचे वाहन वापरणार आहे की, स्वत:चे वाहन वापरणार आहे.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** या पुर्णपणे नविन एल.ई.डी.लाईट बसविण्याकरीता आणि मेनटेनन्स करीता महानगरपालिकेची कोणतीही यंत्रणा देण्यात येणार नाही. संपुर्ण काम जे आहे हे ई.ई.एस.एल.च्या मार्फतच करणार आहे. आपण आपले कोणतेही कर्मचारी किंवा वाहन त्यांना देणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-**१००% आपण आपले वाहन देणार नाही आहोत. याची इतिवृत्तात नोंद होत आहे पाटील साहेब. आता मला सांगा, आपल वाहन, आपल इंधन आणि मनुष्यबळ वापरल जाणार नाही. तर पुढे आपण आपल्या या मॅनपावरचा काय वापर करणार आहोत. त्याची काय स्ट्रॅटेजी ठरविलेली आहे. विद्युत विभागाकडे जी मनुष्यबळ आहे जी वाहने आहे. आणि विद्युत विभागाला आता पर्यंत जो इंधन वापरल जात होत. त्या सगळयाच आपण कुठे वापर करणार आहोत.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** महानगरपालिकेची जी यंत्रणा आहे, आज रोजी महानगरपालिकेचे जे कर्मचारी आहे. हे स्ट्रिट लाइटच मेनटेनन्स जरी ई.ई.एस.एल. करणार असतील. महानगरपालिकेची जी मिळकती आहे, महानगरपालिकेची मिळकती आहे, बगीचा आहेत, या सर्व ठिकाणची आपली जी मेनटेनन्स आहे. किंवा जे काही आपण आमदार निधीत काम केलेल आहे. जे महानगरपालिकेचे स्ट्रिट लाईट आहे. ते ए.एस.एल.कडुन बदलविणार

नाही. त्याच मेनटेनन्स वगैरे जे आहे. हे संपुर्ण कामांसाठी आपण आपली महानगरपालिकेची यंत्रणा आपण वापरणार आहे. त्याच्यानंतर ई.ई.एस.एल.चे जे काम आहे ते स्वत:च करणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला एस.एस.पाटील साहेबांना एक प्रश्न विचारायचा आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-**अप्पा साहेब दोन मिनीट माझ होऊन जाऊ द्या ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, मला वाटत माझा प्रश्न झाल्यानंतर कोणाचेच प्रश्न शिल्लक राहणार नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.विष्णु भंगळे :-** महापौरताई, महापौरताई,

**मा.महापौर :-** थांबा विष्णु भाऊ.

**श्री.कैलास सोनवणे :-** एस.एस. पाटील साहेब, एस.एस. पाटील साहेब,

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** हो बोला,

**श्री.कैलास सोनवणे :-** एस.एस. पाटील साहेब, जळगांव शहरात एल.ई.डी.लाईट लाऊन पुर्ण किती दिवसात होऊन जाईल.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** आपण जे आपल नियोजन आहे केलेल, मक्तेदारापासुन जे नियोजन केलेल आहे ते मार्च आखेर पर्यंत पुर्ण एल.ई.डी.लाईट बसविण्याच नियोजन केलेल आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे तीन महिन्यात नियमानुसार होऊन जाईन पुर्ण.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** हो हो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आयुक्त साहेब, हा जो ठेका होता, त्याची मुदतच ३ महिन्याची होती. त्यामुळे ३ महिन्यात ते काम झालच पाहिजे. एस.एस.पाटील साहेब, आपणास प्रश्न माझा असा आहे, आपण जस स्वच्छते संदर्भात काही तक्रार असली तर महानगरपालिकेचे कंमप्लेन नंबर आपण डिसप्ले केलेले आहे नागरीकांमध्ये तर आपण याच पध्दतीने विद्युत विभागासंदर्भात काही तक्रार जर असेल तर तसा नंबर डिसप्ले करण्याच नियोजन प्रशासनाच आहे का ?

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** याच संदर्भातही भविष्यात आपण नियोजन करु.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** एस.एस.पाटील साहेब, आता याच मेनटेनन्स जे आहे तो किती वर्ष करणार आहे.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** संपुर्णपणे आपल मार्च अखेर पर्यंत काम पुर्ण झाल्यापासुन ७ वर्ष.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ७ वर्ष.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** ७ वर्षाच्या कालावधी पर्यंत त्यांच काम आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बरं आता आपले जे माणसं आहे त्यांच काम निश्चितच कमी होणार आहे. अर्थातच हा संशोधनाचा विषय आहे की, विद्युत विभागाचे माणस कामं काही करत होते का ? पण तरी सुध्दा आपण जस सांगितलं की, एल.ई.डी.च्या कामांमध्ये त्यांचेच माणस वापरले जाणार आहे. महानगरपालिकेचे वाहन किंवा मनुष्यबळ वापरल जाणार नाही. तर आता आपल्या माणसांचा विनियोग दुसऱ्या एखाद्या विभागात योग्य जागी कराव. कारण आता त्याच काम निश्चितच कमी होणार आहे. प्रशासनाने त्याच्यासाठी पर्यायी स्ट्रॅटेजी आखावी. एक अजुन सुचना आहे महापौर महोदया, प्रत्येक नगरसेवकाला त्याच्या वार्डामध्ये किती एल.ई.डी.लाईट लावले जाणार आहे या संदर्भात सुचना कळविण्यात यावी. या सदंर्भात काही नियोजन केलेल आहे का आपण ? पाटील साहेब आपल या संदर्भात नियोजन आहे का ?

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** आपल्याकडे आता संपुर्णपणे सर्व रिपोर्ट अप्राप्त आहे. पण प्रत्येक पोलावर आपण नंबर टाकलेले आहे. पोल नंबरनुसार प्रत्येक नगरसेवकाच्या वार्डात कोणते लाईट बसविणार आहोत याची संपुर्ण माहिती आपण संबंधीत सदस्यांना आपण उपलब्ध करुन देण्यात येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर ताई,

**श्री.रियाज बागवान :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला विष्णु भाऊ.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विष्णु भाऊ, मी आता बोलत आहे, महापौरांनी मला परवानगी दिलेली आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मला ही परवानगी दिलेली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विष्णु भाऊ, जर एका वेळेला आपण सर्वेच बोलायला लागले तर कोणाचच बोलण कळणार नाही. **श्री.विष्णु भंगाळे :-** ताई, महापौरांनी मला बोला सांगितल तेव्हाच सुरु केल मी,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पाटील साहेब, गल्ली बोळींसाठी काय व्यवस्था केलेली आहे. ज्या जुन्या जळगांवातल्या छोटया गल्ल्या आहेत. तर या संदर्भात काही पर्यायी व्यवस्था झालेली आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला वाटत, जेव्हा पार्टी मिटींग झाली तेव्हा या सर्व प्रश्नांचे उत्तर श्री.एस.एस.पाटील साहेबांनी समाधानकारक रित्या दिलेले आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** इतिवृत्तात येऊ द्या ना अप्पा साहेब हे सगळ,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला बोलु द्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई, महापौरताई.

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, या विषयावरती आपण पुन्हा एल.ई.डी.बाबत विषय आणलेला आहे. मागील महासभेमध्ये दि.०६/०६/२०२० च्या वेळेस आपण सर्वानुमते मला वाटत, शुचितातार्ई हाडा आणि आमचे नितीनभाऊ लढढा यांनी जवळ जवळ एक तास या विषयावर चर्चा केलेली होती की, हा रद्द का केला गेला पाहिजे. आणि हा रद्द का करण्यात यावा. आणि आपण महासभेमध्ये रद्द ही केला होता. मग आता येथे आणायचे कारण काय ? आणि त्या वेळेस आपला विचार विनिमय याच्यावर झाला होता महापौर महोदया की, आपली बचत होणार आहे आपली महापालिकेची. या एल.ई.डी.च्या लाईटाची प्राईज असतील किंवा ज्या काही गोष्टी असतील. या माध्यमातुन त्यांनी अटीशर्तीचे पालन केलेले नाही. ॲक्शन प्लॅन त्यांनी दिलेला नाही. आपण त्यांना ३० दिवसाची नोटीस देऊन रद्द करुन जर आपण रद्द केलेला ठराव होता. मग आता पुन्हा का आणतो आहे. तर काय साध्य होणार आहे. मनपाच हित साध्य होणार आहे का ? मला एक प्रशासनाला विचारायचे आहे. प्रशासन याला फेवर का करत आहे. आपण खरेदी करुन बचत होणार होती सभागृहात अस सांगण्यात आले.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विष्णु भाऊ, मंजुरी घेतलेली आहे काम सुरु झालेल आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** माझ एकच म्हणण आहे महापौर महोदया, हा निर्णय आता का आला, आणि ही वेळ का येत आहे आपल्या वरती. ज्या वेळेस सभागृहात या विषयांवर चर्चा होते आणि त्या गोष्टी नाही म्हटल्यानंतर पुन्हा सभागृहात ठेवला जातो. संशय वाटत आहे आम्हाला की, पार्टी मिटींगला अप्पांनी आताच सांगितल की, पार्टी मिटींगला एस.एस.पाटीलांनी पुर्णपणे उत्तरे दिलेले आहे. म्हणजे नेमक आपल्या ठेकेदाराची आपल्या प्रशासनाशी काय चर्चा झाली. आणि का ॲक्शन प्लॅन नसतांना आता पुन्हा करेल. आणि किती दिवस हा चालेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अप्पा साहेब, मला माझ्या प्रश्नाच उत्तर घेऊ द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ऐकुन घ्या पहिले, पार्टी मिटींगचा जो विषय होता तो आमच्या सदस्यांसाठी होता. विष्णु भाऊंना बोलु द्या आणि प्रशासनाला विनंती करेल की, विष्णु भाऊंच्या प्रश्नांना उत्तर द्यावे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आयुक्त महोदय, आपण या बाबतीतला खुलासा करावा. नेमक अस काय झालेल आहे की, ते दोन वर्षापासुन काम करत नाही. आणि आता आपण देतो आहे, पुढील काळामध्ये काम होईल का ? आम्हाला अस वाटत आहे की, हा निर्णय चांगल्या पैकी सत्ताधारी पक्षाने घेतलला नव्हता का आधी. जर त्यात परत प्रॉब्लेम आले तर त्यात मनपाच हित आहे का ? उत्तर द्याव.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा प्रस्ताव प्रशासनाचा आहे सत्ताधाऱ्यांचा नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ज्या वेळेस हे निर्णय आले त्या वेळेस आपण सत्ताधारी म्हणुन हा निर्णय रद्द केलेला होता. आयुक्त साहेब,

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**श्री.विष्णु भंगाळे :-** प्रशांत थांब,

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ, या विषयावर सर्वांना बोलु द्या मग आयुक्त साहेब देणार आहे उत्तर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** बोला ताई.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला उज्वलाताई बोला.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, आयुक्त साहेब, एक विचारायचे आहे. एस.एस.पाटील साहेब आहेत का ?

**मा.महापौर :-** हो, आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला एस.एस.पाटील साहेबांना प्रश्न विचारायचा आहे.

**मा.महापौर :-** बोला ना उज्वलाताई, आहे ते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कालच्या दिवशी जेव्हा डी मार्टला उदघाटन झाल. जेव्हा एल.ई.डी.च उदघाटन झाल. परंतु दोन दिवसापुर्वी पार्टी मिटींग झाली तेव्हा एस.एस.पाटील साहेबांना विचारल होत.डी.पी.आर. झाला का ? सभापती महोदया आपल्या गायत्रीताई राणे यांनी डी.पी.आर.त्यांना खुपदा मागीतला, ते का देत नाही. त्यांना का उडवा उडवीचे उत्तर देत आहे एस.एस.पाटील साहेब. काल उदघाटन झाल त्यांना बोलविलेच नाही. म्हणजे सभापती पद हा फक्त शोच आहे का ? काय हेतु आहे हे लपविण्याच त्याच्या मागे.

**श्री.रियाज बागवान :-** महापौरताई, महापौरताई.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई आम्हाला बोलु द्या ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझ उत्तर मिळालेल नाही, थांबा प्रशांत भाऊ अजुन.

**मा.महापौर :-** सर्वांचे बोलणे झाल्यावर उत्तर देणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला फक्त इतक उत्तर पाहिजे की, सभापतींना का विश्वासात घेत नाही हे. त्यांना का उडवा उडवीचे उत्तर देत आहे. त्यांच्यापासुन काही लपवता आहे का ते ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई, मोठा संशोधनाचा विषय आहे हा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे त्यांनाच जर उत्तर द्यायच नसेल तर कशासाठी हे सभापती पद ठेवलेल आहे. सगळे अधिकार त्यांनीच घ्यायचे आणि सर्व कामे त्यांनीच करायचे. कशासाठी ते सभापती पद बोलवता, कशासाठी सन्मा.सदस्यांना बोलविता तेथे.

**श्री.प्रशांत नाईक :-** एक नगरसेवक कम्पेंन्ट करतोय आणि दुसऱ्या सभापतीला डावलताहेत सत्ताधारी गट

**सौ.गायत्री राणे :-** कोणतीच माहिती वारंवार विचारल्यावर सुध्दा देत नाहीत एस.एस.पाटील साहेब माझ्या पर्यंत देत नाही.

**मा.महापौर :-** त्यांच म्हणण आहे मला मॅसेज मिळाला नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कोणाला मॅसेज मिळाला नाही. एस.एस.पाटील साहेबांनी सभापती ताईंना बोलविल होत का ? प्रशांत भाऊ तुम्ही थांबा जरा, मध्ये मध्ये बोलु नका मला बोलायचा चांस दिलेला आहे.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** एल.ई.डी.बसविण्याच जे होत, त्याच मोहाडी रोडवर आपण काम करत होतो. याच्या संदर्भात आपण फक्त महापौर कार्यालयाला काम चालु करण्याचा निरोप दिला हाता. आणि त्याच्या कार्यालयामधुन संबंधीत सदस्य आणि पदाधिकाऱ्यांना निरोप दिले गेलेले होते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** पाटील साहेब, तुम्ही आज मंजुरी घेत आहे पण काम तुम्ही सुरु केलेल आहे.

**श्री.रियाज बागवान :-** उदघाटन हो गया ताई.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आज मंजुरी घेत आहात तुम्ही.

**मा.महापौर :-** ईबा भाई नंतर बोला,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जर आज प्रशासनाला मंजुरी घ्यायची होती तर आज का केल उदघाटन ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, विरोधी पक्षाला सुध्दा विश्वासात घेतलेल नाही. प्रशासन विरोधी पक्षाला सुध्दा विश्वासात घेत नाही याचा अर्थ असा होत आहे.आपल्या पक्षाचे सदस्य जर असे बोलत असतील. तर विरोधी पक्षाने भुमिका काय बजवावी. का लपविल जात आहे त्यांचा प्रश्न सुध्दा आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** याला प्रशासन नाही सत्ताधारी जबाबदार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रशांत भाऊ, प्रत्येक वेळी सत्ताधारी सत्ताधारी करु नका, सत्ताधारीच प्रश्न विचारत आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** सत्ताधारीच जबाबदार आहे, सत्ताधारीच उदघाटनाला होते. तुम्हाला बोलविले नाही त्यांनी. ही चुक सत्ताधाऱ्यांची आहे. सत्ताधारी तुमचे महापौर, स्थायी समिती सभापती, उपमहापौर हजर होते. ही जबाबदारी त्यांची होती.

**मा.महापौर :-** प्रशांत भाऊ नंतर बोला, तुम्हाला परवानगी नाही दिलेली आहे अजुन मी.

**श्री.प्रशांत नाईक :-** आता बोलु का ?

**मा.महापौर :-** थांबा ना, बोला उज्वलाताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला फक्त एस.एस.पाटीलांना सांगायचे आहे की, उडवा उडवीचे उत्तर द्यायचे नाही. डी.पी.आर.आहे, जी काही माहिती त्यांनी मागितलेली आहे. त्यांनी ती माहिती लगेच तुरंत दिली पाहिजे.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** माहिती सर्व सदस्यांना आणि पदाधिकाऱ्यांना देण्यात येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आयुक्त साहेब, सगळयांना तुम्ही सुचना द्या तुम्ही तश्या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, माझ्या प्रश्नाच उत्तर मिळालेल नाही. म्हणजे तुम्ही सत्ताधारी पक्षाचे लोकांनीच प्रश्न विचारायचे. आमच्या प्रश्नांचे उत्तर द्यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, ९ नंबरचा विषय घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आम्हाला प्रश्नाच उत्तर पाहिजे.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ तुमच्या प्रश्नाच उत्तर देत आहे आयुक्त साहेब.

**श्री.विष्णु भंगाळे :-** देऊ द्या ताई.

**श्री.प्रशांत नाईक :-** लक्षात घ्या महापौर ताई मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** प्रशांत भाऊ नंतर बोला

**श्री.प्रशांत नाईक** :- महापौर ताई, या एल.ई.डी.च्या विषयाच्या संदर्भात बोलायच आहे.

**मा.महापौर :-** बोला, बोला लवकर बोलुन घ्या.

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब, मला उत्तर हव आहे आपल्याकडुन, हे जे डिब्ब्या लावल्या आहेत आपल्याकडे एल.ई.डी.च्या, या मध्ये जे नविन पोल टाकलेले आहेत आपण २५ कोटी मधुन,या पोलवरही एल.ई.डी.लागणार आहेत का ? एस.एस.पाटील साहेब.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** आपण आता जे नविन नविन विकसीत भागात पोल उभारणी केलेली आहे. त्याच्यावरती एल.ई.डी.लाईट बसविण्यात येतील.

**श्री.प्रशांत नाईक :-** नविन नाही, डी-मार्ट ते ईच्छादेवीची जी लाईन टाकली आहे ना आपण. या विभागामध्ये जे पोल उभारलेले आहे त्यावर एल.ई.डी. लागतील ना.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** संपुर्ण जळगांव शहरामध्ये ज्या ही नविन भागात आपण नविन पोलची उभारणी केलेली आहे. त्या सर्व पोलवर एल.ई.डी.बसविण्यात येतील.

**श्री.प्रशांत नाईक :-** बसविण्यात येतील ना, नविन लावलेले आहे त्या ठिकाणी.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** हो, त्या पोल वरती आता आपण नविन विकसीत भागामध्ये २५ कोटी मधुन नवीन पोल टाकलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** नवीन नाही, जी डी-मार्ट ते ईच्छादेवीची लाईन टाकलेली आहे आपण. तेथे जे पोल उभारले तेथे एल.ई.डी. लागतील ना.

**विद्युत विभाग प्रमुख श्री.एस.एस.पाटील:-** लागतील लागतील, संपुर्ण जळगांव शहराच्या विकसीत भागांमध्ये आपण जे काही नविन पोलची उभारणी केलेली आहे. त्या संपुर्ण पोल वरती एल.ई.डी. बसविण्यात येतील.

**श्री.प्रशांत नाईक :-** ओके.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, महापौर साहेब,

**मा.महापौर :-** बोला अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** एस.एस.पाटील साहेबांनी सांगितलेले आहे तीन महिने म्हणजे मार्च ऐन्डींग पर्यंत संपुर्ण जळगांव शहरामध्ये एल.ई.डी. लाईटची त्यांनी व्यवस्था केलेली आहे. म्हणुन आता माझी विनंती आहे की, येथे हा विषय संपलेला आहे. ९ नंबरचा विषय सुरु करावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अप्पासाहेब मी जे विचारलेल आहे. त्याच उत्तर नाही मिळाल अप्पासाहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्त साहेब उत्तर देतील, आयुक्त साहेबांना सांगा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** उत्तर देऊ द्या.

**मा.आयुक्त :-** आदरणीय महापौर, हा जो एल.ई.डी.चा जो प्रोजेक्ट आहे. आपण नोव्हेंबर २०१८ मध्ये राज्य शासनाच्या राज्य पातळीवर घेतलेल्या धोरणाला अनुसरुन आपण आपल्या शहरासाठी हा प्रोजेक्ट राबवत आहोत. जळगांव जिल्ह्यामधील सर्व नगरपालिका, नगरपंचायती आणि महानगरपालिका या सगळयांमध्ये हा प्रोजेक्ट चालु आहे. शासनाच्या धोरणाला अनुसरुन आपण हे विज बचतीच धोरण आहे. आणि अपारंमपारिक उर्जा पध्दतीने जे आपल उर्जा बचतीच धोरण आहे त्याला अनुसरुन हा प्रोजेक्ट राबविलेला आहे. अर्थातच पुर्ण ७ वर्षाचा हा प्रोजेक्ट पुर्ण होत असतांना महानगरपालिकेच येणार जे काही उर्जा बचतीच जे काही बचत आहे हे विचार घेऊन आपण महापालिकेने त्याला मान्यता दिलेली आहे. तसा आपण करार केलेला आहे. आता आपण एक प्रामुख्याने गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे की, याच्या मध्ये महानगरपालिकेच अपफ्रंट म्हणजे सुरुवातीला कोणतही भांडवल गुंतवणुक आपण करणार नाही. ही संपुर्ण गुंतवणुक केंद्र शासनामार्फत जे काही शासनद्वारे निधी येईल.ही ई.एस.एल. कंपनी आहे. त्यांच्यामार्फत ठेकेदार आहे. यावरती २०% रक्कमेवरच व्याज आणि ७ वर्षाच मेनटेनन्स हे पुर्णपणे महापालिकेला एक्सट्रा अकाऊंट ठेवुन ७ वर्ष दरमहा आपल्याला भराव लागणार आहे. परंतु आपल्याला इतर पध्दतीच्या विज मधुन येणार बिल आणि एल.ई.डी. मधुन येणाऱ्या बिलामध्ये जे काही बचत होईल त्याच्यामधुन आपल्याला हे खर्च करणे शक्य होईल. अश्या प्रकारच धोरण राज्य शासनाने निश्चित केलेल आहे. हा प्रकल्प सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या फायद्याचा असल्यामुळे हा सर्वत्तर राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. आणि या निर्णयाला अनुसरुन आपण हा प्रोजेक्ट राबवत आहोत. दुसरा जो मुद्दा होता की, याच्या मध्ये सुरुवातीला अशी अपेक्षा होती की, हे जे काही डी.पी.आर.आहे ज्याच्या विषयी चर्चा होती. हा डी.पी.आर. म्हणजे अन्य प्रोजेक्टच्या संदर्भात केला जातो तश्या पध्दतीचा काही स्वतंत्र डि.पी.आर.नाही. हा डि.पी.आर. म्हणजे त्याच्यात अपेक्षित असा आहे की, आता आपण आपल्या शहरामध्ये जेवढे काही ट्युबलाईटस आहेत. त्याचा सर्व्हे करायचा आहे.त्या सर्व्हे प्रमाणे आता आपल्या रस्त्यांवरती प्रकाशाची आपली लेव्हल काय आहे. ईलेक्टीक भाषा मध्ये त्याची लेव्हल मेजर करायची आहे. कुठल्या ठिकाणी सद्या प्रकाशाची किती तिव्रता आहे याची पाहणी करायची. म्हणजे आताची असलेल्या प्रकाश लेव्हलचा सर्व्हे करायचा. त्यानंतर ज्या ठिकाणी आपले वेगवेगळे प्रकारचे पथदिवे असतील. आपल्या जुन्या पध्दतीचे ट्युब असतील, छोटे टयुब असतील किंवा पथदिवे असतील याला पर्यायी म्हणुन आपल्याला जे काही एल.ई.डी.चे लाईट बसवायचे आहे. कोणत्या ठिकाणी किती लाईट बसवायला पाहिजे.किती व्हॅटचे लाईट बसवायला पाहिजे. आणि याच्यामुळे प्रकाश लेव्हल मध्ये काय होईल. याचा सर्व्हे करुन त्यांना आपल्याला याचा रिपोर्ट द्यायचा आहे. हा रिपोर्ट आपल्याकडे आल्यानंतर तेथुन पुढे ३ महिन्यामध्ये हा प्रोजेक्ट पुर्ण होण अपेक्षित होत. परंतु काही कारणांमुळे त्या कंपनीकडुन हा सर्व्हे रिपोर्ट वेळेमध्ये आला नाही. त्यामुळे हे बसवायच काम ज्या गतीन होणे गरजेच होत त्या गतीने झाल नाही. जे लाईट बसविले गेले त्याच मेनटेनन्स झाल नाही. हे सगळे महापालिकेचे विद्युत विभाग आणि ई.एस.एल. कंपनी यांच्याकडे वादविवादाचे मुद्दे होते. त्या पार्श्वभुमीवर शहरामध्ये असलेली अडचणी विचारात घेऊन त्यावेळेला बहुता:शी सर्व सदस्यांनी या कंपनीच्या कामाबद्दल असमाधान व्यक्त केल होत. अर्थात हे वस्तुस्थितीला धरुन होत. याच्या संदर्भामध्ये आपण ६ जुन २०१९ च्या महासभेमध्ये ज्या कंपनीच कामकाज ज्या गतीने व्हायला पाहिजे होत. त्या गतीने होत नाही. म्हणुन हा करार रद्द करावा अश्या प्रकारचा तत्वता धोरणात्मक निर्णय आपण घेतलेला होता. त्याच्यानंतर या कंपनीला नोटीसही आपण दिलेली होती. त्या नोटीसच्या उत्तरामध्ये कंपनीने तशी तयारी दर्शविलेली आहे. आता जे काही करार महानगरपालिकेने करुन दिलेला आहे. जे काही राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने धोरण ठरवुन दिलेल आहे. याच्या प्रमाणे आम्ही काम करत आहोत.या प्रमाणे आयुक्तांच्या स्तरावरती २८ ऑक्टोबर आणि २० ऑक्टोबर या दोन वेळेला सविस्तरपणे चर्चा झाली आहे. या चर्चेमध्ये कंपनीकडुन झालेल्या ज्या त्रृट्या आहेत. या त्रृट्यांबद्दल कंपनीला पुर्णपणे अवगत करुन देण्यात आलेल आहे. आपल्याकडुन कंपनीला या सर्व्हेमध्ये आणि प्रोजेक्टमध्ये जे काही सहकार्य अपेक्षित होत. ते देण्याबाबत विद्युत विभागाला तश्या सुचना देण्यात आलेल्या आहे. आणि आपण हा डी.पी.आर. म्हणजे सर्व्हे रिपोर्ट जो आहे. तो सर्व्हे रिपोर्ट त्याच्याकडुन तयार करुन घेण्यात आलेला आहे. आताची जी प्रकाश व्यवस्था आहे त्याची मेजरमेंट करण्याबाबत सुचना दिलेल्या आहे. आणि आता हे सगळे जे वादविवादाचे मुद्दे होते.हे सगळे दुर करुन ३१ मार्च पर्यंत संपुर्ण काम पुर्ण करण्याच्या संदर्भात कंपनीला सुचना दिलेल्या

आहेत. हा प्रोजेक्ट रद्द करुन पुन्हा नव्याने प्रोजेक्ट देणे. हा प्रोजेक्ट आपल्याला केंद्र सरकारने राज्य सरकारने दिलेला आहे. त्यामुळे आपल्याला पुन्हा नव्याने निविदा प्रक्रिया राबवुन घेण्याची गरज नाही. आज पर्यंत आपण या प्रोजेक्ट मध्ये एक रुपयाची ही गुंतवणुक केलेली नाही. त्यामुळे हा प्रोजेक्ट आपल्याला ई.एस.एल.कडुन त्यांनी दिलेल्या कमिटमेंट प्रमाणे मार्च अखेरपर्यंत पुर्ण करुन घेतला तर पुढच्या ७ वर्षामध्ये मेनटेनन्स होईल. आणि हा प्रोजेक्ट या कंपनीकडुन पुर्ण करुन घेणे हे महापालिकेच्या हिताच होणार आहे. आणि म्हणुनच आपण हा प्रस्ताव पदाधिकाऱ्यांच्या सोबत चर्चा करुन हा आता महासभेसमोर ठेवलेला आहे. मला अस वाटत की, बहुता:श पदाधिकाऱ्यांनी किंवा नगरसेवकांनी जे मत व्यक्त केलेले आहे. ते पाहता हा प्रोजेक्ट आपण जर ३१ मार्च पर्यंत पुर्ण करुन घेतला तर पुढच्या ७ वर्षामध्ये हा विद्युत दिव्यांचा खर्च आणि त्यांच मेनटेनन्स हे दोन्ही विषय आपले बऱ्याच पैकी मार्गे लागतील.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आयुक्त साहेबांनी सांगितल्या प्रमाणे आता हा निर्णय जो आपण घेतो आहे. आपण याच्यात बचत होणार होती. मागच्या महासभेला रद्द केली होती. आणि त्याच्यात लागणारा खर्च निम्यापेक्षा कमी लागणार होता. मग याचा विचार आपण कुठे केलेला आहे का या माध्यमातुन ? याची बचत होणार आहे. का ?

**मा.आयुक्त :-** विष्णु भाऊ आपली याच्यामध्ये बचत होणार आहे. कारण आपण साधारणता सर्व्हे मध्ये आपल्या शहरामध्ये १९००० पारंपारिक पध्दतीचे दिवे आहे. असा सर्व्हे मध्ये आलेल आहे.आता ज्या ज्या ठिकाणी आपल्याकडचे ट्युब होत्या. स्क्रिवेपर असतील किंवा मर्क्युरी वेपर असतील त्याच्या जागी आपण एल.ई.डी.लाईटस लावणार आहोत.एल.ई.डी.च्या बाबतीत एक तांत्रिक बाब सर्व सदस्यांनी लक्षात घ्याव्या अशी माझी विनंती आहे. एखाद्या ठिकाणी ठराविक प्रकाश पातळी लेव्हल मेनटेन करणे इतर पध्दतीचे जेवढे व्हॅटचे दिवे लागतात त्यापेक्षा कमी व्हॅटचे दिवे एल.ई.डी.चे लागतात. एल.ई.डी.लाईटस मध्ये जे काही कंझम्पशन आहे. ते उदारणार्थ जर आपण विचारात घेतला तर ४० व्हॅटची जर ट्युब असेल तर साधारणता त्याच्यावरती ४६ ते ४७ व्हॅट एक्व्युअली खर्च पडते. म्हणजे त्याच्यामध्ये लॅसेस राहतात.एल.ई.डी.मध्ये लॅसेस नाही. म्हणजे जर आपण ७० व्हॅटची एल.ई.डी.लावली तर एक्व्युअली विज ही ७० व्हॅटच वापरली जाते. त्यामुळे एम.ई.सी.बीच्या मिटर मधुन सुध्दा आपल्याला बिल ७० व्हॅटचच येतो. या दोन्ही कारणामुळे आपल्याला बचत होणे अपेक्षित आहे. अर्थात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, बऱ्याच ठिकाणी आपल्या स्ट्रिट लाईट वरती आपले दिवे नाही किंवा असलेले दिवे बंद आहे. अश्या ठिकाणी जर आपण नव्याने लाईट बसविले तर त्या ठिकाणी सेव्हींग होणार नाही परंतु ओवर ऑल जर संपुर्ण शहराचा विचार केला तर आपल्याला विज बचत निश्चित होऊ शकेल. किती होईल हे प्रोजेक्ट पुर्ण झाल्यावर आपल्या लक्षात येईल. पण सर्वसाधारण गणित जर बघितल तर व्हॅट कमी लागले तर एनर्जी कंझम्पशन कमी होणार आहे. अर्थातच आपल्याला येणार बिल कमी होणार आहे. त्यामुळे जर पुर्ण शहराच जर विचार केला, तर हा प्रकल्प महानगरपालिकेच्या दृष्टीने, प्रशासकीय दृष्टीने आणि विज बचतीच्या आर्थिक दृष्टीने सुध्दा आपल्याला किफायती राहील. फक्त हा प्रोजेक्ट आपण कंपनीच्या मागे लागुन पुर्ण करुन घेण गरजेच आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ही कंपनी परत आपल्याला फसविणार नाही किंवा...

**मा.आयुक्त :-** एक आपण खात्री पाळायला पाहिजे की, त्यांच्या कडुन ज्या गोष्टी पुर्ण होतील त्याच्यानंतरच त्यांना ह्या प्रोजेक्टच कम्प्लीशन सर्टीफिकेट देणार आहोत. मागच्या दिड वर्षामध्ये जर आपण बघितल तर जेवढ काम झाल त्याच पार्शियल कम्प्लीशन आम्हाला द्या या पध्दतीची ही कंपनीची मागणी होती पण महानगरपालिकेच हित विचारात घेऊन आपण त्यांना कुठल्याही पध्दतीच पार्शियल कम्प्लीशन त्यांना नाकारलेल आहे.आणि पुर्ण प्रोजेक्ट पुर्ण झाल्यानंतर आपल महानगरपालिकेच पुर्ण समाधान झाल आहे आणि आपल्या करारनाम्यामधील पुर्ण गोष्टींची पुर्तता झाली हे गृहीत धरल्यानंतरच आपण त्यांना कम्प्लीशन सर्टीफिकेट देणार आहोत. आणि त्याच्यानंतरच त्याच एस.ओ.एस.अकाऊंटच पेमेंट चालु होणार आहे.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ मंजुर आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब मला बोलायचे आहे,

**मा.महापौर :-** बोला अप्पासाहेब,

**श्री.कैलास सोनवणे :-** आता या विषयावर चर्चा भरपुर झाली सगळयांच समाधान झाल असेल तर, एक मिनीट नितीन भाऊ आता तुम्ही जे प्रश्न विचारता आहे ना, ते प्रश्न तुम्ही ऑफिसला जाऊन जरी विचारले तर चालेल, महासभेत हे प्रश्न विचारण्याची आवश्यकता आहे मला असे वाटत नाही. तुम्ही पर्सनल बोलुन घ्या एस.एस.पाटीलांशी आणि

महापौर साहेब   माझी विनंती आहे की, याच्यानंतरचे विषय क्र.९,१०,११,१२ हे आमच्याकडुन मान्य केलेले आहे ज्यांना याच्यावरती चर्चा करायची आहे त्यांनी याच्यावर चर्चा करावी.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ आदरणीय विष्णु भाऊ,विषय क्र.८,रियाज भाई, विष्णु भाऊ विषय क्र.८ मंजुर आहे का सर्वानुमते ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मनपाच हित लक्षात घेता आपण त्याला मान्यता द्यावी पण येणाऱ्या काळामध्ये जळगांव शहराला न्याय मिळेल अशी आशा करुन.

**नगरसचिव :-** रियाज भाई, रियाज भाई.

**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार जे आहे ते.

**नगरसचिव :-** पण सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर

**श्री.दिलीप पोकळे :-** विषय मंजुर आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरात महानगरपालिका हद्दीत एस्को तत्वावर ईईएसएलच्या माध्यमातुन एलईडी पथदिवे बसविणेचा प्रस्ताव व करारनामा महासभा ठराव क्रं.१२ दि.११/१०/२०१८ अन्वये महासभेने मान्य करुन धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने मनपा व ईईएसएल या दोघांमध्ये व्दिपक्षीय करार करण्यात आलेला असुन जशमनपा कार्यादेश क्रं./विदयुत/३३/दि.२९/११/२०१८ अन्वये ईईएसएल कंपनीस कार्यादेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

ऊर्जा संवर्धन प्रकल्प राबवितांना नवीन ऊर्जा विज बचतीचे एलईडी पथदिवे बसविणेपुर्वी सदर कामी केलेल्या व्दिपक्षीय करारातील अटी शर्तीमध्ये नमुद केलेनुसार शहरातील रस्त्यावरील अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांचा सर्व्हे करुन त्याचे सदयाचे वॅटेज प्रकाश पातळीची मोजणी करुन त्याजागी राष्ट्रीय प्रकाश मानांकना नुसार योग्य क्षमतेचे (वॅटेजचे) पथदिवे बसविणे कामी प्रकल्प उभारणी आराखडा मनपाकडे सादर करुन कामाला प्रत्यक्ष सुरुवात करणे आवश्यक होते. मात्र ईईएसएल कंपनीने कोणताही आराखडा सादर न करता कामास सुरुवात केलेली होती. आजतागायत ईईएसएल कंपनीकडून ७९५३ एलईडी पथदिवे बसविण्यात आलेले आहे.

महानगरपालिका व ईईएसएल या दोंघामध्ये झालेल्या व्दिपक्षीय करारनामानुसार / अटी शर्तीनुसार ईईएसएलमार्फत काम करण्यात येत नसल्याने तसेच करण्यात येत असलेले काम सुध्दा असमाधानकारक असल्याने दि.०६/०६/२०२० रोजीच्या आयोजीत महासभेत मनपा सदस्यांमार्फत लक्षवेधी सुचना मांडण्यात येवून महासभा ठराव क्रं.१४७ दि.०६/०६/२०२० अन्वये ईईएसएलला दिलेले काम रद्द करणे बाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येवून करारनामा अटी शर्तीनुसार ईईएसएलला ३० दिवसांची नोटीस बजावून कायदेशीर बाबींची पुर्तता करुन ईईएसएलला दिलेले काम रद्द करणे बाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करणे बाबत सुचित करण्यात आले होते.

महानगरपालिकेमार्फत मनपा पत्र क्रं.५०४ दि.१७/०७/२०१९ अन्वये ईईएसएल कंपनीस काम रद्द करणे संदर्भात ३० दिवसांची नोटीस बजावण्यात आलेली होती. नोटीसच्या अनुषंगाने ईईएसएलकडुन त्यांचेकडील पत्र क्रं.९०३८ दि.२९/०८/२०१९ अन्वये पत्र प्राप्त झालेले होते. पत्रासोबत त्यांनी सर्व्हे रिपोर्ट / डीपीआर तसेच पुढील कामाचे नियोजन ॲक्शन प्लॅन सादर केलेला होता. तसेच उर्वरीत काम पुर्ण करणेस परवानगी मिळणे बाबत मागणी केलेली होती. तथापी ॲक्शन प्लॅननुसार काम करण्यात आलेले नाही.

वेळोवेळी उपायुक्त यांचेकडेस ईईएसएलच्या प्रतिनिधी समवेत मनपा प्रतिनिधींची बैठक आयोजीत करण्यात येवून कामाच्या संदर्भात सर्व्हे रिपोर्ट तथा डीपीआरसह विविध मुदयांवर चर्चा झालेली होती. ईईएसएलने दिलेल्या डिपीआर तथा सर्व्हे रिपोर्टमध्ये मनपा मार्फत काही सुधारणा सुचविण्यात आलेल्या होत्या. ईईएसएलमार्फत शहरात बसविण्यात आलेले सदोष ७० वॅटचे एलईडी पथदिवे बदलविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. साधारण १५५०० पोलवर नंबर टाकण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापी बसविण्यात आलेल्या एलईडी पथदिव्यांपैकी बंद

एलईडी पथदिवे बदलविण्यात आलेले नाहीत. एकंदरीत ईईएसएल मार्फत एलईडी बसविण्याचे काम करण्यात येत नव्हते.

दि.१३/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये ईईएसएलने कामास मुदतवाढ मिळणे बाबत विनंती केली असता मनपाने मा.उपसंचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना पत्र देण्यात येवून ईईएसएलला काम करण्यास मुदतवाढ देणे संदर्भात मार्गदर्शन मागविण्यात आले असता मा.उपसंचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी ईईएसएल कंपनीने काम पार पाडणे करीताचा आवश्यक Bar Chart सादर केल्यानंतर ईईएसएलला काम करणेस मुदतवाढ देणे क्रमप्राप्त असलेबाबत ईईएसएल कंपनीस कळविलेले आहे.

आयुक्त यांच्या कक्षात दि.२०/१०/२०२० व दि.२८/१०/२०२० रोजी ईईएसएलच्या प्रतिनिधी सोबत बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. बैठकीत मनपा प्रतिनिधी व ईईएसएल प्रतिनिधी, ईईएसएल नियुक्त मक्तेदार दक्ष इलेक्ट्रीकल यांचे प्रतिनिधी यांनी एकत्रिपणे एकुण ६ टिम तयार करुन शहरात एलईडी पथदिवे बसविणेपुर्वी व बसविले नंतर लक्स मेझरमेंट घेणे बाबत निर्णय झालेला असुन लक्स मेझरमेंटप्रमाणे पोलवर किती क्षमतेचे एलईडी पथदिवे बसविणे आवश्यक आहे. याबाबत सर्व्हेक्षण करणाऱ्या टिमने निर्णय घेवून त्याचा अंर्तभाव डीपीआर तथा सर्व्हेक्षण रिपोर्टमध्ये करुन तदनंतर निश्चित केलेनुसार पोलवर एलईडी पथदिवे बसविण्याची कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ईईएसएलमार्फत संथगतीने काम करण्यात येत असून मनपास अपेक्षीत प्रतिसाद मिळत नव्हता महानगरपालिकेमध्ये लोकप्रतिनिधी, महानगरपालिका पदाधिकारी व नगरसेवक यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत सदरहु प्रकल्प तात्काळ पुर्ण करणे बाबत लोक प्रतिनिधी यांनी महानगरपालिका प्रशासनास सुचना केलेल्या आहेत. महासभा ठराव क्रं.१४७ दि.०६/०६/२०२० अन्वये ईईएसएलला दिलेले काम रद्द करणे बाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येवून करारनामा अटी शर्तीनुसार ईईएसएलला ३० दिवसाची नोटीस बजावून कायदेशीर बाबींची पुर्तता करुन ईईएसएलला दिलेले काम रद्द करणे बाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करणेचा ठराव पारित झालेला असल्याने प्रकल्प पुर्ण करणे करीता महासभेची मान्यता आवश्यक असलेची बाब आयुक्त यांनी बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व लोक प्रतिनिधींना अवगत करुन दिली असता बैठकीत उपस्थित लोक प्रतिनिधी, मनपा पदाधिकारी तसेच मनपा सदस्य यांनी महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन सदरहु प्रकल्प पुर्ण करणेबाबत मनपा प्रशासनास सुचना केलेल्या आहेत.

आयुक्त यांच्या कडेस ईईएसएल चे प्रतिनिधी व मनपा अधिकारी यांच्या बैठकीतील चर्चेनुसार लोकप्रतिनिधी, मनपा पदाधिकारी यांनी आढावा बैठकित दिलेल्या सुचनेनुसार महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन ईईएसएल मार्फत प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत विदयुत विभागाच्या युनिट अभियंता यांना आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

आयुक्त यांच्याकडे झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार ईईएसएलने प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने उक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात आलेली असुन महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन आयुक्त यांच्या मान्यतेने बैठकीत चर्चा झालेनुसार तसेच मनपा व ईईएसएलला या दोघांमध्ये झालेल्या व्दिपक्षीय करारनामानुसार प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यास ईईएसएलला परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने ३१ मार्च २०२० पावेतो संपुर्ण जळगांव शहरात ईईएसएलकडून एलईडी पथदिवे बसवुन घेण्याची कार्यवाही पूर्ण करावी. त्याशिवाय त्यांना कंम्पलिशन सर्टीफिकेट देण्यात येऊ नये. सदर मूदतीत कार्यवाही पूर्ण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करून घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत प्रभाग क्रं.०६ गणेश नगर येथील जेलच्या मागील जागेत सार्वजनीक शौचालय बांधणे ऐवजी प्रभाग क्रं.०६ अंतर्गत छत्रपती शाहु

**महाराज व्यापारी संकुलाच्या मागील बाजुस सार्वजनीक शौचालय बांधकाम करणे असा बदल करण्यास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.**

**श्री.धिरज सोनवणे :-** महापौर महोदया, मला बोलायच आहे या विषयावर.

**मा.महापौर :-** बोला सोनवणे भाऊ.

**श्री.धिरज सोनवणे :-** महापौर महोदया, या टॉयलेट बनविणेसाठी पहिले या जागेला मंजुरी मिळालेली होती तर याची जागा बदल करण्याच कारण काय ? हा प्रश्न मला प्रशासनाला विचारायचा आहे. ज्या ठिकाणी मंजुर झालेली होती त्याची जागा बदलविण्याच कारण काय ?

**मा.महापौर :-** सोनवणे भाऊ, डॉकेट मध्ये दिलेल आहे, तुम्ही वाचल नाही का ?

**श्री.धिरज सोनवणे :-** हो ना, मला भोसले साहेबांना विचारायच आहे, त्यांनी सांगाव कारण सांगाव ना.

**शहर अभियंता, श्री.भोसले** :- मा.महापौर, मा.उपमहापौर तसेच सन्मा.सभागृह, जेल प्रशासनाने पत्र दिलेल आहे की, जेलच्या भिंती पासुन १०० फुटापर्यंत कोणतही बांधकाम परमीसीबल नाही अस त्यांच पत्र आहे. सुरक्षीतेच्या दृष्टीने.

**श्री.धिरज सोनवणे :-** साहेब याच्या आगोदर आपल्या त्या ठिकाणी २० सिट्सच्या टॉयलेट वापरण्यात येत आहे. चला हे मान्य आहे की, त्यांच्या अडचणीमुळे आपण ही जागा बदलविली. त्याच जागी आपली टी.पी.स्किम -२ भुखंड क्र.४८७ हा आपला आरक्षित भुखंड आहे. ते भुखंड आपण लहान मुलांना खेळण्यासाठी सोडलेल आहे. त्या जागी महापालिकेने तेथे ७ ते ८ लाख रुपये खर्च करुन कुंपन भिंत बांधण्यात आलेली आहे. परंतु कारगृह प्रशासनाने जसा त्या भिंतीच काम पुर्ण झाल त्या दिवसापासुन त्या जागेला कुलुप लावलेल आहे. ही वारंवार मी तुम्हाला सुचना केलेली आहे. कुठल्या प्रकारची परवानगी घेवुन त्यांनी या जागेला कुलुप लावल. या भागातील रहिवाश्यांसाठी जे सोडलेले भुखंड आहे. त्यांना वापरासाठी जे दोघी भुखंड आहे ते आपण खाजगी संस्थेला वापरण्यासाठी दिलेले आहे. नागरीकांना वापर करु देत नाही,फिरु देत नाही, लहान मुलांना खेळु देत नाही. ही एकमेव आपली मालकीची जागा असतांना या जागेवर आपण ऐवढा खर्च केला आणि आज जेल प्रशासन कुठली ही सुचना न देता किंवा माहिती न देता त्या जागेला एक महिना झाला आज त्या जागेला कुलुप लावलेल आहे. लहान मुलं जे तेथे खेळता त्यांना हकलता, जेलच्या स्थापनेपासुन आजपर्यंत जेलच्या सुरक्षतेला इथल्या नागरीकांपासुन कुठल्याही प्रकारचा त्रास झालेला नाही. मग आजच त्यांना काय त्रास होत आहे. त्यांना जर त्रास होत आहे. त्यांना जर ती जागा ताब्यात घ्यायची आहे. त्यांनी रितसर परवानगी घ्यावी. महापालिकेची घ्यावी जनरल बॉडीची घ्यावी. पण ही कुठली पध्दत आहे की, त्या जागेला त्यांनी कुलुप लावुन दिल आहे, आणि त्यांनी त्यांच्या नियमानुसार त्या जागेवर ताबा घेतलेला आहे. याच्यावर आता पर्यंत आपण काय केल. मी तर तुम्हाला वारंवार तोंडी सुचना केलेल्या आहे या विषयावर.

**शहर अभियंता, श्री.भोसले** :- मी स्वत: त्या जेलर प्रशासनाकडुन कुलुप उघडल पण जेव्हा त्यांना अस वाटत की, काही तरी घटीत होईल तेव्हा ते कुलुप लावुन घेतात.

**श्री.धिरज सोनवणे :-** जेलच्या स्थापनेपासुन आज पर्यंत त्यांना या लहान मुलांपासुन त्रास झालेला नाही.

**मा.महापौर :-** आवाज येत नाही तुमचा.बोला.

**श्री.धिरज सोनवणे :-** ताई ८ लाख रुपये आपण नागरीकांच्या सुविधेसाठी तेथे खर्च केलेले आहे. त्या जागेला त्यांनी कुलुप लावल. कुठलीही आपली प्रशासनाची परवानगी घेतलेली नाही. आजपण तेथे कुलुप आहे तेथील लोकांना तेथे वावरु दिलं जात नाही.लहान मुलांना तेथुन हकलुन देत आहे. कारगृहाच्या स्थापनेपासुन त्यांना जर त्या नागरीकांपासुन त्रास झाला नाही तर आजच कस काय त्रास होत आहे. आणि अशी कुठलीही परवानगी न घेता ते जागा ताब्यात घेऊ शकता का ?

**शहर अभियंता, श्री.भोसले** :- सुरक्षेसाठी त्या जागेला कुलुप लावुन घेता ते.ऐवढ त्यांनी सांगितल मला.

**श्री.धिरज सोनवणे :-** मी तुम्हाला तेच सांगत आहे साहेब, सुरक्षेसाठी सिक्युरिटी गार्ड तेथे ठेवावे. लहान मुलं जर खेळत आहे तर त्यांना तेथे खेळु देण्यात हरकत काय आहे? आणि नागरीकांच्या जे जागा आहे जे खाजगी संस्थेंना दिलेल्या आहेत. त्या जागा खाली करुन द्या ही जागा त्यांच्या ताब्यात देऊन टाका. लहान मुलं खेळतील कुठे. आपल्याला मागणी करुन त्यांनी ती जागा रितसर ताब्यात घ्यावी आपल्याला अडचण नसेल तर, पण ही जर नागरीकांना उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर जर ते असे गैरप्रशासन त्यांच्या दादागीऱ्यांनी कुलुप लावत आहे आणि आपण डोळे मिटुन बघतो आहे. तर हे कुठेतरी चुकीच आहे.

**शहर अभियंता, श्री.भोसले** :- आज लेखी कळवतो त्यांना या बाबत.

**श्री.धिरज सोनवणे :-** हो सर.

**श्री.विष्णु भंगाळे :-** धिरज भाऊंनी जस म्हटलं, ही जी जेल आहे खुप वर्षापुर्वी जळगांव शहराच्या बाहेर होती जवळपास अस म्हटल तर हरकत नाही. परंतु आता लोक वस्ती वाढलेली आहे. या महासभेत एक असा ठराव केला पाहिजे अस वाटत की, येणाऱ्या काळामध्ये भाविय काळामधील परिस्थिती लक्षात घेता, बाहेर कुठेतरी त्यांनी प्रस्तावीत जागा घ्यावी व पुढील काळामध्ये त्यांनी तिचा निर्णय घ्यावा. ती जेल ट्रान्सफर करण्याच्या बाबतीतला म्हणजे येणाऱ्या काळात शहरातील लोकांना त्याचा त्रास होणार नाही.

**श्री.धिरज सोनवणे :-** बरोबर आहे विष्णु भाऊ तुमच म्हणण, कारण रोज स्थानिक नागरीक तक्रार करतात. आणि हे होणे गरजेचे आहे नागरीकांच्या हिताच्या माध्यमातुन हा निर्णय होणे गरजेच आहे. माझ समर्थन आहे आपल्याला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** याचा विचार करावा महासभेने.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ प्रस्ताव मान्य आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे:-** मान्य करा, मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** अमित काळे,

**श्री.अमित काळे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, सार्वजनीक बांधकाम विभाग अंतर्गत आवक क्रं.३४ दि.०३/०९/२०२० नुसार अधीक्षक,जळगांव जिल्हा कारागृह वर्ग-२ जळगांव यांचा जळगांव जिल्हा कारागृह-२ च्या मागील तटभिंतीलगत १०० मीटर परिसरामध्ये कोणतेही बांधकाम न करणेबाबतचे पत्र प्राप्त आहे. प्रभाग क्रं.०६ अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंर्तभूत गणेश नगर येथील जेलच्या मागील जागेत सार्वजनीक शौचालय बांधणेकामी रक्कम रु.२३२२११५/- मात्रचे कार्यादेश संदर्भ क्रं.पवडी- ८५ दि.१२/०९/२०१९ नुसार मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे यांस देण्यात आलेले आहे सदर काम करणेकामी मक्तेदार यांना प्रत्यक्ष जागी रेखाकंन देते वेळी जिल्हा कारागृह कर्मचारी यांनी अधिक्षक यांना सुचीत केल्यानंतर अधिक्षक यांनी कारागृह परिसराभोवती तट भिंती लगत कोणतेही बांधकाम करावयाचे असल्यास कारागृह विभागाची स्थायी सल्लागार समिती, गृह विभाग, नगर विकास विभाग इत्यादी विभागांची पुर्व संमती घेणे अनिवार्य असल्याबाबत निर्देशीत केलेले असुन कारागृह तट भिंती लगत १०० मीटर अंतरात कोणतेही प्रकारचे बांधकाम न करण्याबाबत सुचित केलेले आहे. कार्यादेशानुसार प्रस्तावीत २० सीट क्षमता असलेले बांधकाम कारागृह तटभिंतीपासुन १०० मीटर लांबीच्या आत येत असल्याने कारागृह अक्षिक्षक यांच्या सुचनेनुसार सदर काम सुरु करण्यात आलेले नव्हते उक्त कार्यादेशाची मुदत ०६ महिने असुन दिनांक ११/०३/२०२० रोजी संपूष्टात आलेली आहे तथापि स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० प्राप्त निधी वापराची मुदत मार्च २०२१ पावेतो शिल्लक आहे.

तरी प्रभाग क्रं.०६ अंतर्गत छत्रपती शाहु महाराज व्यापारी संकुलाच्या मागील बाजुस असलेल्या सार्वजनीक शौचालयाबाबत स्थानिक नागरीक, सन्मा.नगरसेवक, आरोग्य निरीक्षक इत्यादी यांची वारंवार तक्रार आहे. म्हणून प्रभाग क्रं.०६ गणेश नगर येथील जेलच्या मागील जागेत सार्वजनीक शौचालय बांधणेकामी रक्कम रु.२३२२११५/- मात्रचे कार्यादेश संदर्भ क्रं.८५ दि.१२/०९/२०१९ मध्ये बदल करुन प्रभाग क्रं.०६ अंतर्गत छत्रपती शाहु महाराज व्यापारी संकुलाच्या मागील बाजुस सार्वजनीक शौचालय बांधकाम करणेस व कार्यादेशाच्या रक्कमेत वाढ न होऊ देता बचत निधी मध्ये शौचालयाचे स्थळ बदलविणेस तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत प्राप्त निधीचा पुर्व वापर होणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धीरज मुरलीधर**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** जळगांव शहरास कचरा मुक्त शहर (तिन स्टार) GFC ३ Star तसेच ODF ++ हागणदारी मुक्त शहर घोषित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** अनुमोदन आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर ताई मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** बरडे भाऊ बोला.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब, हागणदारी मुक्त झाल आहे का आपल शहर ?

**मा.महापौर :-** सर्वांनी स्पिकर बंद करावे.

**मा.सहाय्यक आयुक्त,श्री.पवन पाटील :-** सन्मा.महापौर व सन्मा.सभागृह जळगांव शहर हा ODF म्हणुन हागणदारी मुक्त झालं आहे, त्यानंतर आपण ODF+ साठी सुध्दा घोषित झालो आहे. आता आपण ODF++ साठी अप्लाय करत आहोत. तशी महासभेची मान्यता मिळाल्यानंतर आपण शासनाला पत्र पाठवु. शासनाकडुन त्याच थर्डपार्टी इन्स्पेक्शन केल जाईल. आणि त्यानंतर आपल्या ODF++ चा दर्जा शासनाकडुन देण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब, शहर हागणदारी मुक्त झाल आहे का ते बघा. तुम्ही कसे काय म्हणतात हागणदारी मुक्त झालेल आहे शहर. येऊन बघा जरा समता नगरच्या आजुबाजुला. शौचालयाची सफाई नाही, तेथील सर्व लाईट बंद आहे. कसे काय लोक तेथे शौचालयात जातील.

**मा.सहाय्यक आयुक्त,श्री.पवन पाटील :-** समता नगर मधील शौचालयांची पाहणी करुन त्यात काय काय दुरुस्त्या करता येईल ते लवकरात लवकर करण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** लाईट नाही, दुरुस्त्या झालेल्या आहे परंतु स्वच्छता होत नाही. पाण्याची व्यवस्था होत नाही.

**मा.सहाय्यक आयुक्त,श्री.पवन पाटील :-** त्या शौचालयाबाबत जे काही त्रृट्या असतील तेथील पाणी आणि लाईटची व्यवस्था तात्काळ करण्यात येईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब, यांना सुचना कराव्या.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बोलायच आहे.

**मा.महापौर :-** बोला प्रशांत.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, आमच्या भागामध्ये उपमहापौरांचा दौरा झाला होता. त्या दौऱ्यामध्ये ३० सिट्सचे शौचालय बांधण्यात आलेले आहे. त्या शौचालयांना जाणेसाठी रस्ता नाही. तेथे जी पाण्याची बोरींग आहे ती बंद पडलेली आहे. उपमहापौर साहेबांना विचारुन घ्या.तेथे उपमहापौर साहेब आले होते. प्रभाग क्र.१५ मध्ये.

**मा.उपमहापौर :-** प्रशांत मी सांगतो तुला, ते इस्टीमेट करुन स्वच्छ भारत अभियान अंतर्गत करुन देणार आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** ओके, धन्यवाद.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ मंजुर ना हा विषय.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मंजुर.

**नगरसचिव :-** रियाज भाई.

**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०२१ चे गुणांकन मिळविणे करीता कचरा मुक्त शहर (GFC ३ Star) तसेच हागणदारी मुक्त शहर (ODF ++) घोषीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये भाग घेतलेल्या सर्व महानगरपालिकांनी सन २०२१ च्या स्वच्छ सर्वेक्षण मध्ये भाग घेणे बंधनकारक आहे.

शासनाकडून सर्व महानगरपालिकांचे सन २०२१ मध्ये त्रयस्थ संस्थेमार्फत शहराची कचरा मुक्त शहर (GFC ३ Star) मानांकन तसेच हागणदारी मुक्त शहर (ODF ++) तपासणी/मुल्यांकन करणेत येणार आहे.

केलेल्या तपासणीच्या आधारे मनपा तर्फे आयुक्त यांनी महासभेच्या मान्यतेने प्रस्ताव मा.राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना सादर करणे क्रमप्राप्त आहे.

त्यास्तव जळगांव शहरास स्वच्छ सर्वेक्षण २०२१ चे गुणांकन मिळविणे करीता कचरा मुक्त शहर (GFC ३ Star मानांकन) आणि हागणदारी मुक्त शहर (ODF ++) घोषीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** जळगांव महानगरपालिका क्षेत्रात सेप्टीक टँक मधुन दैनंदिन जमा होणाऱ्या मैलावर प्रक्रिया केंद्राचे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करुन शासनाकडेस पुढील मान्यतेसाठी प्रस्तावपाठविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ मान्य आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव महानगरपालिकेने १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून आव्हाणे शिवार गट नं.८६४ या ठिकाणी Fecal Sludge treatment plant बांधकामास शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर ठिकाणी केंद्राचे बांधकाम पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी Sludge Drying Bed मध्ये संकलन केलेला मैला टाकून यावर प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून यात आवश्यक असलेले साहीत्य पुरवठा करुन बसविणेचे १५ टक्के काम शिल्लक आहे.

सदर कामी शासनाकडून स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत जळगांव शहरातील १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून मैला प्रक्रिया केंद्र उभारणेकामी नमुना आराखडे, (type plan) अंदाजपत्रक, निविदा संच, करार मसुदा, कार्यादेश नमूना इत्यादी पुरविण्यात आलेले आहे. सदर कामास रक्कम रु.२५,८४,५२०/- खर्च अपेक्षित असून त्यास उपरोक्त निधीतून शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०१९/प्र.क्रं.१२४/नवि-३४ दि.०८/११/२०१९ अन्वये खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

१. सदर कामाचे अंदाजपत्रक Type plan नुसार तयार केले असून त्यात,
२. Lead Charges चा समावेश नाही. प्रत्यक्षात स्थानिक परीस्थिती विचारात घेवून मटेरीअल च्या Lead Charges चा दर परीगणना करुन त्याचा समावेश करावा.
३. नमुना अंदाजपत्रकात सर्व साधारण खोदाईच्या बाबींची तरतूद गृहीत धरण्यात आलेली असून कार्यक्षेत्रावर प्रत्यक्षात जो भूस्तर लागेल त्यानुसार कार्यवाही करावी.
४. नमुना प्राकलनात रॉयल्टी व जीएसटी कराचा समावेश नाही त्यामुळे जीएसटी, रॉयल्टी कर ठेकेदाराने अदा केलेल्या रकमेच्या आधारे अदा करण्यात यावे.
५. सदर प्राकलन हे Type Estimate असून Trail Pit Result प्रमाणे Excavation Strata असेल त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी.

६. नागरी स्वराज्य संस्थेकडे असलेल्या जागेवर परंतु प्रामुख्याने घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेल्या जागेमधेच प्रकल्पाची उभारणी करावी.

असे शासन निर्णयात निर्देश आहेत.

सदर कामी Type plan नुसार निविदा प्रक्रिया राबवून कामास सुरुवात करण्यात आली असून स्थापत्य काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

सदरचे काम हे आव्हाणे शिवार गट नं.८६४ या ठिकाणी करण्यात आलेले आहे या ठिकाणी २.०० मीटर खोदाईत कचरा असल्याने या ठिकाणी काम करण्यायोग्य तळ तयार करणे आवश्यक होते तसेच नमुना नकाशांमधील मापे ही नमुना आराखडयाशी सुसंगत नसल्याने एकंदरीत कामाच्या खर्चात रक्कम रु.६,६४,८७७/- मात्र वाढ झालेली आहे. झालेल्या वाढीचे विवरण खालील प्रमाणे,

अ) शासनाने पुरविलेले प्राकलन व नकाशांत असलेल्या तफावती मुळे होणारी वाढ रक्कम रु.२,५९,२४३/-

आ) प्रत्यक्षात जागेवरील परीस्थितीमुळे येणारा वाढीव खर्च रक्कम रु.४,०५,६३४/-

- सदर कामी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.३२,४९,३९८/- (जी.एस.टी.कर, गौण खनिज स्वामित्वधन रक्कम वगळून) तयार करुन तांत्रिक मान्यतेसाठी सादर केले होते सदर सुधारीत अंदाजपत्राकास, सुधारीत तांत्रिक मान्यता, कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग जळगाव यांचे पत्र क्रं.जा.क्रं.चिशा/तां.मा./४८/१७४२/२०२० दिनांक ३०/०७/२०२० अन्वये प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेनूसार जळगांव महानगरपालिका क्षेत्रात सेप्टीक टँक मधुन दैनंदिन जमा होणाऱ्या मैलावर प्रक्रिया केंद्राचे वाढीव खर्च रक्कम रु.६,६४,८७७/- सह सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु.३२,४९,३९८/- मात्रला तसेच सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडेस पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** स्वच्छ भारत अभियान(नागरी) अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे कामी सुधारीत अंदाजपत्रक शासनाकडेस सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, मला बोलायच आहे, विषय क्र.१२ वर.

**मा.महापौर :-** बोला प्रशांत भाऊ.

**मा.उपमहापौर :-** बोला प्रशांत भाऊ बोला.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्रकल्प करीता आपण सुधारीत अंदाजपत्रक शासनाकडे पाठवले होते याच्यामध्ये

**मा.महापौर :-** बोला प्रशांत भाऊ आवाज येत नाहीये तुमचा

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** बोला प्रशांत भाऊ , पुढचा विषय घ्या विष्णुभाऊंचाही आवाज येत नाहीये, विष्णुभाऊ आपला आवाज येत नाहीये.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई माझा आवाज येतोय का

**मा.महापौर :-** येतोय पण तो विषय झालाय आता

**श्री.प्रशांत नाईक :-** नाही नाही १२ नंबर मध्ये

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, आम्ही तुम्हाला काल पत्र दिलं होत शिवसेनेच्या वतीने घनकचरा प्रकल्प अहवाल खालील कामे अंर्तभुत करणेबाबतच. आपण जो प्रस्ताव पाठवत आहे. त्याच्यात ते कामे अॅड करण्यात यावे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई, एक पत्र आम्ही आमचे सर्व शिवसेनेच्या नगरसेवकांच्या माध्यमातुन आपल्याला शहरातील काही वाढीव निधी, आणि ज्या गाडया शहराच्या दृष्टीने लागत असतील. त्या पत्राच्या माध्यमातुन आपल्याला कळविलेल आहे. आमची विनंती आहे. त्या माध्यमातुन तेवढ निधी वाढुन द्यावा.

**मा.महापौर :-** पुढच्या सभेत करुन घेऊ.

**श्री.प्रशांत नाईक :-** नाही,नाही या सभेला करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** या सभेला करायला काही हरकत नाही.

**मा.महापौर :-** तुम्ही काल दिला मला तो विषय.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई, त्या पत्रावरती ८-१० नगरसेवकांनी सह्या करुन दिलेला आहे ताई.

**मा.महापौर :-** पुढच्या सभेत घ्या.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, एक विषय लक्षात घ्या. आपण जे डी.पी.आर. पाठविता शासनाला.

**मा.उपमहापौर :-** दिपमालाताई बोला,

**सौ.दिपमाला काळे :-** ताई, विषय क्र.१२ बद्दल बोलायच आहे. सदरील कामावरुन असे लक्षात येते की, केंद्र राज्य शासनची योजना आहे. ते फक्त योगेश बोरोले आणि बोरोले बंधुच चालवत आहे. उपायुक्त आणि आयुक्त त्यांत काहीच भाग नाही घेत आहे. याच्यावर लोकप्रतिनिधी फक्त नावालाच आहे. याचं मला खंत वाटत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आम्ही शिवसेनाने वाढीव निधीसाठी प्रस्तावना दिलेली आहे. त्याला मंजुरी द्यावी महापौर महोदया. अप्पा साहेब त्याकडे लक्ष द्याव.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर महोदया, उपमहापौर साहेब,

**मा.उपमहापौर :-** बोला प्रशांत भाऊ.

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ आपण जे डी.पी.आर. पाठविता ना शासनाकडे, त्यात फक्त सुधारीत डी.पी.आर.मध्ये मोटर विहीकल घेतलेल्या आहे. ज्या प्रत्येक प्रभागासाठी लागणाऱ्या वस्तु आहे. अप्पा साहेब,

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ मान्य करायचा का विषय ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, वाढीव प्रस्तावाला मंजुरी दिली का ?

**मा.उपमहापौर :-** विष्णु भाऊ तुमचा मुद्दा सांगा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** प्रशांत जो मुद्दा मांडत आहे. त्यात काही गोष्टी वाढीव आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आज रोजी पटलावर असलेला विषय मान्य करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** पोकळे साहेब व्यक्तीगत विषय नाही तो. शहराचा विषय आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** शहराचा विषय आहे आणि शहराच्या दृष्टीने विषय आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** पोकळे साहेब पहिले विषय लक्षात घ्या. शासनाला जे पाठविता त्याचा सुधारीत डी.पी.आर.केलेला आहे.

**मा.उपमहापौर :-** बाकीच्यांनी स्पीकर बंद करा. प्रशांत भाऊ तुम्ही बोला फक्त. आवाज व्यवस्थीत येत नाही. प्रत्येकाने स्पीकर बंद करा.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, एक लक्षात घ्या. आपला ज्या ठिकाणी कचरा डंपींग होत. तेथे आपला जे.सी.बी. अटकुन पडलेल आहे. त्या ठिकाणी ते जे.सी.बी. वारंवार पंक्चर होत असत. तर आपण सुधारीत डी.पी.आर.मध्ये आपण एक डिझल मध्ये गाडयांची मागणी केलेली आहे. दुसरी गोष्ट स्कॅलेटर मशिन एक होती. आपण चारही प्रभागांसाठी ४ स्कॅलेटर मशिनची मागणी केलेली आहे.आपल्याकडे दोन लॅडर डंपर आहे आपण दोनची मागणी करत आहे. आपल्याकडे जे दोन आहे कॅम्पॅक्टर त्याची आपण २ ची मागणी करत आहे. आणि नाला स्कॅलेटर ही चार ची मागणी करत आहे आपण. विषय समजुन घ्या पहिले काय आहे तर.

**मा.उपमहापौर :-** प्रशांत भाऊ विषय समजला आम्हाला, आता विष्णु भाऊ तुम्ही बोला.

**मा.महापौर :-** बोला विष्णु भाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** शहराच्या प्रमाणे या गोष्टींची आवश्यकता आहे. तर या वाहनांची उपलब्धता आणि पुढे होणारे कामे सोईस्कर होतील शहराच्या दृष्टीने याच्यासाठी हे सुचवलेले वाहन आहे. आणि शहराच्या दृष्टीने वाढलेले वाहन आहे. म्हणुन तुम्ही याला ॲड कराव. आणि आमची ही सुचना मान्य करावी ही आम्ही आपणास विनंती करत आहोत.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ, आयुक्त साहेब बोलत आहे उत्तर.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्यांच्या आता सभागृहात मांडलेल्या मुद्दयाच्या आधारे अस लक्षात येत आहे की, सन्मा.महापौरांना आपण काही निवेदन दिलेले आहे. ते शहराच्या कचरा व्यवस्थेची गरज विचारात घेऊन काही वाहनांची आपल्याला कमतरता भासत आहे. ह्या आपल्या सुचना स्वागतार्य आहे. आणि याच्यामध्ये आरोग्य विभागाशी चर्चा करुन आपण जे काही सुचना केलेल्या आहे. त्याची व्यवहारीकता आपण तपासु आणि खरोखर आरोग्य विभागाला काही ज्यादा वाहनांची गरज असेल तर तसा ही प्रस्ताव आपण जे सुधारीत प्रस्ताव करु त्याच्यामध्ये आपण त्या वाढीव खर्चाचा अंतरभाव करुन आपण तो राज्य शासनाला पाठवुन देऊ.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ मंजुर का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो, मंजुर मंजुर.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महासभा ठराव क्रं.७७३ दि.१६/१०/२०१७ अन्वये महासभेने रु.३१,१५,६९,१४०/- रकमेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी व तत्सम इतर उपांगे उभारणीस शासन नियुक्त सल्लागार ईकोप्रो,इंदौर यांनी तयार करुन सादर केलेल्या प्रकल्प अहवालास मान्यता प्रदान केलेली आहे. शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०१८/प्र.क्रं.४७/नवि-३४ दि.०१ मार्च २०१८ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रु.३०,७५,१६,३६१/- रकमेच्या प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता दिली आहे. शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०१८/प्र.क्रं.४७/नवि-३४ दि.०१ मार्च २०१८ अन्वये रु.३०,७५,१६,३६१/- खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. तदनंतर सुधारीत तांत्रिक मान्यता, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक पत्र क्रं.मुअ/नाशिक/चिशा/३०४९/२०१८ दि.२७/१२/२०१८ नुसार रक्कम रु.३०,३५,३१,४७४/- खर्चास मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर प्रकल्पाच्या कामात कचरा प्रक्रिया केंद्र, घनकचरा संकलन सुविधा, जुन्या कचऱ्यावर Biomining प्रक्रिया, वाहन खरेदी व तत्सम संबंधित कामांचा समावेश आहे. या अंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे बांधकाम आव्हाणे शिवारातील गट नं.८६४ या जागेवर प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर जागेवर महानगरपालिका हद्दीतील दैनंदीन संकलित होणारा कचरा जमा करण्यात येत आहे. प्रक्रिया केंद्राचे बांधकाम सुरु करण्याआधी या जुन्या कचऱ्यावर Biomining प्रक्रिया करुन जागा बांधकामासाठी रिक्त करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०१८/प्र.क्रं.४७/नवि-३४ दिनांक ०१ मार्च २०१८ अन्वये घनकचरा प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालात Biomining चे काम समाविष्ट असले तरीही सुरु करु नये याबाबत स्वतंत्रपणे सुचना देण्यात येतील असे नमूद आहे. त्यानुसार आरोग्य विभागास प्राप्त झालेल्या सुधारीत सुचनांनुसार या कामाची निविदा प्रक्रिया राबवून कार्यादेश दि.११/११/२०१९ रोजी निर्गमित करुन कामास सुरुवात केलेली आहे.

सदर प्रकल्पाअंतर्गत प्रक्रिया प्रकल्प व तत्सम बांधकामे रक्कम रु.१२,१४,७४,२०९/- ची असून या कामाचे कार्यादेश मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांना कार्यादेश क्रं.जमनपा/प्रकल्प/२८४ दिनांक २०/०९/२०१९ अन्वये दिलेले आहे. या मंजूर प्रकल्प अहवाला अंतर्गत जळगांव शहरात ०३ ठिकाणी Dry waste collection centre मंजूर झालेले आहेत तथापि त्याचे ठिकाण निश्चित करुन दिलेले नव्हते, परंतु प्राथमिक स्वरुपात सदरचे ०४ ही केंद्र तातडीने उभारण्याबाबत उपायुक्त,(आरोग्य), आरोग्य अधिकारी,

तसेच आयुक्त तथा मा.जिल्हाधिकारी यांचे निर्देशांनुसार कचरा हस्तांतरण केंद्राच्या बांधकामाची कामे जागा निश्चित करुन त्वरीत पुर्ण केलेली आहेत.

मध्यंतरीच्या कालावधीत Biomining काम पुर्ण झालेल्या ठराविक जागेवर जमीनीची धारण क्षमता - जमीन स्तराचे वर्गीकरण करण्याचे काम पुर्ण केलेले आहे. सदर कामाचा अहवाल प्राप्त झाला असुन त्यानुसार प्रकल्प अहवालातील बांधकामाच्या बाबींचे अवलोकन केले असता तांत्रिक दृष्टया सदर कामात बदल करणे आवश्यक असून या बाबत होत असलेले बदल विचारात घेता सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेने अहवाल तयार केलेला आहे. सदर कामी सुधारीत प्रकल्प अहवालाचे सादरीकरण दि.१८/११/२०२० रोजी आयुक्त यांचे कडेस केले असता यात चर्चेनुसार आवश्यक सुधारणा केलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| * मुळ प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाचा अंदाजित खर्च (दि.०१/०३/२०१८) | : | रु.३०,७५,१६,३६१/- |
| * प्रथम तांत्रिक मान्यता (दि.२७/१०/२०१७) | | रु.३०,७५,१६,३६१/- |
| * व्दितीय तांत्रिक मान्यता (दि.२७/१२/२०१८) | | रु.३०,३५,३१,४७४/- |
| * सुधारीत प्रकल्प अहवालानुसार येणारा खर्च | | रु.४९,६७,६७,६९१/- |
| * एकुण सुधारीत अंदाजपत्रकामुळे होणारी वाढ (प्रकल्प बांधकाम, विदयुत कामे, वाढीव बायोमायनिंग) | | रु.१९,३२,३६,२१७/- |

मंजूर तांत्रिक मान्यतेनुसार कामासाठी आर.सी.सी.संकल्पन तयार करुन त्याची तपासणी करणे, विदयुत व पाणी पुरवठा कामांसाठी ढोबळ तरतूद केली असल्याचे नमूद आहे मात्र प्रत्यक्षात मंजूर अंदाजपत्राकात तरतूद नव्हती या प्रकारचे अनेक बाबींमुळे अंदाजपत्रकात वाढ होत आहे.

उपरोक्त प्रमाणे इतर महानगरपालिका / नगरपालिका यांचे घनकचरा प्रकल्पाचे अहवाल मोठया प्रमाणावर सुधारीत झालेले असून त्यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

जळगांव शहर महानगरपालिका स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे मूळ प्रकल्प अहवालानुसार अंदाजित खर्च हा ३०.७५ कोटी एवढा (प्रकल्प खर्च) मंजूर करण्यात आलेला होता मात्र कार्यान्वयन तांत्रिक विभागाने आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीनुसार काही वाढीव बाबींचा समावेश केल्याने मंजूर प्रकल्प अहवालाच्या किमतीत बदल झाला असुन तदनुसार Revised DPR हा ४९.६७ कोटी एवढया रकमेचा झाला आहे. त्यानुसार रक्कम रुपये ४९,६७,६७,६९१/- च्या सुधारीत प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात येत आहे व त्यामुळे या वाढीव अंदाजपत्रकास सुधारीत तांत्रिक मान्यता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची घेणेस तसेच स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास राज्य शासनाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव राज्य शासनाकडेस पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १३)** तत्कालिन मनपा प्रशासनाने तयार केलेली अन्यायकारक प्रारुप सेवा प्रवेश नियमावलीत सुधारणा करुन फेर प्रस्ताव शासनाकडेस सादर करणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.सचिन भिमराव पाटील व इतर ३ सन्मा.सदस्य यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** प्रस्ताव मान्य अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विष्णु भाऊ मान्य आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मनपा प्रशासनाने दिनांक २८/०६/२०१९ रोजी सुधारीत प्रारुप सेवा प्रवेश नियमावली तयार करुन शासनाकडेस मान्यतेसाठी पाठविलेली आहे. तथापी सदर सेवा नियमावली शासनाकडे पाठविण्यापुर्वी कायदयानुसार कर्मचाऱ्यांना अवगत करणे, हरकती मागविणे तसेच महासभेची देखील मान्यता घेणे अपेक्षित होते. परंतू याबाबत कर्मचाऱ्यांना कोणतीही माहिती अवगत करुन देण्यात आलेली नाही. सेवा प्रवेश नियमावली हि कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. परंतू तत्कालिन प्रशासनाने मनपातील कार्यरत पदविकाधारक अभियंते, आरोग्य युनिट प्रमुख, लिपिक इत्यादी कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडेस दिलेल्या निवेदनांचा कोणताही विचार न करता सुधारीत प्रारुप सेवा प्रवेश नियमावलीचा प्रस्ताव परस्पर शासनाकडेस पाठविलेला आहे.

प्रारुप सेवा प्रवेश नियमावलीत मनपा आस्थापना सूचीवरील कार्यरत असलेल्या पदविकाधारक अभियंता यांना राज्य शासनाच्या उदा. जिल्हा परिषद, पाटबंधारे इत्यादी प्रमाणे सेवांतर्गत पदोन्नतीचे निकष व तरतूदी समाविष्ट करणे अपेक्षित होते. तथापी मनपा सेवेतील एकाच पदावर १५ ते २० वर्षापासून कार्यरत असलेले कर्मचारी व पदविकाधारक अभियंत्यांची सेवा व अनुभव ही बाब सेवांतर्गत पदोन्नतीचे निकषामध्ये विचारात घेण्यात आलेली नाही. तसेच सरळ सेवेने व सेवांतर्गत पदोन्नतीसाठी प्रस्तावित केलेले टक्केवारीचे प्रमाण, शैक्षणिक अर्हता, गुणोत्तराचे प्रमाण इत्यादी जाचक व अन्यायकारक अटींचा समावेश केलेला आहे.

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून यात काम करणारे कर्मचारी यांना सेवांतर्गत पदोन्नतीची शक्यता कमी असते. भविष्यात पदोन्नती मिळणार नसल्याने कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता असून कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह देखिल राहणार नाही. मनपा सेवेतील कर्मचाऱ्यांमध्ये कामाची आवड व उत्साह निर्माण व्हावा यासाठी सेवांतर्गत पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेसाठी खुले व विस्तारात्मक स्वरुपात पर्याय दिलेले नसल्यामुळे कर्मचाऱ्यांवर फार मोठा अन्याय होणार आहे. सदर कारणास्तव प्रारुप सेवा प्रवेश नियमावलीत प्रकर्षाने सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्याप्रमाणे बदल करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन तात्काळ सुधारीत प्रस्ताव शासनाकडेस पाठवावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १४)** प्र.क्र.१५ मेहरुण अंतर्गत साईबाबा मंदिरालगतचा रस्ता खडीकरणासह डांबरी करणे व आर.सी.सी.गटार बांधणे कामाचे प्रस्तावास व सदर कामी येणारा अंदाजित रक्कम रुपये १२,६५,४९८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत विरोधी पक्षनेते, श्री.सुनिल सुपडू महाजन व सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.प्रशांत नाईक :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अनुमोदन आहे, मान्यता द्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरातील मेहरुण परिसरातील प्र.क्र.१५ साईबाबा मंदिरालगतचा गटार नसल्यामुळे रस्ते फारच खराब झालेले असून महादेव मंदीराजवळील पुलाच्या पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे पावसाळयात सदर पाणी या परिसरातील नागरीकांच्या घरांमध्ये शिरते. परिणामी रस्त्यावरुन नागरीकांना वाहतुकीस तसेच रहदारीस अनेक अडचणी निर्माण होत आहेत तसेच याबाबत नागरीकांकडून रस्ता तयार करणे व गटार बांधणे बाबत सतत मागणी होत आहे. सदर कारणास्तव प्र.क्र.१५ मेहरुण अंतर्गत साईबाबा मंदिरालगतचा रस्ता खडीकरणासह डांबरी करणे व आर.सी.सी.गटार बांधणे कामी अंदाजित रक्कम रुपये १२,६५,४९८/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- नाईक प्रशांत सुरेश**

**अनुमोदक :- भंगाळे विष्णू रामदास**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १५)** रुशील मल्टीपर्पज फाऊंडेशन,जळगांव (NGO) संचालित उडान दिव्यांग प्रशिक्षण केंद्रास महापालिका शाळा क्र.५ मधील वापरात नसलेल्या पाच खोल्या नाममात्र भाडेतत्वावर मिळणेबाबत अध्यक्ष, रुशील मल्टीपर्पज फाऊंडेशन,जळगांव व सन्मा.सदस्य, श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सदरच्या विषयास माझे अनुमोदन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अधिनियमानुसार मान्य.

**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, रुशील मल्टीपर्पज फाऊंडेशन,जळगांव (NGO) संचालित उडान दिव्यांग प्रशिक्षण केंद्र या नावाने नोंदणीकृत संस्था दिव्यांग व विशेष मुल (गतिमंद) इत्यादी प्रकारच्या विदयार्थ्यांसाठी डे केयर सेंटर, शाळा व रोजगार प्रशिक्षण देण्याचे काम गेल्या पाच वर्षापासून करत आहे. यासाठी गैर सरकारी सामाजिक संस्था (NGO) तीन वर्षापूर्वी धर्मदाय आयुक्त यांचे कडे नोंदणी केलेली आहे.

सदर प्रशिक्षण केंद्रात जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व विशेष मुल (गतिमंद) प्रकारची गरीब व अनाथ अशी एकूण ८० विदयार्थ्यांना गेल्या पाच वर्षापासून विनामुल्य प्रशिक्षण देत आहे. यामुळे जळगांव शहरातील वरील प्रकारच्या विदयार्थ्यांना विनामुल्य शिक्षणाची सोय उपलब्ध केलेली आहे. सदर सामाजिक कार्यासाठी महापालिका शाळा क्र.५ मधील वापरात नसलेल्या तळ मजल्यावरील पाच खोल्या रुशील मल्टीपर्पज फाऊंडेशन,जळगांव (NGO) संचालित उडान दिव्यांग प्रशिक्षण केंद्र, जळगांव यांना महापालिकेच्या सर्व नियम व अटीशर्तीस बंधनकारक राहून नाममात्र भाडेतत्वावर देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १६)** विकास दुध केंद्र सुरु करणेकरिता परवानगी मिळणेबाबत श्री.आकाश महादेव सनस व इतर १६ (सोळा) नागरीकांचे मा.महापौर यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सन्मा.सदस्या सौ.गायत्री उत्तम शिंदे यांची विषय क्र.१६ करीताची लेखी सुचना**

सदर विषयास अनुसरुन विनंती करते की, या विषयातील अर्जदार प्रत्यक्ष एकच असुन वेगवेगळया नावांनी अर्ज केलेले आहेत. सदर विषय हा महासभेला अंधारात ठेवण्यासारखा आहे. मी आपणास विनंती करते की, शिवाजी नगर मध्ये इतक्यात दुध केंद्राची आवश्यकता आहे का ? अशी दुध संघामार्फत चौकशी करुन ते दुध केंद्र खऱ्या गरजवंतांना देण्यात यावे.

कारण की, अनावश्यक ठिकाणी दुध केंद्र देण्यात आल्यास सदर ठिकाणी महिलांची व मुलींची छेड काढली जाते. अनावश्यक अपवाद घडतात. कृपया हा विषय तहकुब ठेवण्यात यावा.

**सौ.गायत्री शिंदे:-** विषय क्र.१६ मधील अ.क्र.११,१२ आणि १३ तहकुब ठेवण्यात यावे. विषय क्र.१६ मधील उपविषय ११,१२ आणि १३.

**मा.महापौर :-** विषय मंजुर झाले आहे ताई.

**सौ.गायत्री शिंदे:-** नाही नाही.

**मा.महापौर :-** १६ वा विषय चालु आहे.

**सौ.गायत्री शिंदे:-** विषय क्र.१६ मधीलच उपविषय आहे ११,१२, आणि १३.

**मा.महापौर :-** एकच जण बोला, काही एकु येत नाही.

**सौ.गायत्री शिंदे:-** विषय क्र.१६ मधीलच उपविषय आहे ११,१२, आणि १३ सांगत आहे मी.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**मा.उपमहापौर :-** सगळयांना विनंती आहे की, आपले स्पिकर बंद करा.

**सौ.चेतना चौधरी :-** विनंती आहे की, उर्वरित सर्वांना समाविष्ट करुन घ्यावे.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय क्र.१६ मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विषय क्र.१६ मंजुर आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर, उपमहापौर महोदया, नियमानुसार त्याला मंजुरी द्यावी.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.आकाश महादेव सनस व इतर १७ (सतरा) नागरीकांचे अर्जानुसार खाली नमूद केलेल्या जागेत दुध बुथ केंद्र सुरु करणेस खालील अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापूर्वी दुध विकास केंद्र चालविणेस महासभा ठराव क्रं.२५२ दि.११/०२/२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे अटी-शर्ती सदर दुध बुथ धारकांना सुध्दा लागू राहतील.

| अ.नं. | नांव | दुध बुथ केंद्राचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | आकाश महादेव सनस | चंदु आण्णा नगर स्टॉप, शुभम प्रोव्हीजन जवळ,जळगांव. |
| २ | अर्चना सुनिल शिंदे | रायसोनी नगर, सामाजीक वनीकरण समोर,मोहाडी रोड जळगांव. |
| ३ | कौस्तुभ ज्ञानेश्वर कोळी | लक्ष्मीनारायण मंदीराच्या बाजुला, रथचौक,जळगांव. |
| ४ | मुकेश भागवत निंबाळकर | समृध्दी अपार्टमेंट, गौरव नगर, जळगांव. |
| ५ | वेणूबाई युवराज चौधरी | कलेक्टर बंगल्या समोर, रामानंद रोड लगत, जळगांव. |
| ६ | विदया प्रशांत चौधरी | त्र्यंबक नगर शाळेजवळ, संभाजी रोड लगत,मोहन नगर,जळगांव. |
| ७ | दिपाली कमलाकर ठोसर | लांडोरखोरी परिसर वनीकरण च्या बाजूला गेला राम मंदिर जवळ, मोहाडी रोड लगत,जळगांव. |
| ८ | हर्षद चिंतामण पाखले | शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,जळगांव हायवे नं.६ च्या उजव्या बाजसू , जळगांव. |
| ९ | भुषण शांताराम रुले | जि.प.जळगांव बंद गेट क्रमांक ०३ ला लागून,जळगांव. |
| १० | गणेश माधवराव गाढवे | विदयुत डिपीच्या बाजुला, कांचन नगर, कांलकामाता मंदीराजवळ, ओपनस्पेस जवळ,जळगांव. |
| ११ | राजु भागवत सपकाळे | प्रजापत नगर,शिवाजी नगर कडे जाणरा भागवत खंडु सोनवणे पुलाजवळ, मुरमुरेवाल्यांच्या समोर,जळगांव. |
| १२ | विशाल जयवंतराव भावे | महावीर व कनकाई जिनींग प्रेसला लागुन असलेल्या रोडच्या कॉर्नरच्या बाजुस,शिवाजी नगर,जळगांव. |
| १३ | पायल अतुल हराळ | धनाजी काळे नगर, विहीरीजवळ रोड साईडला,जळगांव. |
| १४ | जया पंकज खोले | शिवाजी नगर नविन हुडको कॉम्पलेक्स लागुन असलेल्या रोडच्या बाजुला,जळगांव. |
| १५ | वंदना कृष्णा तायडे | त्र्यंबक नगर शाळेजवळ, संभाजी रोड लगत, जळगांव. |
| १६ | अजय संजय भोई | एल.आय.सी.ऑफीस कॉर्नर, भास्कर मार्केट रोड,जळगांव. |
| १७ | रविंद्र पुंडलिक शिंदे | दौलत नगर/नित्यानंद नगर परिसरात मोठया पाण्याच्या टाकीजवळ,जळगांव. |
| १८ | वृषभ जयंत भावे | पवन बंगल्यासमोर, केळी संशोधन केंद्राच्या जवळील भिंतीजवळ हायवे क्रं.६ पुर्व बाजुस,जळगांव. |

**अटी-शर्ती :,**

१) दुध बुथ केंद्रामध्ये दुध व दुधजन्य पदार्थ, बिस्कीट,खारी, टोस्ट व पाणी बोटल विक्रीस ठेवता येतील त्या व्यतिरिक्त तंबाखू, गुटका, सिगारेट तसेच अंमली पदार्थ व इतर पदार्थ आढळल्यास मुदतवाढ रद्द करण्यात येईल.

२) दुध बुथ केंद्रधारकाने दुध बुथ केंद्रापासुन कोणत्याही प्रकारे रहदारीस अडचण निर्माण होणार नाही या बाबतचे प्रमाणपत्र शहर वाहतुक विभागाकडून प्राप्त करुन म.न.पा.कडेस देणे बंधनकारक राहिल.

३) उपरोक्त १८ नमुद विकास दुध बुथ धारकांना ३ वर्षासाठी परवानगी देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १७)** जळगांव महानगरपालिका हद्दीतील आजी आजोबांसाठी वृध्दाश्रमसाठी सर्व्हे नं.१४३/१/क/पै/ ओपन जागा क्षेत्र १३.५० चौ.मी. (ओपन स्पेस) खुला भुखंड प्रज्ञा संजीवन फाउंडेशन,जळगांव या संस्थेस मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.मिनाक्षी गोकुळ पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** मिनाक्षीताई बोला

**सौ.मिनाक्षी पाटील :-** सदर विषयाला सुचक मिनाक्षी पाटील आणि अनुमोदक श्री.सुनिलभाऊ खडके.

**मा.महापौर :-** ओके , विष्णुभाऊ

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सौ.मिनाक्षी पाटील :-** हॅलो महापौर साहेब.

**मा.महापौर :-** ओके, ओके

**नगरसचिव :-** विष्णुभाऊ मंजुर आहे का?

**मा.महापौर :-** विष्णुभाऊ मान्य आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मान्य आहे नियमानुसार देण्यास हरकत नाही.

**नगरसचिव :-** रियाजभाई

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरताई , महापौरताई

**मा.महापौर :-** बोला भाऊ

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया , विषय क्रं. १७ मध्ये क्षेत्रफळ जे आहे १३.५० म्हंटलेले आहे हे चुकलेले आहे ते १३५० चौ.मी.आहे असे मला वाटते तर त्याच्यात सुधारणा करण्यात यावी.

**मा.महापौर :-** ठिक आहे ठिक आहे.

**नगरसचिव :-** रियाजभाई

**श्री.राजेंद्र पाटील :-** क्षेत्रफळ दुरूस्त करण्यात यावे.

**मा.महापौर :-** ठिक आहे ठिक आहे.

**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार मान्यता देण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रज्ञा संजीवन फाउंडेशन,जळगांव ही नोंदणीकृत संस्था असून मागील ३ वर्षापासून संस्थेअंतर्गत जळगांव महानगरपालिका हद्दीत “वास्तल्य वृध्दाश्रम” या नावाने आजी आजोबांसाठी म्हातारपणात एक मदतीचा हात म्हणून कार्य करण्याचे नियोजन करीत आहे. वृध्दाश्रमात म्हातारपणात एक मदतीचा हात देणे, घरातून बेघर झालेले, अनाथ, बेवारस रस्त्यावर राहणारे आजी - आजोबा किंवा जी मुले स्वत: आई-वडिलांना वृध्दाश्रमात पाठवितात अशा लोकांकरिता वृध्दाश्रम सुरु करणे करिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत सदर संस्थेचा सन्मा.सदस्या,सौ.मिनाक्षी गोकुळ पाटील यांचे मार्फत आलेल्या प्रस्तावानुसार व सभेत सूचित केलेनूसार जळगांव महानगरपालिका हद्दीतील आजी आजोबांसाठी वृध्दाश्रम सुरु करण्यासाठी सर्व्हे नं.१४३/१/क/पै/ ओपन जागा क्षेत्र १३.५० चौ.मी. (ओपन स्पेस) खुला भुखंड ऐवजी १३५० चौ.मी.(ओपन स्पेस) खुला भुखंड प्रज्ञा संजीवन फाउंडेशन,जळगांव या संस्थेस देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली नसलेबाबत खात्री करुन घेवून सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील मिनाक्षी गोकुळ**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १८)** ओपन स्पेस जागा सिटी सर्व्हे नं.३४२/६/अ/१चौ.मी. ४००.८० व सिटी सर्व्हे नं.३४२/६/अ/२ चौ.मी. २८०.८० या दोन्ही ओपनस्पेस श्री गणेश क्रिडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक संस्था, जळगांव या संस्थेस मिळणेबाबत अध्यक्ष, श्री गणेश क्रिडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक संस्था, जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रस्ताव मान्य आहे.

**सौ.गायत्री शिंदे :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** बोला ताई

**सौ.गायत्री शिंदे :-** माझा आक्षेप आहे,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सौ.गायत्री शिंदे :-** माझा आक्षेप आहे, कारण की या विषयाला कित्येक लोकांच्या हरकती आहेत.

**मा.महापौर :-** विष्णुभाऊ

**सौ.गायत्री शिंदे :-** महापौरताई या ओपनस्पेस जागेला किती लोकांची हरकत आहे.आपण या विषयावर विचार करूनच या विषयाला अनुमोदन द्यावे.

**मा.महापौर :-** ओके ठिक आहे. मंजुर झालेला आहे ताई

**नगरसचिव :-** विष्णुभाऊ मंजुर आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मंजुर आहे नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर आहे ना ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मंजुर आहे अधिनियमानुसार

**नगरसचिव :-** हो हो , रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार मंजुर आहे

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, श्री गणेश क्रिडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक संस्था, जळगांव मार्फत मागील २०-२२ वर्षापासून प्रत्येक वर्षी सार्वजनिक उपक्रम राबविण्यात येतात. संस्थेच्या उद्देशानुसार संस्थेस सार्वजनिक व नागरीकांना सुविधा उपलब्ध करुन देवून नगारीकांना व जनतेला उपभोग घेता यावा तसेच ओपनस्पेवर होणारे कचरा व घाणीचे साम्राज्यामुळे नागरीकांना होणाऱ्या दुर्गंधीच्या त्रासापासून मुक्त करणे या उद्देशाने ओपन स्पेस जागा सिटी सर्व्हे नं.३४२/६/अ/१चौ.मी. ४००.८० व सिटी सर्व्हे नं.३४२/६/अ/२ चौ.मी. २८०.८० या दोन्ही ओपनस्पेस श्री गणेश क्रिडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक संस्था, जळगांव या संस्थेस देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली नसलेबाबत खात्री करुन घेवून सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १९)** प्रभाग समिती क्रमांक १ ते ४ अंतर्गत होणाऱ्या कामाबाबतची आर्थिक मर्यादा एक लाख वरुन पाच लाखा रुपयांपर्यंत वाढविणेबाबत तसेच याप्रमाणे खर्चास प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरी देणे बाबत मा.सभापती, प्रभाग समिती क्रमांक १ ते ४ यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** जितुभाऊ, जितुभाऊ मराठे बोला.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सन्मा. महापौर , उपमहापौर प्रभाग समिती क्रं. १ ते ४ मध्ये वित्तीय खर्चाची जी १ लाखाची मर्यादा ठेवलेली आहे ती १ लाखापासुन ५ लाखापर्यंत करण्यात यावी. हा प्रस्ताव आम्ही ठेवत आहे त्याला आपण मान्यता द्यावी.

**श्री.प्रविण कोल्हे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.उपमहापौर :-** नवनाथभाऊ

**नगरसचिव :-** विष्णुभाऊ मंजुर

**श्री.विष्णु भंगाळे :-** मान्य आहे , मान्य आहे.

**नगरसचिव :-** हो हो , रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेतील प्रभाग समित्या हया दि.१५/०६/२००९ पासुन अस्तित्वात आलेल्या आहेत. तत्कालीन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार व आताचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनूसार आयुक्त यांचे कडील आदेश/जा.क्र./१४८९/२०१७ दि.०२/०८/२०१७ अन्वये प्रभाग कार्यालयास वित्तीय खर्चाच्या एक लाख रु.चे मर्यादित कामकाजासाठी प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणेबाबत अधिकार प्रदान केलेले आहेत.

परंतु सदयाचे काळात महागाई पहाता १ लाख रुपयांचे मर्यादेत अनेक कामांचा निपटारा जलदगतीने होत नसल्याने अनेक तक्रारी प्रलंबित असतात करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ (क) नुसार पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणे बाबतचे अधिकार प्रभाग समितीस देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच प्रत्येक प्रभाग समिती सक्षम करणे कामी चारही प्रभाग समित्यांना प्रत्येकी एक सहाय्यक अभियंता पदाचा कर्मचारी, कोटेशन / टेंडर तयार करणे, प्रसिध्द करणे, बिले तयार करणे त्यानंतर बिल रजिस्टरला नोंद घेणे इत्यादी कामे करणेसाठी प्रत्येक प्रभाग समितीला एक लिपीक कर्मचारी व बिले तपासणे, एम.बी.तपासणेसाठी चारही प्रभाग समिती मिळुन एक लेखापाल देणेबाबतची कार्यवाही प्रशासनाने करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २०)** जळगांव शहर महानगरपालिकेतील विविध प्रभागांमध्ये विकास कामांसाठी विशेष निधी अंतर्गत निधीची मागणी करण्यात आलेली आहे त्या निधी मध्ये एकूण १ ते ३७ कामे करणेस व त्यास येणाऱ्या अंदाजीत रक्कम रुपये- १५,९७,१९,६२१/- मात्रच्या रक्कमेस मान्यता मिळणेबाबत विरोधी पक्षनेते,श्री.सुनिल सुपडू महाजन व सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला, बोला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला, बोला उज्वलाताई

**नगरसचिव :-** विष्णुभाऊ २० नंबरचा विषय आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला, बोला

**श्री.विष्णू भंगाळे :-** मंजुर आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** विष्णुभाऊ आपण जसा हा विशेष निधी मागीतलेला आहे

**श्री.विष्णू भंगाळे :-** हो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्याच प्रमाणे माजी मुख्यमंत्री साहेबांनी मागे आपल्याला १०० कोटी दिलेले होते. ते राज्य शासनाने थांबवलेले आहेत.

**श्री.विष्णू भंगाळे :-** त्याला कारण काय आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही आता निधी विष्णुभाऊ ऐकुन घ्या आधी मी काय म्हणतेय ते तर

**श्री.विष्णू भंगाळे :-** हो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तर तुम्ही जसे मागीतले आहे त्याचप्रमाणे आता पाठपुरावा करून गुलाबभाऊंशी बोलुन पालकमंत्री आपले गुलाबभाऊ आहेत. त्यांच्याशी चर्चा करून आम्हीपण येतो त्यांना आपण भेट घेवुन १०० कोटींसाठी ४२ कोटी आपले मंजुर आहेत. त्याचे टेंडर निघाले आहे तर त्याच्यासाठी पण आपण प्रयत्न करू. जसे तुम्ही १५ कोटीसाठी करता आहेत आपल्याला जळगांवच्या विकासासाठी काम

**श्री.प्रशांत नाईक :-** नक्की करू, नक्की करू.

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय, उज्वला ताईंनी मांडलेल्या सुचनेला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कशासाठी थांबलेले आहे याच्यात न पडता आपल्याला कसा निधी जास्तीत जास्त मिळवुन घेता येईल. त्याच्यासाठी आपल्याला प्रयत्न करणं हे गरजेचं आहे आवश्यक आहे तर विष्णुभाऊ माझी एक अशी सुचना आहे विष्णुभाऊ विनंती आहे की आपण जसे हे करतो आहे .त्याप्रमाणे

**श्री.जितेंद्र मराठे :-** विष्णुभाऊ आपल्या सगळयांच्या प्रभागाची कामं आहेत त्याच्यात

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सगळयांचीच कामं होणार आहेत

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय,

**मा.महापौर :-** बोला विष्णू भाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय,

**मा.महापौर :-** बोला विष्णू भाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय, उज्वलाताईंनी जी सुचना मांडलेली आहे नक्कीच आपण महापौर महोदय स्वत: व आपल्यासोबत काही नगरसेवक आमचे सर्व पदाधिकारी आम्ही आपल्यासोबत मा.ना.पालकमंत्री श्री.गुलाबराव पाटील साहेबांकडे जावुन त्यांच्याकडे आपण याची मागणी करू आणि सर्वांसाठी जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न करू.

**मा.महापौर :-** मान्य करायचा का विषय

**श्री.विष्णू भंगाळे :-** हो.

**नगरसचिव :-** विष्णूभाऊ , रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** हो हो मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेतील खालील विविध प्रभागांमध्ये विकास कामांसाठी विशेष निधी अंतर्गत निधीची मागणी करण्यात आलेली आहे त्या निधी मध्ये खालील नमूद एकूण १ ते ३७ कामे करणेस व त्यास येणाऱ्या अंदाजीत रक्कम रुपये- १५,९७,१९,६२१/- मात्रच्या अंदाजित रक्कमेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.५ शिवाजी नगर रेल्वे पुलाजवळ म.न.पा.हद्दीमध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.११,३९,८९६/- |
| २ | प्रभाग क्रं.५ प्रकाश मेडिकल ते ब्राम्हण सभा रस्ता व ओक मंगल कार्यालय ते शनिपेठ पो.स्टे.या दोन रस्त्यांना जोडणारे पुर्व पश्चिम पाच रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६५,५०,०००/- |
| ३ | प्रभाग क्रं.५ बळीराम पेठ मध्ये श्री.डेअरी ते मलिक अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता व शाम एजन्सी ते लेले संकुल व केळकर मार्केट मागील पुर्व पश्चिम पाच रस्ते डांबरीकरण करणे. | रु.९,५०,०००/- |
| ४ | प्रभाग क्रं.५ मध्ये ठिकठिकाणी बळीराम पेठ परिसर ईस्लामपुरा परिसर, शनिपेठ इ.ठिकाणी आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.३०,००,०००/- |
| ५ | प्रभाग क्रं.५ अंतर्गत जोशी पेठ, भवानी पेठ, गांधी नगर, इ. परिसरात ठिकठिकाणी आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.५२,००,०००/- |
| ६ | प्रभाग क्रं.५ अंतर्गत गांधी नगर, भवानी पेठ, जोशी पेठ इ.परिसरात ठिक ठिकाणी डांबरी रस्ते तयार करणे. | रु.६६,००,०००/- |
| ७ | प्रभाग क्रं.५ अंतर्गत गांधी नगर, मध्ये ठिकठिकाणी सिमेंट कॉँक्रीट चे रस्ते तयार करणे. | रु.६०,००,०००/- |
| ८ | प्रभाग क्रं.५ मधील ठिकठिकाणी रोड साईडला आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट व कॉक्रीट रस्ते बांधणे (बी.जे.मार्केट परिसर, गटाणी चाळ, विसनजी नगर, गांधी नगर) | रु.३४,६१,३५३/- |
| ९ | प्रभाग क्रं.५ अंतर्गत दिक्षीत वाडी, ओंकार नगर, वानखेडे हौ.सोसायटी, दापोरेकर मंगल कार्यालय इ. परिसरात ठिकठिकाणी आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.३१,००,०००/- |
| १० | प्रभाग क्रं.५ अंतर्गत ओंकार नगर, वानखेडे हौ.सोसायटी, दापोरेकर मंगल कार्यालय इ. परिसरात रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२३,००,०००/- |
| ११ | प्रभाग क्रं.५ अंतर्गत पारीक पार्क उदयान नुतनीकरण करणे, खेळणी बसविणे, पाण्याची टाकी तयार करणे. | रु.१२,००,०००/- |
| १२ | प्रभाग क्रं.५ अंतर्गत डॉ.भिरुड हॉस्पीटल ते एस.टी.अधिकारी क्वार्टर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३८,००,०००/- |
| १३ | प्रभाग क्रं.८ मध्ये गट नं.११२/१+२+३ निमखेडी शिवार येथे आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.२४,२५,२५२/- |
| १४ | प्रभाग क्रं.८ निमखेडी गट नं.११५/१,११५/२ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.२१,२१,०००/- |
| १५ | प्रभाग क्रं.८ निमखेडी १०२ जिवराम नगर मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.५,४१,८४१/- |
| १६ | प्रभाग क्रं.८ मध्ये गट नं.१०१ निमखेडी शिवार येथे आर.सी.सी.गटार बांधणे. | रु.२९,६०,५१०/- |
| १७ | प्रभाग क्रं.८ मध्ये गट नं.१०१ निमखेडी शिवार येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४०,६९,९३४/- |

| | | |
|---|---|---|
| १८ | प्रभाग क्रं.१२ अनंत हौ.सो.शामसुंदर कॉलनी व समर्थ कॉलनी येथे आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१९,०३,८४४/- |
| १९ | प्रभाग क्रं.१२ विदया नगर व रामदास कॉलनी येथे आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.३३,२८,६८९/- |
| २० | प्रभाग क्रं.१२ जयनगर व ओंकारेश्वर मंदीर परिसर येथे आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.२७,८२,८७३/- |
| २१ | प्रभाग क्रं.१२ पारख नगर, टेलिफोन नगर, पार्वती नगर, गजानन हौ.सो., शिवराम नगर, श्रध्दा कॉलनी येथे आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.१५,४०,१९६/- |
| २२ | प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बँक कॉलनीतील पवन हील ते नंदनवन कॉलनी ओपन स्पेस पर्यंतचा रस्ता कॉंक्रीट करणे. | रु.२४,७२,४४६/- |
| २३ | प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बँक कॉलनीतील पवन हील ते धांडे नगर १२ मी.डी.प.रोड पर्यंतचा रस्ता क्रॉंक्रीट करणे. | रु.३३,३२,११०/- |
| २४ | प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बँक कॉलनीतील पवन हील ते नंदनवन कॉलनी ओपन स्पेस ते स.नं.४७०-१ ब नंदनवन कॉलनी मुख्य रस्ता पर्यंतचा कॉंक्रीटचा करणे. | रु.२०,७६,४८७/- |
| २५ | प्रभाग क्रं.१२ मधील विदयुत कॉलनी ते श्रध्दा कॉलनी पर्यंतचा रस्ता कॉंक्रीट करणे. | रु.२३,४४,१९०/- |
| २६ | प्रभाग क्रं.१५ मधील मोहम्मदीया नगर मधील खुल्या जागेत क्लब हॉल बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.३०,००,०००/- |
| २७ | प्रभाग क्रं.१५ मधील गुलाबबाबा कॉलनी मधील खुल्या जागेस कुंपण भिंत बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.३०,००,०००/- |
| २८ | प्रभाग क्रं.१५ मधील संत गुलाब कॉलनी मागील रस्त्यावर पुल बांधणे व रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.२०,००,०००/- |
| २९ | प्रभाग क्रं.१५ अ मधील मेहरुण गावठाण मध्ये रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९९,८९,०००/- |
| ३० | प्रभाग क्रं.१५ ड मधील मेहरुण गावठाण मध्ये रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९९,८०,०००/- |
| ३१ | प्रभाग क्रं.१५ मध्ये नविन व जुन्या तांबापुरा भागात रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९९,७५,०००/- |
| ३२ | प्रभाग क्रं.१५ मध्ये ठिकठिकाणी स्ट्रीट लाईट व हायमास्ट लॅम्प बसविणे. | रु.१६,००,०००/- |
| ३३ | प्रभाग क्रं.१५ मधील सर्व्हे नं.२५९ जयभवानी नगर मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.४९,७५,०००/- |
| ३४ | प्रभाग क्रं.१८ मेहरुण अंतर्गत सर्व्हे नं.१६ मधील रस्ते खडीकरणासह डांबरी करणे. | रु.१,००,००,०००/- |
| ३५ | प्रभाग क्रं.१९ मेहरुण अंतर्गत एम.डी.एस. कॉलनी, साईप्रसाद कॉलनी इ.मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु.१,००,००,०००/- |
| ३६ | प्रभाग क्रं.१९ सुप्रीम कॉलनी अंतर्गत ३० मी.डी.पी.रस्ता ते स. नं.१८५ पर्यंत तसेच मच्छी बाजार ते गजानन महाराज मंदीर रोड स. नं.१८१ धानवड रोड | रु.१,००,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | |
| ३७ | प्रभाग क्रं.१९ सुप्रीम कॉलनी अंतर्गत औरंगाबाद हायवे पासून रामदेव मंदीर मार्ग ते संत गाडगेबाबा रिक्षा स्टॉप पर्यंत (रुंदी ३० मी.) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,००,००,०००/- |
| | एकुण रक्कम - | रु.१५,९७,१९,६२१/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भंगाळे विष्णू रामदास**
**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २१)** अति कार्यकारी अभियंता, जळगांव शहर उपविभाग -२ यांनी नवीन विज उपकेंद्र उभारणीसाठी महापालिका हद्दीतील खुली जागा (ओपन स्पेस) महावितरण कंपनीस हस्तांतरीत करणेबाबत मा.आ.सुरेश दामु भोळे व मा.महापौर,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांचे मार्फत आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.प्रविण कोल्हे :-** प्रस्ताव मान्य आहे.
**मा.उपमहापौर :-** रंजनाताई
**सौ.रंजना सपकाळे :-** या विषयाला माझे अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** विष्णूभाऊ , रियाजभाई
**श्री.विष्णू भंगाळे :-** हो मान्य आहे.
**नगरसचिव :-** रियाजभाई मंजुर
**श्री.रियाज बागवान :-** हो हो मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महापालिका हद्दीतील जुने जळगाव १३२ भागातील वीजपुरवठा शनी पेठ, बळीराम पेठ, जैनाबाद, कांचन नगर के.व्ही. सदर भागाला वीज पुरवठा करणाऱ्या वाहिनी लांब अंतर व उपकेंद्र येथून आहे. सी.डी.आय.एम वारंवार वीज पुरवठा ख,अतिभारीत असल्यामुळे विजेचा दाब कमी असणे खंडित होण्याचा प्रकार होत असून नागरीकांना अडचणीस सामोरे जावे लागत आहे. तसेच गेल्या ८ ते १० वर्षात जळगांव शहरात व परिसरात एकही नवीन उपकेंद्राचे काम झालेले नाही त्यामुळे ग्राहकांच्या समस्या टाळण्यासाठी व अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी आता प्रस्तावित केलेली नवीन ३३/११ के.व्ही.ची उपकेंद्राची उभारणी होवून कार्यान्वित होणे अति आवश्यक असल्याने वरील सर्व बाबींचा विचार करता जळगांव शहराच्या दृष्टीने वर नमूद समस्यांचे निराकरण करणेसाठी अति.कार्यकारी अभियंता,जळगांव शहर उपविभाग -२ यांनी मागणी केलेनूसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील जुना खेडी रोड परिसर गट नं.-३१ व गट नं.-११/२ येथिल म.न.पा.ची खुली जागा अथवा सदर परिसरातील इतर जागा नविन वीज उपकेंद्र उभारणीसाठी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड, जळगांव अर्बन सब डिव्हीजन यांना उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कोल्हे प्रविण रामदास**

**अनुमोदक :- सपकाळे रंजना भरत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २२)** प्रभाग क्रं.१ मधील विविध ७ ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३,४०,१५,२०१/- मात्र चे खर्चास तसेच प्र.क्रं.१ मधील विविध २ ठिकाणी रोडसाईडला गटार बांधणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६३,७६,२१४/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.दिलीप बबनराव पोकळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** सरीताताई

**सरीता नेरकर :-** या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विष्णूभाऊ , रियाजभाई

**श्री.विष्णू भंगाळे :-** हो मान्य आहे.

**नगरसचिव :-** रियाजभाई मंजुर

**श्री.रियाज बागवान :-** हो हो मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रभाग क्रं.१ मधील खालील नमूद केलेल्या विविध ७ ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३,४०,१५,२०१/- मात्र चे खर्चास तसेच प्र.क्रं.१ मधील खालील नमूद केलेल्या विविध २ ठिकाणी रोडसाईडला गटार बांधणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६३,७६,२१४/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१ सिध्दीविनायक पार्क व हरीओम नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५१,४९,४९२.०० |
| २ | प्र.क्र.१ दत्तात्रय नगर शिवशंकर कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४९,११,७२१.०० |
| ३ | प्र.क्र.१ राधाकृष्ण नगर स.नं.३०१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५६,१५,२७१.०० |
| ४ | प्र.क्र.१ जनाईनगर, इंद्रप्रस्थनगर व केशरबाग मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३८,३७,९०९.०० |
| ५ | प्र.क्र.१ इंद्रप्रस्थनगर, नामदेवनगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६१,३०,३३०.०० |
| ६ | प्र.क्र.१ महावीर नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५६,५४,९४१.०० |
| ७ | प्र.क्र.१ राजमालती नगर मधील रस्ते डांबरीकरणे करणे. | रु.२७,१५,५३७.०० |
| | **एकूण रक्कम -** | **रु.३,४०,१५,२०१.००** |
| १ | प्र.क्र.१ राधाकृष्ण नगर स.नं.३०१/१, ३०१/२ व ३२५,३२९ मध्ये रोडसाईडला गटार बांधणे. | रु.४५,८०,३२६.०० |
| २ | प्र.क्र.१ जनाईनगर भागात रोडसाईडला गटार बांधणे. | रु.१७,९५,८८८.०० |
| | **एकूण** | **रु.६३,७६,२१४.००** |

| | **रक्कम -** | |
|---|---|---|

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २३)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील गट नं.१२/१+२/२ या गटातील ओपन स्पेस विकसीत करणे कामी श्री.समस्त बारी पंच मंडळ,जळगांव यांना देणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.प्रविण रामदास कोल्हे यांचे मार्फत आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.शोभा बारी :-** प्रस्ताव मान्य आहे.

**मा.महापौर :-** रंजनाताई

**सौ.रंजना सपकाळे :-** या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** विष्णूभाऊ , रियाजभाई

**श्री.विष्णू भंगाळे :-** नगरसचिव महोदय

**नगरसचिव :-** बोला विष्णूभाऊ

**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौरताई या विषयाला अधिनियमानुसार हरकत नाही

**नगरसचिव :-** रियाजभाई

**श्री.विष्णू भंगाळे :-** अधिनियमानुसार मान्य आहे असा उल्लेख करावा. महापौर महोदय

**नगरसचिव :-** विष्णूभाऊ हो हो उल्लेख कार्यवृत्तात येईल.

**श्री.विष्णू भंगाळे :-** ओके

**नगरसचिव :-** रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** नियमानुसार हॅलो नियमानुसार मंजुर करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, अध्यक्ष,श्री.समस्त बारी पंच मंडळ,जळगांव यांचा सन्मा.सदस्य, श्री.प्रवीण रामदास कोल्हे यांचे मार्फत आलेल्या अर्जानुसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील गट नं.१२/१+२/२ या गटातील ओपन स्पेस विकसीत करणे तसेच सुशोभित करणे कामी श्री.समस्त बारी पंच मंडळ,जळगांव यांना म.न.पा.च्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापुर्वी कोणत्याही संस्थेस दिली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बारी शोभा दिनकर**

**अनुमोदक :- सपकाळे रंजना भरत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २४)** जळगांव शहराची वाढती लोकसंख्या तसेच शहर व्यासाचा विचार करता शहर मैला साफसफाई कामे पुरेश्या प्रमाणात होत नसल्यामुळे अध्यक्ष,प्रविणदीप फाऊंडेशन, जळगांव यांना मैला उपासा वाहन(वॅक्युम एम्टीयर) खरेदी करुन त्यांना शहरातील मैला साफसफाईचे कामे सुरु करण्याचा मानस असुन त्यासाठी त्यांना मैला उपासा वाहनाव्दारे शहरात मैला साफसफाईची कामे करणेकामी महासभेची परवानगी मिळणेबाबत मनपा सभागृह नेते, श्री.ललित विजयराव कोल्हे यांचे मार्फत आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** ललीतभाऊ
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी सुचक आहे
**मा.महापौर :-** प्रविणभाऊ
**श्री.प्रविण कोल्हे :-** या विषयाला माझे अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** विष्णूभाऊ रियाजभाई
**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय
**मा.महापौर :-** बोला विष्णूभाऊ
**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय , याला आपल्याला परवानगी देण्यास काही हरकत नाही . परंतू याची जी काही रक्कम असेल ती महापालिकेप्रमाणे घेण्यात येईल की किंवा त्याची काय पध्दत राहील.
**मा.महापौर :-** विष्णूभाऊ
**श्री.विष्णू भंगाळे :-** महापौर महोदय , आपण परवानगी देतो आहोत . तर आपण यांना कशा पध्दतीने परवानगी देतोय
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रशासन ठरवेल ते, आपण ठराव मंजुर करून घेवु व प्रशासन ठरवेल
**श्री.विष्णू भंगाळे :-** पण त्यांनी अस अंधारात ठेवु नये
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रशासन निर्णय घेईल याचा
**मा.महापौर :-** विष्णूभाऊ तुमच काय म्हणण आहे.
**श्री.विष्णू भंगाळे :-** माझ म्हणण आहे की आपल्या मनपाच्या माध्यमातुन ज्याप्रमाणे आपण साफ करतो व्हॅक्युम क्लीनरच्या माध्यमातुन जी रक्कम मनपा घेते .
**श्री.विशाल त्रिपाठी :-** तेवढीच नियमाप्रमाणे
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विष्णूभाऊ महापालिकेच्या नियमाप्रमाणेच होईल.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हा प्रस्ताव मंजुर करावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब विषय क्रं. २५ , २६ व २७ हे सारखेच आहेत. तरी या तिघेही विषयांची एकत्रित चर्चा करावी.
**नगरसचिव :-** विष्णूभाऊ २४ क्रं. मंजुर आहे ना रियाजभाई
**श्री.विष्णू भंगाळे :-** मंजुर आहे, मंजुर आहे परंतू ज्या वेळेस द्याल त्यावेळेस जळगांव शहराच्या नागरीकांचा विचार करून महापालिका ज्याप्रमाणे पावती फाडत असेल त्या अनुषंगाने त्याला न्याय मिळाला पाहीजे
**मा.महापौर :-** विष्णूभाऊ ठिक आहे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापालिकाप्रमाणेच होईल ते
**नगरसचिव :-** रियाजभाई , रियाजभाई
**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब विषय क्रं. २५ , २६ व २७
**मा.महापौर :-** ठिक आहे.
**नगरसचिव :-** विषय क्रं. २५ , २६ व २७
**श्री.कैलास सोनवणे :-** ईस्टीमेट जे आहे ते मंजुर आहे.
**श्री.विष्णू भंगाळे :-** मंजुर आहे, मंजुर आहे.
**श्री.नितीन बरडे :-** आप्पा मला भोसले साहेबांशी बोलायचे आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** बोला बोला ना आधी विषय मंजुर करून घ्या मग बोला
**श्री.नितीन बरडे :-** मला भोसले साहेबांशी बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला.
**श्री.विष्णू भंगाळे :-** बोला बोला बरडे साहेब बोला.
**मा.महापौर :-** नितीनभाऊ बोला.
**श्री.नितीन बरडे :-** भोसले साहेब आपण दोन तिन महिन्यात किती डांबर खरेदी केलेले आहे. आपली गाडी कुठे आहे.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** सध्या आपण डांबर खरेदी केलेले नाहीये , पुर्वीचेच खरेदी केलेले डांबर शिल्लक आहे आजच्या तारखेमध्ये.

**श्री.नितीन बरडे :-** किती शिल्लक आहे. आपली गाडी कुठे आहे सध्या

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** सध्या आपली गाडी गिरणा टाकी परसिरात आहे.

**श्री.नितीन बरडे :-** चालु नाहीये का ती

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आपण अद्याप सुरू केलेली नाहीये . आपण रस्ते दुरूस्तीचे टेंडर काढले होते व मजुरांचा हि प्राब्लेम होता. आता मजुरांची ऑर्डर आताच दिली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आकाशवाणी चौक ते महाबळ चौकापर्यंत तुम्ही मातीने खड्डे बुजवले आहे. महापौर साहेब आपल्याकडे गाडी आहे डांबर आहे. यांनी आकाशवाणी चौक पासुन ते महाबळ चौकापर्यंत मातीने खड्डे बुजवले आहे. ते रस्त्याचर येताय लोकांच्या अंगावर खडे उडताहेत गाडयांच्या टायरांमुळे

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आपण ते वर्कऑर्डर देण्यापुर्वी बुजवले होते. आता त्यांना वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही नाही महापौर महोदय

**श्री.नितीन बरडे :-** मातीने खड्डे बुजताहेत तर मग खडे हे लोकांच्या अंगावर गाडयांच्या टायरांमुळे उडताहेत . तुमच्याकडे गाडी आहे डांबर शिल्लक आहे.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आता मजुरांची वर्क ऑर्डर दिली गेली आहे. आपण आता काम सुरू करतोय. सोमवारी काम सुरू होणार आहे आणि २२ पर्यंत

**श्री.नितीन बरडे :-** माती पुर्ण काढुन बुजणार आहे का की मातीवरच बुजवणार आता म्हणजे पुन्हा खड्डे होंतील ते

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आपण माती काढुनच खड्डे बुजवु

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ज्याप्रमाणे आपण हे खड्डे बुजविण्यासाठी दरवेळेस निधी आपण उपलब्ध करून देतो आणि खड्डे बुजवले जातात परंतू पाहीजे त्याप्रमाणात बुजवले जात नाहीत. आपण त्याच्यात बदनाम होतो अस मला वाटत याच्यात खड्डयांची साईज असेल कुठे कुठे बुजतात ते समजत नाही . तरी आपण या ज्या ज्या गोष्टीला शहराच्या दृष्टीने खड्डे बुजविणे गरजेचे आहे. परंतू याच्यावर कंट्रोल मा.आयुक्त महोदय यांचे असावे असे मी आपल्या माध्यमातुन की महापौर महोदयांनी त्याच्यावर कंट्रोल करावे आणि येणाऱ्या काळामध्ये हे वाढुन जनतेचे पैसे आपण मातीत मुरूमामध्ये ते बुजतात त्याच्यामुळे ते टिकत नाही. महापौर महोदय याची काळजी आपण घ्यावी. आणि आपण स्ट्रीक वॉर्निंग द्यावी कि यांनी केलेल्या कामाचे स्वरूप काय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब विषय क्रं. २८ घेण्यात यावा.

**मा.महापौर :-** विष्णुभाऊ मान्य आहे ना विषय

**श्री.विष्णु भंगाळे :-** विषय क्रं. २५ च चालु आहे अजुन

**श्री.कैलास सोनवणे :-** झाले आहे २५ ,२६ व २७ झाले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** विषय क्रं. २५ ,२६ व २७ एकत्र आहेत विष्णू भाऊ

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. २८ पण मंजुर आहे आम्हाला

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहराची वाढती लोकसंख्या तसेच शहर व्यासाचा विचार करता शहरातील मैला साफसफाईची कामे पुरेश्या प्रमाणात होत नसल्यामुळे दिवसेंदिवस मैला साफसफाई कामे क्रमाने सुरु आहेत. परिणामी या कामामुळे नागरीकांच्या पुढील कामांना तसेच नियोजित वेळेत संबंधीत कामे होत नाहीत. त्यामुळे प्रविणदीप फाऊंदेशन यांचा मैला उपसा वाहन (वॅक्युम एम्टीयर) खरेदी करुन मैला साफसफाईचे कामे सुरु करण्याचा मानस असल्याने जळगांव शहरातील मैला साफसफाईची कामे करणे कामी प्रविणदीप फाऊंडेशन, जळगांव यांना मैला उपसा वाहन (वॅक्युम एम्टीयर) सुरु करणेस म.न.पा.च्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून परवानगी देण्यात येत आहे.

तरी त्वरीत शहरातील मैला साफसफाईचे कामांना सुरुवात करावी. सदर काम करत असतांना आरोग्याचे दृष्टीने नागरीकांच्या तक्रारी येणार नाहीत याची प्रविणदीप फाऊंडेशन यांनी दक्षता घ्यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २५)** जळगांव शहर महानगरपालिकेच्या सर्व प्रभागातील रस्त्यातील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे कामी प्रत्येक प्रभाग निहाय रक्कम रु.५० लक्ष मात्र प्रस्तावित असून प्र.क्र.२ हा भौगोलिकदृष्टया व क्षेत्र फळानुसार बऱ्याच मोठया प्रमाणात असल्याने प्र.क्र.२ मधील रस्त्यातील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे कामी रक्कम रु.५० लक्ष रकमे व्यतिरिक्त जादा रक्कम रु.७० लक्ष मात्रची तरतुद करणे कामी सन्मा.सदस्य, श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या सर्व प्रभागातील रस्त्यातील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे कामी प्रत्येक प्रभाग निहाय रक्कम रु.५० लक्ष मात्र प्रस्तावित असून त्यानुसार पूढील नियोजना नुसार प्रभागातील रस्त्यातील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविण्याचे कामे कार्यान्वीत होणार आहे मात्र प्र.क्र.२ हा भौगोलिकदृष्टया व क्षेत्र फळानुसार असोदा रेल्वे गेट ते शिवाजी नगर विदयालय पर्यंतचा बऱ्याच प्रमाणात मोठा आहे तसेच प्रभागातुन शहराचा प्रमुख औदयोगिक व रहिवासी भागातील सांडपाण्याचा नाला मार्गक्रम करीत आहे. परिणामी प्रभागाचे नैसर्गिकरित्या दोन भाग निर्माण झालेले आहे. त्यातच नाल्याच्या असोदा रेल्वे गेट, कांचन नगर कडील भाग हा अत्यंत दाट वस्तीचा असून याभागात दिवसेंदिवस रहिवास क्षेत्रात वाढ होत आहे.

प्रभाग क्रमांक २ परिसरातील नल्याकडील कांचन नगर अविकसित परिसराकडील भाग भौगोलिकदृष्टया वाढलेल्या परिसराचा विचार करता रस्ते दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे प्र.क्र.२ मधील रस्त्यातील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे कामी रक्कम रु.५० लक्ष रकमे व्यतिरिक्त जादा रक्कम रु.७० लक्ष मात्रची तरतुद करणेस तसेच सदर तरतूदीतून रस्ते करुन घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बाविस्कर किशोर रमेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २६)** नागरीकांना सोईसुविधा पुरविण्यासाठी प्रभाग क्रं.१९ मध्ये विविध तीन कामे करणे कामी जिल्हा नियोजन समिती (डि.पी.डि.सी.) अंतर्गत एकूण रक्कम रु.२,३५,००,०००/- मात्र निधी उपलब्ध करुन देणे कामी सन्मा.सदस्य, श्री.गणेश (विक्रम) किसन सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.विक्रम सोनवणे :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.१९ मधील खालील नमुद कामे नागरीकांना सोईसुविधा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.१९ मध्ये खालील नमूद तीन कामे जिल्हा नियोजन समिती (डि.पी.डि.सी.) अंतर्गतच्या निधीतून करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.२,३५,००,०००/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१९ मधील सदाशिव नगर मध्ये ओपनस्पेस मध्ये कंपाऊंड व पेव्हर ब्लॉकचे कामे करणे. | रुपये १५ लक्ष |
| २ | प्र.क्र.१९ मधील उपासने नगर २२/३ मधील ओपन स्पेसमध्ये खुल्या जागेस कंपाऊंड वॉल करणे. | रुपये २० लक्ष |
| ३ | प्र.क्र.१९ मधील मेहरुण सुप्रिम कॉलनी अंतर्गत पोलीस कॉलनी लगतच्या संरक्षण भिंत बांधणे. | रुपये २०० लक्ष |
| | एकूण रक्कम रु.- | रु.२,३५,००,०००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे विक्रम किसन**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २७)** नागरीकांना मुलभूत सोईसुविधा पुरविण्यासाठी प्रभाग क्रं.०६ मध्ये विविध चार ठिकाणी रस्ते डांबरीकरणाचे कामे करणे कामी जिल्हा नियोजन समिती (डि.पी.डि.सी.) अंतर्गत एकूण रक्कम रु.१,०६,२२,९८२/- मात्र निधी उपलब्ध करुन देणे कामी सन्मा.सदस्य, श्री.धिरज मुरलीधर सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.धिरज सोनवणे :-** प्रस्ताव मान्य आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.०६ मधील खालील नमुद कामे नागरीकांना सोईसुविधा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.०६ मध्ये खालील नमूद चार कामे जिल्हा नियोजन समिती (डि.पी.डि.सी.) अंतर्गतच्या निधीतून करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१,०६,२२,९८२/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.०६ अंतर्गत बाबा हरदासराम मंगलकार्यालय ते श्रीपाद हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३५,८३,८५४.०० |
| २ | प्र.क्र.०६ अंतर्गत इंडिया गॅरेज ते शिंपी बोर्डींग पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | रु.२७,०४,४७३.०० |
| ३ | प्र.क्र.०६ अंतर्गत रुपाली हॉटेल ते पंचमुखी हनुमान मंदीर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२५,२५,४१६.०० |
| ४ | प्र.क्र.०६ अंतर्गत दत्त मंदीर ते हरदासराम मंगलकार्यालय पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१८,०९,२३९.०० |
| | एकूण रक्कम रु.- | रु. १,०६,२२,९८२/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धीरज मुरलीधर**

**अनुमोदक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २८)** प्रभाग क्रं.१५ मेहरुण गावठाणात महादेव मंदीरा जवळील व गाव बुरुज जवळील दोन्ही पुलांना स्व.सुहास प्रकाश कोल्हे यांचे नांव देणे बाबत विरोधी पक्षनेते,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.विष्णु भंगाळे:-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे .

**श्री.नितीन बरडे :-** मंजुर आहे विषय क्रं. २९ घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. २९ पण मंजुर आहे .

**नगरसचिव:-** विष्णुभाऊ , रियाजभाई

**श्री.विष्णू भंगाळे :-** मंजुर आहे.

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. ३० पण मंजुर आहे सारखाच आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** विकास कामांना आमचा विरोध नाही. म्हणजे

**नगरसचिव:-** विष्णुभाऊ , रियाजभाई विषय क्रं. ३० मंजुर आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. ३१ घ्या.

**नगरसचिव:-** रियाजभाई मंजुर आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, विरोधी पक्षनेते,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार प्रभाग क्रं.१५ मेहरुण गावठाणात महा देव मंदीरा जवळील व गाव बुरुज जवळील दोन्ही पुलांना या प्रभागाचे राहणारे रहीवाशी व सामाजिक कार्यकर्ते " स्व.सुहास प्रकाश कोल्हे " यांचे नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर पुलांना यापूर्वी कोणाचे नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी. तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- भंगाळे विष्णू रामदास**

**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २९)** नागरीकांना मुलभूत सोईसुविधा पुरविण्यासाठी तसेच रहदारी व वाहतुकीच्या सेवा पुरविणेसाठी प्रभाग क्रं.०३ मध्ये दोन ठिकाणी डांबरी रस्त्यांचे कामे करणे कामी एकूण रक्कम रु.२,०९,२५,१२२/- मात्रच्या येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे कामी सन्मा.सदस्या, सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.रंजना सपकाळे:-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.प्रविण कोल्हे:-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.०३ मधील खालील नमुद कामे नागरीकांना मुलभूत सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.०३ मध्ये खालील नमूद दोन कामे करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.२,०९,२५,१२२/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.०३ गोपाळपुरा पासुन ते खडके शाळा (खेडी) पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. | रु.१,२१,२०,६५२.०० |
| २ | प्र.क्र.०३ अंतर्गत गोपाळपुरा पासुन ते हरिओम नगर पर्यंतचा जुना असोदा रोड डांबरीकरण करणे. | रु.८८,०४,४७०.०० |
| | एकूण रक्कम रु.- | रु.२,०९,२५,१२२.००/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सपकाळे रंजना भरत**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३०)** नागरीकांना मुलभूत सोईसुविधा पुरविण्यासाठी प्रभाग क्रं.११ मध्ये कॉंक्रीट रस्ता तयार करणे व आर.सी.सी.गटार बांधणे हे दोन कामे करणेसाठी जिल्हा नियोजन समिती (डि.पी.डि.सी.) अंतर्गत एकूण रक्कम रु.१,७३,०१,२०८/- मात्रच्या निधीतुन खर्च करणे कामी सन्मा.सदस्या, सौ.उषा संतोष पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.उषा पाटील :-** प्रस्ताव मान्य आहे.

**सौ.पार्वताबाई भिल:-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.११ मधील खालील नमुद कामे नागरीकांना मुलभूत सोईसुविधा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील

नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.११ मध्ये खालील नमूद दोन कामे जिल्हा नियोजन समिती (डि.पी.डि.सी.) अंतर्गतच्या निधीतुन करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१,७३,०१,२०८/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.११ मधील हरिविठ्ठल नगर मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | रु.१,०६,७२,२३८/- |
| २ | प्र.क्र.११ मधील हरिविठ्ठल नगर रोड साईडने ठिकठिकाणी आर.सी.सी. गटार बांधणे. | रु.६६,२८,९७०/- |
| | एकूण रक्कम रु.- | रु.१,७३,०१,२०८/- |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील उषा संतोष**

**अनुमोदक :- भिल पार्वताबाई दामु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३१)** स्थायी समिती मार्फत दि.१३/०३/२०२० च्या अर्थ संकल्पात सुचविण्यात आल्याप्रमाणे व प्रभाग समिती कार्यालयांचे रुपांतर मिनी मनपात करणेसाठी रक्कम रु. २५ कोटी १५ लक्ष ची अर्थ संकल्पात तरतुद करण्यात आलेली असल्यामुळे प्रभाग समिती कार्यालयांचे रुपांतर मिनी मनपात करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** या विषयावर शुचिता ताई बोलतील.

**नगरसचिव :-** सन्मा.सदस्या यांच्या लेखी सुचना आलेल्या आहेत.

**ॲड .शुचिता हाडा :-** लेखी आहेच नगरसचिव साहेब ऑनलाईन आहे मी आत्ता जर कनेक्टीव्हीटीला प्रॉब्लेम आला तर त्यासाठी लेखी सुचना पाठविलेली आहे.

**नगरसचिव :-** नाही नाही लेखी सुचना ज्या आहेत त्या महापौर महोदयांनी नगरसचिवांना ॲड्रेस केलेल्या आहेत.त्यामुळे मला त्या वाचाव्या लागतील.

**श्री.विष्णु भंगाळे :-** वाचा वाचा साहेब.

**नगरसचिव :-** त्यासाठीच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या . ॲड . सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या सुचनेवर विचार करून निर्णय घेणे त्याकरीता मा.महापौर महोदयांनी सदर सुचनेचे महासभेत वाचन करणे व ईतिवृत्ता नोंद घेणेबाबत आदेशित केलेले आहे. त्यानुसार त्यांची लेखी सुचना पुढील प्रमाणे

**(सन्मा.सदस्या . ॲड . सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांची विषय क्रं. ३१ संदर्भात प्राप्त झालेली लेखी सुचना पुढील प्रमाणे )**

मी सभापती असतांना स्थायी समिती मार्फत दि. १३ मार्च २०२० रोजी अर्थ संकल्प सादर करण्यात आला होता . सदरील अर्थ संकल्पात अनेक नविन संकल्पना / प्रकल्प मांडण्यात आले होते. त्यापैकीच अत्यंत महत्वपुर्ण व आवश्यक विषय म्हणजे प्रभाग समिती कार्यालयांचे रूपांतर मिनी मनपात करणे. मनपात केंद्रीकृत झालेले सर्वच विभाग जसे की खुला भुखंड , घरपट्टी , पाणीपट्टी इत्यादी सर्व विभागांचे विकेंदीकरण करून ते सर्व विभाग प्रभाग समिती कार्यालयांना जोडण्यात यावे जेणेकरून प्रभाग समिती कार्यालयाचे बळकटीकरण होईल . कामकाजाचा वेग वाढेल व कामकाजाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

सदर कामी रक्कम रूपये २५ कोटी १५ लक्ष ची तरतूद देखील अर्थ संकल्पात करणेत आलेली आहे.

तरी प्रभाग समिती कार्यालयांचे रूपांतर मिनी मनपात करणेस व त्यासाठीचे खर्चास महासभेची मंजुरी मिळावी हि विनंती .

**ॲड .शुचिता हाडा :-** महापौर महोदया

**मा.महापौर :-** बोला शुचितातार्ई .

**ॲड .शुचिता हाडा :-** मला वाटत अनेकवेळा आतापर्यंत प्रभाग समिती कार्यालयांच रूपांतर मिनी मनपात कराव यासाठी स्थायीच्या अनेक सभांमध्ये आणि महासभेसुध्दा यापुर्वीही हि चर्चा झालेली आहे. आणि सगळयाच सदस्यांना आणि प्रशासनाला सुध्दा हि संकल्पना रूचलेली आहे , पटलेली आहे आणि याच महत्व देखील पटलेल आहे. आता उपमहापौरांचे जे दौरे सुरू आहेत प्रत्येक प्रभागात सुनिलभाऊंचे त्यावेळेला सुनिलभाऊंच्या सुध्दा याची निकड लक्षात आलेली आहे. तरी माझी संपुर्ण सभागृहाला विनंती आहे कि विषयाला या संकल्पनेला मिनी मनपामध्ये प्रभाग समिती कार्यालयांचे रूपांतर करणे आणि त्यासाठीच्या खर्चाला महासभेने सर्वानुमते आज मंजुरी द्यावी.

**मा.उपमहापौर :-** धिरजभाऊ

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.धिरज सोनवणे:-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे, मंजुर आहे.

**नगरसचिव:-** विष्णुभाऊ , रियाजभाई

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मंजुर आहे.

**नगरसचिव:-** विष्णुभाऊ , रियाजभाई

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मंजुर आहे.

**नगरसचिव:-** रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.धिरज सोनवणे:-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, स्थायी समिती मार्फत दि.१३ मार्च २०२० रोजी अर्थसंकल्प मांडण्यात आला होता. सदर अर्थ संकल्पात अनेक नवीन संकल्पना / प्रकल्प मांडण्यात आलेल्या आहेत त्यापैकी प्रभाग समिती कार्यालयांचे रुपांतर मिनी मनपात करणे कामी रक्कम रुपये २५ कोटी १५ लक्ष ची तरतुद अर्थसंकल्पात करणेत आलेली आहे. मनपात कैंद्रीकृत झाले ले सर्व विभागांचे जसे की खुला भुखंड, घरपट्टी, पाणीपट्टी इत्यादी सर्व विभागांचे विकेंद्रीकरण करुन ते सर्व विभाग प्रभाग समिती बळकटीकरणासाठी, कामकाजाचा वेग वाढविणे व कामकाजाचा दर्जा सुधारणेसाठी प्रभाग समिती कार्यालयांना जोडणेस व प्रभाग समिती कार्यालयांचे रुपांतर मिनी मनपात करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम / शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- सोनवणे धीरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३२)** प्र.क्र.१५ मधील मेहरुण गांवठाण मध्ये गुरांच्या पाणी पिण्याचे हाळ नविन बांधणे व मनपाच्या जागेला संरक्षण भिंत बांधुन व नविन १ पंप हाऊस रुम तयार करणे कामी जिल्हा वार्षिक नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत रक्कम रु.२० लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत विरोधी पक्षनेता श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे, मंजुर आहे.

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर है.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे, विषय क्रं. ३२ व ३३ सारखेच आहेत. मंजुर आहेत.

**नगरसचिव:-** विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय क्रं. ३४ मध्ये मला काही सुचवायच आहे. महापौर साहेब .

**नगरसचिव:-** विषय क्रं. ३२ व ३३

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर साहेब विषय क्रं. ३४ मध्ये मला काही बोलायच आहे. महापौर साहेब .

**मा.महापौर :-** बोला नवनाथ भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौर साहेब विषय क्रं. ३४ मध्ये मला काही बोलायच आहे. करारनाम्यामध्ये अशी अट टाकावी की ११ महिन्याच्या करारनाम्यामध्ये तो जो जी रक्कम घेणार आहे १५००/- रूपये तर ती कायमस्वरूपी तशीच राहावी १५००/- रूपये लाकडाची आणि त्या प्रकारे बोर्ड लावावा त्या ठिकाणी.

**श्री.नितीन बरडे :-** नवनाथ भाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** बोला नितीनभाऊ

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो

**मा.महापौर :-** बोला नितीनभाऊ बरडे

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब जसे ममुराबाद रोड स्मशानभुमिचे केले आहे . त्याचप्रमाणे मेहरूण स्मशानभुमिचेही करा ईकडे मेहरूण स्मशानभुमिमध्ये सुध्दा लाकडांची गरज आहे. कुणी असेल तर नवनाथभाऊ तिथेही करायला लावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे, मंजुर आहे.

**मा.महापौर :-** मान्य आहे का?

**श्री.प्रशांत नाईक :-** उपमहापौर साहेब.

**सौ.शोभा बारी :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला शुचिताताई

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** किशोरभाऊ अनुमोदन द्या.

**सौ.शोभा बारी :-** महापौरताई , पिंप्राळयाचे पण करायला लावा.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई

**सौ.शोभा बारी :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला प्रशांतभाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई विषय क्रं. ३२ आहे त्याबद्दल मी एक पत्र दिले होते. तो विषय राहुन गेलेला आहे . प्रभाग क्रं. १५ मध्ये जिल्हा वार्षिक नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत महासभेमध्ये विषय पटलावर घेणेबाबतचा

**सौ.शोभा बारी :-** महापौरताई

**श्री.प्रशांत नाईक :-** प्रभाग क्रं. १५ सार्वजनिक शौचालयाच्या जवळील नाल्याला संरक्षण भिंत बांधणेबाबतचा विषय उपमहापौर त्यावेळेला कार्यालयात होते त्यावेळेला दिला होता मी उपमहापौर साहेब

**मा.उपमहापौर :-** प्रशांतभाऊ तुमचा माईक जवळ घेवुन बोला तुमचा आवाज बरोबर येत नाहीये. तुम्ही काय बोलताय काहीच कळत नाहीये.

**श्री.प्रशांत नाईक :-** सुनिलभाऊ

**मा.उपमहापौर :-** बोला

**श्री.प्रशांत नाईक :-** प्रभाग क्रं. १५ श्रीराम कन्या शाळेजवळील पुलापासुन ते सार्वजनिक शौचालया पर्यंत नाल्याला संरक्षण भिंत बांधणेबाबत चा विषय आहे. तुम्ही जेव्हा आमच्या प्रभागात दौराला आले होते .त्यावेळी मी तुम्हाला ते दाखवले होते. सार्वजनिक शौचालया जवळील विषय आहे.

**मा.उपमहापौर :-** सांगीतलय ना आयुक्त साहेबांनी हो सांगीतले आहेना प्रशांतभाऊ

**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ तो विषय झालाय.

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ तो रस्त्याचा विषय होता . हा नाविण्यपुर्ण योजने अंतर्गतचा विषय आहे भाऊ हा दुसरा विषय आहे. हा विषय नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत समाविष्ठ करणेसंदर्भात महापौरांना पत्र दिले आहे आपण

**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** विषय क्रं. ३२ मध्येच ॲड करायचा आहे दोघेही माझ्याच प्रभागातील विषय आहेत. महापौरताई
**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ पुढच्या महासभेत घेवु
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई विषय क्रं. ३२ आमच्याच प्रभागातील आहे. त्याच्यातीलच सुधारीत आहे.
**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ पुढच्या महासभेत घेवु ते
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई लक्षात घ्या.
**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ तसे घेता येणार नाही पुढच्या महासभेत घेवु .
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई आपण एक घेतला विषय क्रं. ३२ आहे ना तो एक नंबर आहे दोन नंबरचे मी पत्र दिलेले आहे तुम्हाला
**मा.महापौर :-** केव्हा दिले होते.
**श्री.प्रशांत नाईक :-** आपण त्या पत्राचा विचार करावा.
**मा.महापौर :-** हो नक्की विचार करू .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्र.क्र.१५ मधील मेहरुण गांवठाण मध्ये गुरांच्या पाणी पिण्याचे हाळ नविन बांधणे व मनपाच्या जागेला संरक्षण भिंत बांधुन व नविन १ पंप हाऊस रुम जिल्हा वार्षिक नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत तयार करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.२० लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भंगाळे विष्णू रामदास**
**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३३)** नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत प्र.क्र.१२ मध्ये मेहरुण सर्व्हे नं.४७२/२ इंद्रप्रस्थ नगर मधील जागेत विद्यार्थ्यां करीता अभ्यासिका बांधणे कामी रक्कम रु.१८,४५,०३८/- व नगरोथ्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.१२ मेहरुण सर्व्हे नं.५६१ मधील १२ मिटर डी.पी.रोड कॉंक्रीटींग करणे कामी अंदाजित रक्कम रु.९९,०३,०१०/- मात्रच्या खार्च मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.नितीन मनोहर बरडे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन बरडे :-** प्रस्ताव मंजुर आहे.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत प्र.क्र.१२ मध्ये मेहरुण सर्व्हे नं.४७२/२ इंद्रप्रस्थ नगर मधील जागेत विद्यार्थ्यां करीता अभ्यासिका बांधणे कामी रक्कम रु.१८,४५,०३८/- व नगरोथ्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.१२ मेहरुण सर्व्हे नं.५६१ मधील १२ मिटर डी.पी.रोड कॉंक्रीटींग करणे कामी अंदाजित रक्कम रु.९९,०३,०१०/- मात्रच्या खर्चास तसेच सदर निधी प्राप्त करणेकामी प्रस्ताव जिल्हा नियोजन कार्यालयाकडे पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनप अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- बरडे नितीन मनोहर**
**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३४)** म.न.पा.च्या मालकीच्या ममुराबाद नाका पुलाजवळील स्मशानभुमी जवळ प्रेतांसाठी लागणारे जळाऊ लाकुड ठेवणे करीता १५ x ३० चे जागेवर शेड उभारणे कामी ११ महिन्याच्या करारावर माफक दरात भाडे तत्वाने जागा उपलब्ध करुन देणेबाबत श्री. प्रल्हाद शंकर कोळी यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**मा.उपमहापौर :-** नवनाथभाऊ बोला .
**श्री.नवनाथ दारकुंडे:-** सांगीतलय सुचवलेले मी काही. सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सांगीतल ना
**नगरसचिव :-** विष्णुभाऊ , रियाजभाई
**श्री.विष्णु भंगाळे :-** मान्य आहे.
**श्री.रियाज बागवान :-** मान्य आहे.
**श्री.नितीन बरडे :-** विषय क्रं. ३४ व ३५ मान्य करा.
**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.उपमहापौर :-** सर्वांनी आपले स्पिकर बंद करा

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, ममुराबाद नाक्या जवळील जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या स्मशानभूमी मध्ये प्रेत जाळण्यासाठी जळाऊ लाकूड उपलब्ध करणेसाठी पुष्कळ समस्या निर्माण होत आहेत. त्याठिकाणी लोकांना जळाऊ लाकूड वेळेवर उपलब्ध होत नसल्याने लोकांना जळाऊ लाकूड घेणेकरिता बाहेर जावे लागते. करिता नागरीकांची गैरसोय होवू नये तसेच त्यांना अत्यंत वाजवी दरात लाकूड उपलब्ध करुन देणेकामी श्री.प्रल्हाद शंकर कोळी, रा.खेडी ता.जि.जळगांव यांनी सदर स्मशानभूमी मध्ये १५X३० चे जागेवर शेड उभारणेस व सदर जागा ११ महिन्यांच्या करारावर माफक दरात भाडे तत्वाने देणेबाबत केलेल्या मागणीनूसार श्री.प्रल्हाद शंकर कोळी, रा.खेडी ता.जि.जळगांव यांना म.न.पा.च्या मालकीच्या ममुराबाद नाका पुलाजवळील स्मशानभुमी जवळ प्रेतांसाठी लागणारे जळाऊ लाकुड ठेवणे करीता १५ x ३० चे जागेवर शेड उभारणे कामी ११ महिन्याच्या करारावर माफक दरात मनपाच्या अटी-शर्तीनुसार भाडे तत्वाने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभेत सूचना केल्याप्रमाणे श्री.प्रल्हाद शंकर कोळी यांनी सदर स्मशानभूमीमध्ये प्रेत जाळण्यासाठी लागणारे जळाऊ लाकूड हे रक्कम रु.१५००/- मात्र घेऊन नागरीकांना उपलब्ध करुन दयावे व सदर दरपत्रकाचा फलक स्मशानभूमीत दर्शनी भागात लावणेत यावा. तसेच मेहरुण व पिंप्राळा येथिल स्मशानभूमी मध्ये सुध्दा प्रेत जाळण्यासाठी जळाऊ लाकूड उपलब्ध करुन देणेस श्री.प्रल्हाद शंकर कोळी हे तयार असल्यास त्यांना सदर ठिकाणी उपरोक्त नमूद केलेल्या दरानुसार लाकूड पूरवीणे बाबत सूचना दयावी व त्यांना त्याठिकाणी मनपाचे अटी-शर्तीनुसार जागा उपलब्ध करुन दयावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३५)** जुने बस स्टॅण्ड ते नेरी नाका मार्गावरील पंकज ऑटो समोरील चौकास लेवा महासंघाचे अध्यक्ष तथा प्रख्यात उद्योजक स्व.अरुणदादा बोरोले यांचे नांव देणेबाबत मा.उपमहापौर श्री.सुनिल वामनराव खडके यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन बरडे :-** मंजुर आहे . गोराणेसाहेब मंजुर आहे.
**मा.उपमहापौर :-** मान्य आहे**.** मिनाक्षीताई
**सौ.मिनाक्षी पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** मंजुर आहे .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.उपमहापौर श्री.सुनिल वामनराव खडके यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार व सभेतील चर्चेनुसार जुने बस स्टॅण्ड ते नेरी नाका मार्गावरील पंकज ऑटो समोरील चौकास लेवा महासंघाचे अध्यक्ष तथा प्रख्यात उद्योजक " स्व.अनिलदादा बोरोले " यांचे नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर चौकास यापूर्वी कोणाचेही नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- पाटील मिनाक्षी गोकुळ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३६)** प्रभाग क्र.२ अंतर्गत आवश्यक १ ते ६ कामांना व येणाऱ्या रक्कम रु.८४ लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या सौ.कांचन विकास सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** कांचनताई बोला.

**सौ.कांचन सोनवणे :-** सदर विषय मान्य आहे.

**मा.महापौर :-** किशोर दादा बोला.

**श्री.किशोर बाविस्कर :-** अनुमोदन आहे माझे विषय क्रं. ३६ ला.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.०२ मधील खालील नमुद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.०२ मध्ये खालील नमूद १ ते ६ कामे करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.८४ लक्ष मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.०२ उज्ज्वल चौक सिध्दीविनायक मंदीर खुल्या जागेत संरक्षण भिंत बांधणे. | रुपये २४ लक्ष मात्र |
| २ | प्र.क्र.०२ कांचन नगर पिरबाबा दर्गामागील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड, पेव्हर ब्लॉक व विदयुत व्यवस्था करणे. | रुपये १६ लक्ष मात्र |
| ३ | प्र.क्र.०२ हरओम नगर हनुमान मंदीर खुल्या जागेत संरक्षण भिंत, गेट बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, विदयुत व्यवस्था व बोअरवेल करणे. | रुपये २६ लक्ष मात्र |
| ४ | प्र.क्र.०२ कांचन नगर दिलीप किराणा समोर सर्वे क्रं.१८ खुल्या जागेस संरक्षण भिंत, पेव्हर ब्लॉक, २गेट, बोअरवेल करणे. | रुपये १२ लक्ष मात्र |
| ५ | प्र.क्र.०२ मध्ये विविध १० ठिकाणी गटारीवर ढापे टाकणे. | रुपये ०४ लक्ष मात्र |
| ६ | प्र.क्र.०२ मध्ये विविध ३ चौकात हायमस्ट लॅम्प बसविणे. | रुपये ०२ लक्ष मात्र |
| | एकूण रक्कम रु.- | रुपये ८४ लक्ष मात्र |

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे कांचन विकास**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३७)** गांधी उद्यानाच्या मेन गेट जवळील F.P.No.326 T.P.S.N.11 ही जागा श्रमसाफल्य अपंग महिला स्वंयसहायता बचत गटास उद्योगासाठी देणेबाबत सन्मा.सदस्या ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** शुचितातार्इ बोला.

**नगरसचिव :-** सन्मा.सदस्या ॲड शुचितातार्इ हाडा यांची विषय क्रं. ३७ संदर्भात लेखी सुचना प्राप्त झालेली आहे ती पुढील प्रमाणे असे.

**सन्मा.सदस्या ॲड शुचिता अतुलसिंह हाडा यांची विषय क्रं. ३७ करीता ची लेखी सुचना**

श्रमसाफल्य अपंग महिला स्वंयसहायता बचत गट जळगांव शहरातील अपंग महिलांचा बचत गट आहे. त्यांनी त्यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे माझे प्रभागातील गांधी उद्यानाच्या मेन गेट जवळील F.P.NO.३२६ T.P.S.N. ११ हि जागा त्यांचे बचत गटास कायम स्वरूपी उद्योग व्यवसाय निर्मिती कामी बुथ / केंद्र तयार करून महानगरपालिकेचे नियमाप्रमाणे खाद्यपदार्थ / शिवभोजन इ . उद्योग व्यवसाय करून बचत गटातील महिलांचे कुटुंबाचे उदरनिर्वाहास हातभार लावणेचे दृष्टीने त्यांना देणेस मनपाच्या अटी शर्तींना अधिन राहुन महासभेची मंजुरी मिळावी हि विनंती.

**ॲड . शुचितातार्इ हाडा:-** मनपाच्या नियमानुसार महासभेने मंजुरी द्यावी हि विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-** अमितदादा

**श्री.नितीन बरडे :-** गेटच्या कोणत्या साईडला आहे.

**ॲड . शुचितातार्इ हाडा:-** नितीनभाऊ पत्रकार कॉलनी आणि गांधी उद्यान याच्यामधील तो खटका आहे. ट्रॅफीकला कुठलीही अडचण येणार नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** तार्इ कोणत्या रोडाने म्हणताहेत तुम्ही.

**श्री.नितीन बरडे :-** पत्रकार कॉलनी

**ॲड.शुचितातार्इ हाडा:-** गांधी उद्यानाच्या बाजुला

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरतार्इ, महापौर महोदया

**मा.महापौर :-** बोला विष्णूभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** कोणत्या बाजुला म्हणताहेत ते नेमकं

**ॲड.शुचितातार्इ हाडा:-** पत्रकार कॉलनी आणि गांधी उद्यान याच्यामधील तो खटका आहे. ट्रॅफीकला कोणत्याही पध्दतीने अडथळा येणार नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** शुचितातार्इ टेलीफोन ऑफीस कडे जाणाऱ्या रोडवर म्हणताहेत का तुम्ही

**ॲड.शुचितातार्इ हाडा:-** गांधी उद्यानाच्या लगतचा भाग म्हणतेय मी गांधी उद्यानाला लागुन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** शुचितातार्इ टेलीफोन ऑफीस कडे जाणाऱ्या रोडवर म्हणताहेत का तुम्ही की बस स्टॅंड कडे जाणाऱ्या रोडवर

**ॲड . शुचितातार्इ हाडा:-** टेलीफोन ऑफीस कडे जाणाऱ्या रोडवर आहे बरोबर आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ओके ओके ठिक आहे.

**ॲड . शुचितातार्इ हाडा:-** बस स्टॅंड कडचा रोड नाहीये.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ओके ओके ठिक आहे.

**श्री.नितीन बरडे :-** भिंतीला त्रास होणार नाहीना

**श्री.विष्णु भंगाळे :-** रहिवाश्यांना त्रास होईल अश्या पध्दतीने देवु नका.

**ॲड . शुचितताई हाडा:-** हो हो कुणालाही त्रास होणार नाही. नियमानुसारच होईल
**श्री.विष्णु भंगाळे :-** ओके ओके.
**मा.उपमहापौर :-** अमित काळे
**श्री.अमित काळे :-** प्रस्ताव मान्य आहे.
**नगरसचिव :-** रियाजभाई, रियाजभाई
**श्री.रियाज बागवान :-** हो नियमानुसार मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, खादयपदार्थ/शिवभाजन इ.उदयोग व्यववसाय करुन बचत गटातील महिलांचे कुटूंबाचे उदरनिर्वाहास हातभार लावणेचे दृष्टीने गांधी उद्यानाच्या मेन गेट जवळील F.P.No.326 T.P.S.N.11 ही जागा श्रमसाफल्य अपंग महिला स्वंयसहायता बचत गट,जळगांव यांना कायम स्वयरुपी उद्योग व्यवसाय निर्मितीकामी बुथ/केंद्र तयार करुन खादयपदार्थ/शिवभाजन इ.उदयोग व्यववसाय करणेस मनपाच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणासही दिली गेली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३८)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ज.श.म.न.पा.स रु.१०० कोटी निधी मंजुर असुन सदर निधी प्रलंबित आहे. सदर कामी प्रशासकीय पाठपुरावा करणे व वेळ प्रसंगी सदरील निधी मनपास प्राप्त होणेसाठी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाद मागणेसाठीच्या खर्चास मान्यता मिळणे कामी सन्मा.सदस्या ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**नगरसचिव :-** सदर विषयासंदर्भात सन्मा.सदस्या ॲड शुचितताई हाडा यांनी लेखी सुचना दिलेली असुन ती पुढील प्रमाणे

**सन्मा.सदस्या ॲड शुचिता अतुलसिंह हाडा यांची विषय क्रं. ३८ करीता ची लेखी सुचना**

उपरोक्त विषयान्वये जळगांव मनपास राज्य शासनाने १०० कोटींचा निधी मंजूर केलेला आहे.त्यापैकी ४२ कोटींचे निधीस प्रशासकीय मान्यता मिळून त्याची निविदा प्रक्रीया देखील झालेली आहे वनिविदा अंतिम मंजुरीसाठी आहेत. तसेच ५८ कोटींची कामे तांत्रिक मान्यतेसाठी अधिक्षक अभियंता PWD कडे प्रलंबित आहे.

मात्र मध्यंतरीच्या काळात राज्यातील सरकार बदलल्याने निधी बाबतची प्राथमिकता बदलली , मानसिकता बदलली व स्थगिती येवुन सदर कामे प्रलंबित झाली.

मात्र आमची धारणा आहे की, एकदा शासनाने शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर जरी सरकार बदलले तरी सदरील कामे थांबविणे उचित नाही. सदरील निधी शासनाने जळगांव मनपास वर्ग करायला हवा. मात्र असे होत नसल्याने सदर कामी प्रशासकीय पाठपुरावा करणे व वेळ प्रसंगी सदरील निधी महापालिकेस प्राप्त होणेसाठी व विकासकामे होणेसाठी शासन स्तरावर वारंवार पाठपुरावा करून हि उपयोग होत नाही हि वस्तुस्थिती आहे. मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दाद मागणेसाठीच्या व्यतिरीक्त पर्याय उरला नाही . सबब कराव्या लागणाऱ्या याचिकेस व खर्चास महासभेची मान्यता मिळावी हि विनंती.

नुकतेच वरणगांव नगरपालिकेने अश्याचप्रकारे खंडपीठात दाद मागीतली असता १० दिवसांत नगरपालिकेच्या खात्यात निधी वर्ग करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत.

तरी जळगांव शहराच्या विकासाचे दृष्टीने सदर विषयास महासभेत मंजूरी मिळावी हि विनंती.

**ॲड . शुचितताई हाडा:-** महापौर महोदया जसं आत्ताच विष्णुभाऊंनी म्हंटल होत की, १०० कोटींच्या निधी संदर्भात उज्वला ताईंनी त्यांना आठवण करून दिली. त्यावेळेला आत्ताच विष्णुभाऊंनी कबुल केलेल आहे की आपण या संदर्भातील पाठपुरावा शासन दरबारी करूयात. तर त्या संदर्भातीलच हा प्रस्ताव आहे.जळगांवच्या विकासासाठीचेच काम आहे आणि वरणगांव नगरपालिकेच एक उदाहरण आपल्या समोर आहे की वरणगांव नगरपालिकेने उच्च न्यायालयात दाद मागीतल्यानंतर १० दिवसांत शासनाने हा निधी त्यांच्या खात्यात वर्ग केलेला आहे. तरी महासभेने हा ठराव सर्वानुमते मंजुर करावा अशी महासभेला माझी विनंती आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय,

**श्री.दिलीप पोकळे :-** सदर प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय,

**श्री.दिलीप पोकळे :-** सदर प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय,

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ.

**श्री. प्रशांत नाईक :-** महापौर महोदय मला बोलायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदय, मी आपल्याला सांगु ईच्छितो की आता आपण हा प्रस्ताव ठेवला

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता आपण हा प्रस्ताव ठेवता की शासनाकडे मदत मागायची आणि शासनाच्याच विरोधात कोर्टात जायच हे योग्य आहे का ? आणि एक दुसरे की हा १०० कोटींचा निधी मा.माजी मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या मनपाला दिले परंतू का येवु शकले नाही. म्हणजे सार्वजनिक बांधकामावर आपल्या मनपाचा विश्वास होता आपल्या पदाधिकाऱ्यांचा विश्वास होता.आणि मग मनपाच्याच कर्मचाऱ्यांवर

**मा.महापौर :-** आवाज येत नाहीये विष्णुभाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मनपाच्या अधिकाऱ्यांवर तो विश्वास ठेवला नाही मग याला दिरंगाई लागली का ?

**मा.महापौर :-** आवाज येत नाहीये विष्णुभाऊ.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आणि ह्या दिरंगाई मध्ये काम न करण्यास कोण

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,

**श्री.विष्णु भंगाळे :-** याच्यावर का म्हणुन अश्याप्रकारे हा भेदभावाचा प्रश्न आहे. आम्ही शिवसेना याला विरोध करू. तुम्ही एका गोष्टी कडे म्हणतात की आपण निधी मागण्याचा प्रयत्न करू आणि त्याच्यातच म्हणतात की कोर्टामध्ये जावुन न्याय मागु म्हणजे हि दुटप्पी भावना योग्य नाही महापौर महोदय म्हणुन आम्ही आपणांस सांगु ईच्छितो कि जे काही काम होते शहराच्या दृष्टीने योग्य आहेत .परंतु त्यावेळेच्या कोणत्या लोकांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत न करता त्या कामात मनपाच्या माध्यमातुन त्याचे नियोजन केले गेले असते. तर आतापर्यंत हा सर्व निधी तुमच शासन असतांना आला असता तर हे तुमच्या शासनाला लागु झाले असते. परंतू पुर्ण जिल्हयावर आता जी कोविड ची परिस्थिती आलेली आहे .

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णु भाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** आणि या परिस्थितीमध्ये शासन निधी किती देईल. शासनाचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पडुन आहेत परंतू ते सुध्दा देत नाहीत.

**मा.उपमहापौर :-** मध्ये कोणीच बोलु नका.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्यासाठी पालकमंत्री महोदय असतील , मा.एकनाथराव शिंदे साहेब असतील यांच्याकडे डिमांड करून आपण मागु शकु , परंतू त्यांच्या विरोधात आपण कोर्टात जायचं

**मा.उपमहापौर :-** मध्ये कोणीच बोलु नका.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आधीच्या सत्तेत असलेले म्हणतात की यासाठी आम्हाला मदत करा

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णु भाऊ , विष्णु भाऊ जर आपल्या मदतीतुन जर आपल्याला लगेच निधी प्राप्त झाला तर आपल्याला कोर्टात जाण्याची वेळ येणारच नाही. तशी वेळ येवु नये हिच आमची हार्दीक ईच्छा आहे. विष्णुभाऊ तशी वेळ येवु नये हि ईच्छा आहे. मात्र जर पाठपुरावा करूनही उपयोग होत नसेल तर अश्या वेळेला आपण हा ठराव करायला हवा कारण जळगांवच्या विकासाचा हा प्रश्न आहे आणि त्यामुळे मला वाटत की सगळयांनी या विषयाला साथ द्यायला हवी

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय, महापौर महोदय याप्रमाणे कोर्टात जावुन मनपाच्या पैशांचा नक्कीच दुरूपयोग होईल अस वाटत. आज जर हा निधी नाही मिळाला तर याची जबाबदारी कोण घेईल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला

**श्री.विष्णु भंगाळे :-** मला याचं उत्तर हवयं

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, माजी मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी माजी जलसंपदा मंत्री गिरीषभाऊ महाजन तसेच जळगांव शहराचे आमदार श्री.राजुमामा भोळे यांच्या प्रयत्नातुन १०० कोटी निधी हा जळगांव शहरासाठी मंजुर केलेला होता आणि ते कामं सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन ईस्टिमेटही तयार आहे. परंतु दुर्देवाने सरकार बदललं आणि तत्कालीन सरकारने मंजुर केलेला निधी

**श्री.विष्णु भंगाळे :-** याला किती दिवस लागले याला हा निधी मंजुर व्हायला व काम व्हायला. . .

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ,भाऊ दोन मिनिट ऐकुन तर घ्या. तुमचं ऐकुन घेतले शांततेने आता आमचही ऐकुन घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय,

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आपण खर्च करू शकलो नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय, आयुक्तांवर विश्वास नव्हता का , आयुक्तांच्या माध्यमातुन आपले शहर अभियंता यांच्या माध्यमातुन आपण कामांच नियोजन केल असत तर जळगांव शहराच्या विकासाला तो निधी कामात आला असता.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ,भाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** तो कामात आला असता आपण का म्हणुन सार्वजनिक बांधकामाकडे गेले आणि. .

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ,भाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** का म्हणुन एवढा वेळ लावला ऐवढ्या उशिरा ईस्टिमेट बनविण्याचे कारण काय याला जबाबदार कोण आणि वरून तुम्ही उलटे हे बोलताहेत महापौर ताई आवाज येत नाहीये

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ,भाऊ आम्ही आमचे

**मा.महापौर :-** राजुभाऊ पाटील , राजुभाऊ पाटील

**श्री.नितीन बरडे :-** टेंडर आपण स्वत: भरले आहेत.

**मा.उपमहापौर :-** राजुभाऊ पाटील आपण बोला , बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ,भाऊ आपण बोलले आम्ही सर्व शांततेने ऐकुन घेतले आपणही ऐकून घ्यायची मानसिकता ठेवा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आयुक्तांवर विश्वास नव्हता का तुमचा, आयुक्ताच्या माध्यमातुन, शहर अभियंताच्या माध्यमातुन कामाच नियोजन केल असत,तर विकास कामांसाठी तो निधी कामात आला असता. आपण का सार्वजनिक बांधकामाकडे गेले.आणि का म्हणुन ऐवढा वेळ लावला. याच कारण काय ? याला जबाबदार कोण ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपल्या सगळयांना जळगांव शहराच्या विकासासाठी आपल्याला सर्वांना आमच्या वतीने विनंती करण्यात येत आहे आपणही यासाठी सर्वांनी सहकार्य करावं आणि हा विषय जो आहे.

**श्री.नितीन बरडे :-** निधी मिळवायला आम्ही जावु

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपला हा निधी जो आहे याची जर स्थगिती उठवली तर आपल्याला हायकोर्टात जायची आवश्यकता भासणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** निधी मिळवायला आम्ही जावु

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपला हा निधी जो आहे याच्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायचे आहेत आणि जर प्रयत्न करूनही येत नसेल तर हा पुढचा विषय आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय, दुजाभाव करण्याच बंद करा

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णु भाऊ जर निधी नाही आला तरच फक्त आपण कोर्टामध्ये जाणार आहोत हे लक्षात घ्या येथे विष्णुभाऊ त्याला आपण

**श्री.विष्णु भंगाळे :-** आमचा याला विरोध आहे

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** आपण प्रयत्न करूनही यश आलेले नाही.

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** म्हणुनच आपण कोर्टात जाणार आहोत

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ , शुचिताताई

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** हा विषय समजुन घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आमचा याला विरोध राहील तुम्ही जर शासनाच्या विरोधात कोर्टात जाणार असाल आणि दुजाभाव

**मा.महापौर :-** विष्णु भाऊ ,

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णुभाऊ आपल्या पाठपुराव्याने जर विषय मार्गी लागला तर कोर्टात जाण्याची वेळच येणार नाहीये हे आपण लक्षात घ्या.

**मा.महापौर :-** विष्णुभाऊ , विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** बोला महापौर महोदया

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपला शहराच्या विकासाला विरोध आहे का विष्णुभाऊ

**मा.महापौर :-** विष्णुभाऊ , विरोध आहे का तुमचा

**श्री.विष्णु भंगाळे :-** बोला महापौर महोदया हो विरोध आहे.

**मा.उपमहापौर :-** पोकळे साहेब

**श्री.विष्णु भंगाळे :-** आम्ही अहो नगरसचिव महोदय , महापौर महोदया

**मा.महापौर :-** यांचा विरोध आहे

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपण शासनाकडे जावुन महाराष्ट्र शासनाकडे जावुन आज जळगांव शहराच्या विकासासाठी हा निधी मागु आणि त्यांच्याकडुन आणण्याचा प्रयत्न करू आणि आमच्या सर्व शिवसेनेच्या नगरसेवकांची भुमिका हि आहे की कोर्टात जाण्याचा निर्णय सत्ताधारी पक्ष घेत आहे त्याला आमचा विरोध आहे आणि आमचे पालकमंत्री महोदय मा.गुलाबराव पाटील साहेब असतील एकनाथराव शिंदे साहेब असतील , राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब असतील यांच्या माध्यमातुन जळगांवच्या कामांसाठी निधी आणण्याचा प्रयत्न आम्ही नक्की करू

**मा.महापौर :-** मान्य करू का मग हा विषय

**श्री.विष्णु भंगाळे :-** याला आमचा विरोध आहे आणि या माध्यमातुन

**श्री.रियाज बागवान :-** याला आमचा विरोध आहे.

**मा.महापौर :-** विष्णुभाऊ

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णुभाऊ हा निधी जर आला तर आपण स्वागतच करू

**श्री.नितीन बरडे :-** नगरसचिव साहेब उपसुचना लिहुन घ्या

**मा.महापौर :-** उपसुचना काय आहे तुमची

**श्री.नितीन बरडे :-** विष्णुभाऊंनी दिलेली आहे उपसुचना ती मांडुन घ्या.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**नगरसचिव :-** विष्णुभाऊ आपला विरोध आहे. शिवसेनेचा विरोध आहे ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** याला आमचा विरोध आहे पण तो मुद्दयांसहित लिहा. नगरसचिव महोदय विरोध का करतोय त्याचा मुद्दयासहित लिहा उपसुचनेला उपसुचनेत आमचे मुद्दे आले पाहीजेत . आम्ही स्वत: शासनाकडे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे, नगरविकास मंत्री महोदय, पालकमंत्री महोदय यांच्या माध्यमातुन निधी आणण्याचा प्रयत्न करू. म्हणुन कोर्टात जायची आवश्यकता नाही आणि कोर्टात जावुन हा निधी आला नाही तर याला जबाबदारी कोणाची या खर्चाला जबाबदार कोण महापालिका की अनुमोदक

**श्री.रियाज बागवान :-** गोराणेसाहब २० नंबर का जब विषय लिया गया था विषय विशेष निधी का तभी उज्वला ताईने बोले की १०० करोड का निधी के लिये मा.गुलाबराव पाटील साहेब ईनसे मिलना है जब अपनेको मिलना है तो ईन सब लोगोसे जाके तो मेरे ख्याल से ये विषय लाने के लिये कोई ये नही होना चाहीये था तो अभी ईस विषय के लिये हमारे तरफ से हम तटस्थ है हम

**नगरसचिव :-** तटस्थ है क्या एमआयएम तटस्थ आहे.

**श्री.रियाज बागवान :-** हा एमआयएम तटस्थ आहे.

**नगरसचिव :-** शिवसेना यांचा विरोध आहे, एमआयएम तटस्थ आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नगरसचिव साहेब विरोध लिहीतांना आमची उपसुचना लिहावी. उपसुचना लिहावी. आम्ही जळगांव शहराच्या विकासासाठी निधी आणणार आहोत

**श्री.रियाज बागवान :-** नगरसचिव साहेब आपण जब जाणेवाले है तो

**नगरसचिव :-** आदरणीय विष्णुभाऊ , आदरणीय विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो बोला.

**नगरसचिव :-** आदरणीय विष्णुभाऊ , आपण जे सभागृहात मांडलेल आहे त्याची नोंद घेतली जाईल . परंतू ठरावाला तुमचा विरोध आहे ना

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो , हो कोर्टात जाण्यास विरोध आहे.

**नगरसचिव :-** विष्णुभाऊ म्हणजे बहुमताने मंजुर आहे हा विषय म्हणजे भारतीय जनता पार्टीने बहुमताने मंजुर केलेला आहे ह्या ठरावा आपला विरोध आहे आणि एमआयएम तटस्थ आहे.

**श्री.रियाज बागवान :-** महापौर ताई एकबार अपण कोर्ट मे जानेवाले हैना एकबार उनसे बात करके देखते है और २० नंबर ठराव मे बात हुई ना ईसके लिये

**अॅड शुचिता अतुलसिंह हाडा :-** रियाजभाई, रियोजभाई २० नंबरच्या ठरावात जेव्हा आपल बोलणं झाल त्यावेळेला सुध्दा विषय हाच आहे की आपल्या सगळयांच्या पाठपुराव्याने जर हा निधी मंजुर होवुन येत असला तर आपल्याला कोर्टात जाण्याची वेळ येणारच नाहीये. पण जर तसं होत नसेल तर त्यासाठी पुन्हा एकदा महासभेची वाट बघण्याची

**श्री.विष्णु भंगाळे :-** शुचितातांई आधी तुम्ही प्रयत्न करुन पहा जर होत नसेल तर त्याच्यानंतर तुम्ही महासभेत विषय मंजुर करा ना.

**अॅड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णुभाऊ पुर्वीपासुनच या विषयाचा पाठपुरावा करते आहे आणि पाठपुरावा केल्यानंतर सुध्दा त्याला यश येत नाहीये त्यावेळेलाच हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मला एक सांगा का म्हणुन उशिर लागला

**अॅड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णुभाऊ आणि आपल्या पाठपुराव्याने

**श्री.विष्णु भंगाळे :-** मला एक सांगा का म्हणुन उशिर लागला

**अॅड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णुभाऊ आणि आपल्या पाठपुराव्याने जर आला तर आम्ही आपलं अभिनंदन करू आम्ही मोठया मनाने आपल अभिनंदन करू विष्णुभाऊ

**श्री.नितीन बरडे :-** महापालिकेच्या माध्यमातुन केले असते तर आतापर्यंत काम झालेले असते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** काम पुर्ण झालेले असते महापालिकेच्या माध्यमातुन केले असते

**अॅड शुचिता अतुलसिंह हाडा :-** विष्णुभाऊ जर आपल्या पाठपुराव्याने निधी आला तर आम्ही आपलं अभिनंदन करू आम्ही मोठया मनाने आपल अभिनंदन करू विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपण जर महापालिकेच्या माध्यमातुन केले असते तर काम झाली असती.

**श्री.प्रशांत नाईक :-** ताई महापौर ताई १०० कोटीच फळ घेतल नाही आणि आता हे धडपड घेताहेत याच कारण काय आहे निधी आणण्यासाठी

**मा.महापौर :-** भारतीय जनता पार्टीने बहुमताने मंजुर केलेला आहे हा विषय

**श्री.प्रशांत नाईक :-** मग शिवसेना

**नगरसचिव :-** विषय क्रं. ३९

**श्री.प्रशांत नाईक :-** हॅलो ताई महापौर ताई,

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेस राज्य शासनाने १०० कोटींचा निधी मंजुर केलेला आहे. त्यापैकी ४२ कोटींचे निधीस प्रशासकीय मान्यता मिळुन त्याची निविदा प्रक्रिया देखिल झालेली आहे. सदर ४२ कोटींचे निधी अंतर्गतचे कामापोटी महानगरपालिकेचा हिस्सा म्हणुन ५.१० कोटी स्वहिस्सा निधीची तरतुद देखिल करुन ठेवली आहे. उर्वरीत ५८ कोटींचे निधी अंतर्गतची कामे Technical Sanction साठी प्रलंबित आहेत. परंतु राज्यशासनात सरकार बदल्याने मानसिकता बदलली व सदरील कामे प्रलंबित झाली. मात्र एकदा शासनाने प्रशासकीय मान्यता दिल्या नंतर जरी सरकार बदलले तरी सदरील कामे थांबविणे उचित नाही. सदरील निधी शासनाने जळगांव महानगरपालिकेस वर्ग करणे आवश्यक आहे परंतू तसे होत नसल्यामुळे सदर कामी प्रशासकीय पाठपुरावा करणे व वेळ प्रसंगी सदरील निधी महानगरपालिकेस प्राप्त होणेसाठी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दाद मागणेसाठीच्या व्यतिरिक्त पर्याय उरलेला नाही त्यामुळे मे.न्यायालयात दाखल करावा्या लागणाऱ्या याचिकेस व त्यासंबंधीत लागणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम / शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५१ प्रतिकुल मते :- १३ तटस्थ :- ०२**

**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३९)** पिंप्राळा रेल्वे उड्डाण पुल डावी भुजा (R.O.B.left Arm) विकसीत करणेबाबत आवश्यक खाजगी जागा भुसंपादन करणे कामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**नगरसचिव :-** सदर विषयासंदर्भात सन्मा.सदस्या ॲड शुचितातार्इ हाडा यांनी लेखी सुचना दिलेली असुन ती पुढील प्रमाणे

**सन्मा.सदस्या ॲड शुचिता अतुलसिंह हाडा यांची विषय क्रं. ३९ करीता ची लेखी सुचना**

उपरोक्त विषयासंदर्भात वेळोवेळी MSRDC (रेल्वे खाते व महाराष्ट्र शासनाचे उपक्रम) यांचे सोबत झालेल्या चर्चेप्रमाणे व मा.खासदार श्री.उन्मेषदादा पाटील यांचे सोबत DRM ऑफीस भुसावळ येथे झालेली मिटींग तदनंतर वेळोवेळी केलेली Spot Visit तसेच मा.कलेक्टर सो श्री.अभिजीत राऊत सो यांनी त्यांचे कार्यालयात सदर विषयासंदर्भात घेतलेली मिटींग व त्यावेळी महारेलच्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी Left Arm संदर्भातला दिलेल्या नकाशाप्रमाणे अत्यंत कमी खाजगी जागा भुसंपादीत करावी लागत आहे.

सदर प्रकरणी MSRDC कडुन ROB ची निविदा प्रक्रीया झालेली असुन लवकरच उड्डाण पुलाचे काम सुरू होणार आहे. सदरील उड्डाण पुलावर पिंप्राळा वासियांना रहदारीसाठी जोडले जाण्यासाठी Left Arm आवश्यक आहे त्यासाठी रेल्वेच्या जागेतुन जागा उपलब्ध करून द्यावी यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आलेला आहे. मात्र रेल्वे विभागाने जागा उपलब्ध करून देणेस स्पष्ट नकार दिलेला आहे.

सदर परिस्थितीमध्ये पिंप्राळा रस्त्यास समांतर रस्त्यावर भुसंपादनाची कार्यवाही केल्याशिवाय Left Arm विकसीत होऊ शकत नाही . रेल्वे खात्याशी (MSRDC अधिकारी) चर्चा झाल्याप्रमाणे उड्डाणपुल व Arm Left त्यांच्या खर्चाने विकसीत करून देणेस तयार आहे .मात्र सदर खर्चाचा प्रशासकीय मान्यतेमध्ये MSRDC Left Arm साठी भुमिसंपादनाच्या रक्कमेची अदायगी करणेस तयार नाही. त्यामुळे सदर Left Arm प्रसंगी रद्द होऊ शकतो.

नगररचना विभागामध्ये भुसंपादना कामी विकास शुल्क १४ कोटी ६७ लाख ९१ हजार ३५४ TDR ६,३०,२९,७५२/- प्रिमियम ४,१४,९१,५६५/- गुंठेवारी ९,९९,०६१/- ऐवढी रक्कम उपलब्ध असल्याचे समजुन आले आहे व बजेटमध्ये भुसंपादनासाठी १०० कोटीची तरतुद देखील करण्यात आली आहे.

तरी सदरील ROB ची Left Arm ची निकड पाहाता सदरील Left Arm साठीचे आवश्यक खाजगी जागा भुसंपादीत करणेकामी लागणाऱ्या खर्चास महासभेने मंजुरी द्यावी व त्वरीत MSRDC च्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय

साधुन आवश्यक तेवढया खाजगी जागेचे भुसंपादन करून Left Arm विकसीत करणेकामी उपलब्ध करून द्यावी हि विनंती.

**ॲड शुचिता अतुलसिंह हाडा :-** महापौर महोदया , मला येथे सांगायला आनंद वाटेल की आता जो रेल्वेने नकाशा करून पाठविलेला आहे तो अत्यंत कमी जागा भुसंपादन करावी लागणार आहे आणि अशा पध्दतीचा नकाशा आपल्या कलेक्टर साहेबांच्या मिटींग नंतर पाठविण्यात आलेला आहे आणि एक आपल्या ९ नगरसेवकांची स्थानिक त्या प्रभागाशी संबंधित असलेल्या नगरसेवकांच्या सह्या सुध्दा या पत्रावर आहेत. यामध्ये आपल्या सदस्या आहेत सन्मा.लताताई भोईटे ज्यांच्या परिवाराचीच प्रापर्टी येथे बाधित होते आहे आणि मला वाटत की भोईटे सरकार हे जळगांवातलं जुनं जाणत सरकार आहे. ज्यांनी लोकांसाठी अनेक चांगली कामं केलेली आहेत आणि जळगांवातील भोईटे गढी आपल्या सर्वांना परिचीत आहे . तर असे हे कुटुंब जेव्हा हि जागा सुध्दा द्यायला तयार झालेलं आहे. भोईटे ताईंची सही सुध्दा या पत्रावर आहे.मला वाटत त्यांच सगळयांनी अभिनंदन सुध्दा केल पाहीजे यासाठी की नागरीकांचा खुप मोठा प्रश्न या विषयातुन सुटणार आहे आणि सगळयांनीच लवकरात लवकर प्रशासनाने या विषयाची दखल घ्यायची आहे आणि हि भुसंपादन प्रक्रीया पार पाडुन हि जागा रेल्वेच्या ताब्यात द्यावी . जेणेकरून हा आर्म विकसीत होईल आणि पिंप्राळा वासीयांना या आर्मवरुन जाण्यायेण्याची सोय होणार आहे.

**श्री.मयुर कापसे :-** मला बोलायचे आहे महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला मयुरभाऊ

**श्री.मयुर कापसे :-** माझी एक सुचना आहे प्रशासनाला आपण बघतोय की शिवाजी नगर पुलाचे आर्मचे काम चालु आहे.ते ज्या पध्दतीने संथगतीने चालु आहे. तर त्यापासुन नागरीकांना खुपच हाल सोसावे लागताहेत. पण तसे न होता टेक्नीकल बांबींची संपुर्ण पुर्तता करून, भुसंपादन करून म्हणजे जेव्हा काम चालु होईल त्याच्यात कुठेही विलंब न होता लवकरात लवकर हे काम कस मार्गी लागेल याची प्रशासनाने योग्य ती दखल घ्यायची आहे.व माझ्या सुचनेची नोंद करायची आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया,

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, हा प्रस्ताव चांगला आहे.आपल्या जळगांव शहरातील मोठया प्रमाणातील भाग त्या भागात आहे.परंतु जसे आता शिवाजी नगरचा पुल असेल. त्यानंतर आपण ह्या ममुराबाद पुलाचे काम सुध्दा एकाचवेळेस काढलं त्यामुळे

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ आवाज येत नाहीये, विष्णुभाऊ आवाज येत नाहीये

**श्री.विष्णु भंगाळे :-** ते काम करत असतांना हे काम

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ आवाज येत नाहीये,

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता येतोय का? हॅलो

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ आवाज येतोय बोला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता येतोय का? हॅलो ताई मला आपला आवाज येतोय माझा आवाज येत नाहीये तुम्हाला.

**मा.महापौर :-** बोला विष्णुभाऊ हो हो

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर ताई, जसं आधी सांगीतल्याप्रमाणे त्या भागात आपल्या जळगांव शहरातील नागरीक खुप मोठया प्रमाणात आहेत. फक्त त्याला गती हि विकासाच्या दृष्टीने असेल तर हा पुल जो आहे हि नक्कीच चांगली गोष्ट आहे. आपला हा पुल कधीचाच मंजुर व्हायला हवा होता . परंतु काही अडी अडचणी आल्यात परंतू नक्कीच त्या दृष्टीने पाऊलं उचलले गेले पाहीजेत की त्या प्रभागातील त्या भागातील लोकांना येतांना पुढील काळामध्ये त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

**नगरसचिव :-** विष्णुभाऊ प्रस्ताव मंजुर आहे ना

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर ,मंजुर

**नगरसचिव :-** रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर ,मंजुर

**श्री.नितीन बरडे:-** सगळे मंजुर करा.

**नगरसचिव :-** मयुरभाऊ
**श्री.मयुर कापसे :-** माझे अनुमोदन आहे. माझी सुचना नोंदवण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, MRIDC कडुन R.O.B ची निविदा प्रक्रिया झालेली असुन लवकरच उड्डाणपुलाचे काम सुरु होणार आहे मात्र सदरील उड्डाणपुलावर पिंप्राळा वासीयांना रहदारीसाठी जोडले जाण्यासाठी Left Arm अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी रेल्वेच्या जागेतुन जागा उपलब्ध करुन देणेसाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आलेला आहे. मात्र रेल्वे विभागाने त्यांचे जागेतुन जागा उपलब्ध करुन देण्यास स्पष्ट नकार दिलेला आहे.

सदर परिस्थितीमध्ये पिंप्राळा रस्त्यास समांतर रस्त्यावर भुसंपादनाची कार्यवाही केल्याशिवाय Left Arm विकसीत होऊ शकत नाही. रेल्वे खात्याशी चर्चा झाल्याप्रमाणे उड्डाणपुल व Left Arm त्यांच्या खर्चाने विकसीत करुन देणेस तयार आहेत. मात्र सदर खर्चाच्या प्रशासकीय मान्यतेमध्ये MRIDC Left Arm साठी भुमीसंपादनाच्या रक्कमेची अदायगी करणेस तयार नाही त्यामुळे सदर Left Arm प्रसंगी रद्द होवू शकतो त्यामुळे सदर पुल विकसीत होण्यास विलंब होत आहे.

R.O.B ची व Left Arm ची निकड पाहता सदरील Left Arm साठीचे आवश्यक खाजगी जागा भुसंपादीत करणे कामी लागणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने त्वरीत MRIDC च्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधुन आवश्यक तेवढया खाजगी जागेचे भुसंपादन करुन Left Arm विकसीत करणेकामी उपलब्ध करुन दयावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४०)** सर्व्हे नं.२४७ रिंगरोड लगत हनुमान मंदिराशेजारी ओपन स्पेस मध्ये जेष्ठ नागरीक कट्टा व वाचनालय बनविणेसाठी इनरव्हील क्लब ऑफ जळगांव ईस्ट या संस्थेस देणेबाबत सन्मा.सदस्या सौ.दिपमाला मनोज काळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन बरडे:-** मंजुर
**सौ.दिपमाला काळे:-** सदर प्रस्ताव मान्य आहे.
**मा.उपमहापौर:-** अमितभाऊ काळे
**श्री.अमित काळे :-** सदर विषयास अनुमोदन आहे.
**नगरसचिव :-** विष्णुभाऊ, रियाजभाई
**श्री.विष्णु भंगाळे :-** मान्य आहे, मान्य आहे.
**श्री.रियाज बागवान :-** मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रभाग क्रं.७ रिंगरोड लगत, हनुमान मंदीराचे शेजारी सर्व्हे नं.२४७ ओपनस्पेस येथे इनरव्हील क्लब ऑफ जळगांव ईस्ट ही संस्था स्वखर्चाने "जेष्ठ नागरीक कट्टा व वाचनालय" तसेच छोटासा बगीचा बनवणेस उत्सुक आहे. सदरील जागेची त्यांनतरही कायम देखभाल करणेस ते तयार आहेत. सदर वाचनालय, बगीचा व जेष्ठ नागरीक कट्टा यासाठी लागणारे संपुर्ण साहित्य

व त्यांचा खर्च संस्था करणार आहे. तसेच सदरील ओपनस्पेस वर सदयस्थितीत कचराकुंडी व परिसरातील कचरा पडुन असतो.

करिता सर्व्हे नं.२४७ रिंगरोड लगत हनुमान मंदिराशेजारी ओपन स्पेस ही जगा इनरव्हील क्लब ऑफ जळगांव ईस्ट या संस्थेस स्वखर्चाने डेव्हलप करणेस “जेष्ठ नागरीक कट्टा व वाचनालय” तयार करणेकामी व परिसरातील तसेच अभिन्यासातील नागरीकांसाठी सदैव खुली राहील या अटीवर तसेच मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी. तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम / शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- काळे दिपमाला मनोज**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४१)** मेहरुण, पिंप्राळा व शिवाजी नगर स्मशानभुमीचा विकास करणे व गॅस दाहिनी उभारणे, मेहरुण स्मशानभुमी ते जकात सोसायटी जवळील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे व रस्ता तयार करणे तसेच नाथ समाजाच्या स्मशानभुमीला लागुन रस्त्यावर पुल बांधणे इत्यादी विकास कामे करणेबाबत सन्मा.सभापती, स्थायी समिती,श्री. राजेंद्र झिपरु पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन बरडे:-** मान्यता आहे, विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया

**मा.महापौर:-** बोला विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया या विषयाला यापुर्वीही मान्यता मिळालेली आहे.

**मा.महापौर:-** विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो हो.

**मा.महापौर:-** विष्णुभाऊ आवाज येत नाहीये तुमचा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** या विषयाला अनुमोदन आहे.

**मा.महापौर:-** विष्णुभाऊ आवाज येत नाहीये तुमचा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो आता येतोय का.

**मा.महापौर:-** विष्णुभाऊ आवाज येत नाहीये तुमचा स्पिकर जवळ घ्या थोडा

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो जवळच आहे ताई

**मा.महापौर:-** विष्णुभाऊ बोला बोला

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो याला मान्यता देण्यात यावी .परंतू याच्या आधीसुध्दा असे ठराव झालेले आहेत. अशा मोघम ठरावामुळे पुन्हा पुन्हा त्याच गोष्टी आणण्याचे काम पडु नये अशी आमची आपणांस विनंती आहे. यापुर्वीही या गोष्टींचे ठराव झालेले आहेत. आता जो ठराव आहे तो मोघम ठराव दिलेला आहे

**नगरसचिव :-** रियाजभाई

**मा.महापौर:-** विष्णुभाऊ मंजुर आहे का?

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर आहे

**श्री.नितीन बरडे :-** मंजुर , मंजुर

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर, मंजुर

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मेहरुण स्मशान भुमी, पिंप्राळा स्मशानभुमी व शिवाजीनगर स्ममशानभुमी चा विकास करणे व गॅस दाहिनी उभारणेचे खालील १ ते ४ कामांना तसेच सदर कामी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) मेहरुण स्मशान भुमी, पिंप्राळा स्मशानभुमी व शिवाजीनगर स्मशानभुमी चा विकास करणे व गॅस दाहिनी उभारणे.
२) मेहरुण स्मशानभुमी ते जकात सोसायटी जवळील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे.
३) मेहरुण स्मशानभुमी ते जकात सोसायटी नाल्याला लागून पुर्वेकडील बाजूने रस्ता तयार करणे.
४) मेहरुण स्मशानभुमी जवळील नाथ समाजाच्या स्मशानभुमीला लागून असलेल्या रस्त्यावर पुल बांधणे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**
**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४२)** वार्ड क्र.१८ मेहरुण स.नं.२१/२ मध्ये आर.सी.सी. गटार व स्लॅब क्लव्हर्ट बांधणे कामी अंदाजित रक्कम रु.१५ लक्ष व सर्व्हे नं.१५ मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब क्लव्हर्ट बांधणे कामी अंदाजित रक्कम रु.२५ लक्ष मात्रचे कामे करुन मिळणेबाबत गटनेता,एम.आय.एम.,श्री. रियाज अहमद अब्दुल करीम बागवान यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे
**श्री.रियाज बागवान :-** सदर प्रस्ताव मान्य.
**सौ.सुन्नाबी देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.
**सौ.सुन्नाबी देशमुख :-** महापौर ताई
**श्री.नितीन बरडे :-** मंजुर , मंजुर
**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे
**सौ.सुन्नाबी देशमुख :-** महापौर ताई
**मा.महापौर :-** बोला, बोला ताई
**सौ.सुन्नाबी देशमुख :-** महापौर ताई रजा कॉलनीतला प्रस्ताव टाकलेला आहे तिन ढापे उसपे बढानेके है. और रक्कम उसमे बढाके देनी है उधरसे तिन ढापे बढानेके है गटार के उपरके
**मा.महापौर :-** ठिक है . ओके ओके.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, वार्ड नं.१८ मधील काही भागांमध्ये कच्च्या गटारी आहेत तसेच काही ठिकाणी गटारीच नाहीत. त्यामुळे परिसरातील सांडपाणी मोकळया जागेत तसेच रस्त्यावर जमा होवून परिसरात सतत दुर्गंधी होवून परिसरात घाणीचे साम्राज्य तयार होत आहे व सदर सांडपाणी रस्त्यावर आल्यामुळे त्यात डास व इतर जुंत तयार होत असून त्यामुळे वार्डातील नागरीकांचे आरोग्य सुध्दा धोक्यात आलेले आहे.

करिता १) प्र.क्रं.-१८ मेहरुण स.नं.२१/२ (सदाशिवनगर) मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणेकामी अंदाजीत रक्कम रु.१५ लक्ष तसेच (२) प्र.क्रं.-१८ मेहरुण अंतर्गत स.नं.१५ गणेशपूरी, इकरा

कॉलेज, साहील शॉपी रजा कॉलनीची शेवटची गल्ली परिसरात आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणेकामी येणाऱ्या अंदाजीत रक्कम रु.२५ लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम**

**अनुमोदक :- देशमुख सुन्नाबी राजु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४३)** प्र.क्र.१४ आदर्श नगर मधील स्वागत गेट ४ व जिवनमोती सोसा.येथे २ स्वागत कमानी हे कामे लोकवर्गणीतुन करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या.सौ.ज्योती शरद तायडे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर आहे

**मा.उपमहापौर :-** ढेकळे काका

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर

**श्री.विष्णु भंगाळे :-** मंजुर आहे

**श्री.रियाज बागवान :-** मंजुर आहे

**श्री.नितीन बरडे :-** मंजुर आहे

**श्री.रियाज बागवान :-** महापौर ताई एक विषय बोलना है.

**मा.महापौर :-** बोला बोला.

**श्री.रियाज बागवान :-** महापौर ताई एक विषय बोलना है आवारा कुत्तो के बारे मे बोलना था. वॉर्ड मे आवारा कुत्तो की संख्या बहुत ज्यादा बढ गयी है. ईससे पहले भी लोगोने कम्पंलेंट भी की है. सब कीया है और मा.उपायुक्त साहब से मिले भी थे हम इस संदर्भमे लेकीन उन्होने सॉलीड उसका कोई अन्सर नही दिया. और अभीतक उसपर कोई कार्यवाही नही हुई.

**मा.महापौर :-** ठिक है रियाजभाई

**श्री.रियाज बागवान :-** आवारा कुत्तो पर अपन कोई कारवाई नही कर पा रहे है

**मा.महापौर :-** ठिक है रियाजभाई आयुक्त साहब उत्तर देताहेत.

**मा.आयुक्त :-** सन्मा.महापौर, आपण याच्यामध्ये कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रीया करून हि भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठीचा प्रोजेक्ट आपण केलेला होता. त्याच्यासाठी आपण अमरावतीच्या एका संस्थेला कॉन्ट्रक्टही दिले होते त्यांच काम सुरू होते. लॉकडाऊनच्या पिरीयड मध्ये ते काम बंद झालं होत आता लॉकडाऊन नंतर आपण ते काम सुरू करायला आपण त्यांना परवानगी दिलेली होती. परंतू आपल्या येथे काम करणाऱ्या काही एनजीओ आहेत. ज्या प्राणिमित्र संघटना अशा स्वरुपात काम करतात. तर त्यांनी हे जे काही काम चालु होत त्याच्या संदर्भामध्ये Prevention of Animal Cruelity Act म्हणजे प्राणी क्रुलेज प्रतिबंधक कायदा याच उल्लंघन करून हि संस्था काम करते अश्या प्रकारची तक्रार हि केंद्र सरकारच्या अंडर एक संस्था ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया हि मला वाटत एक संस्था आहे कि ज्यांच या सगळया कामांवर नियंत्रण असतं आणि अश्या प्रकारच्या ज्या काही संस्था आहेत.त्यांना त्यांच्याकडुन लायसन्स दिल जातं. यांच्याकडे तक्रार केली आणि हि तक्रार आल्यानंतर त्यांनी महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांना असे आदेश पाठविलेले आहेत की या संस्थेच कामकाज त्या तक्रारीवरून असे दिसतेय की हे नियमाप्रमाणे चालु नाही. त्यामुळे हे काम बंद करण्यात यावं आणि याच्याबद्दलची रितसर चौकशी करावी.याच्यामध्ये आपण चौकशी केलेली आहे.त्याचही म्हणण ऐकुन घेतलेलं आहे.आता आपण याचा अनुभव विचारात घेतला तर यापुर्वी आपण अनेक निविदा काढल्या परंतू त्याला प्रतिसाद मिळत नव्हता. आता शहरामध्ये सध्या भटक्या कुत्र्यांचा जो त्रास आहे तो कमी करण्यासाठी हि नसबंदी शस्त्रक्रीया या चालु राहील्या पाहीजेत. आता याच्यासाठी आपण या चौकशी

अंती आपण दिल्लीला याचा प्रस्ताव पाठवतो आहे. या संस्थेला आम्ही केलेल्या कराराप्रमाणे आणि कायद्यातील तरतुदी प्रमाणे काम करण्याची संधी दिली पाहीजे.जेणेकरून कायद्याचेही पालन होईल. प्राणीमित्र संघटनांच्या तक्रारी राहणार नाहीत आणि महानगरपालिका क्षेत्रामधल्या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण आपल्याला शक्य होईल हा प्रस्ताव आपण पाठवतोय त्या प्रस्तावाला जर मान्यता दिली तर आपल्याला पुर्वी प्रमाणे काम करता येईल.जर दिल्लीच्या संस्थेने मान्यता नाकारली तर आपल्याला पुन्हा निविदा प्रक्रीया करून नविन संस्था नेमावी लागेल.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई

**ॲड . शुचिता हाडा :-** हा प्रस्ताव त्वरीत पाठवावा आणि

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई

**मा.आयुक्त :-** आपण प्रस्ताव पाठवतोय मला खात्री आहे की आपण जर त्याच्यामध्ये प्रयत्न जर केला तर हे काम नियमानुसार करण्याला परवानगी मिळु शकेल.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब ह्या तक्रारी

**ॲड . शुचिता हाडा :-** हा प्रस्ताव प्रशासनामार्फत त्वरीत पाठवण्याची दक्षता घेण्यात यावी अशी विनंती आहे प्रशासनाला प्रशासन चांगल काम करत आहे यासंदर्भात .निश्चितच मी प्रशासनाच अभिनंदन करेल तर हे ईमिजेट पाठवावं.

**श्री.रियाज बागवान :-** सर त्वरीत कार्यवाही करा.

**मा.महापौर :-** नगरसचिव साहेब सभा संपली राष्ट्रगीत सुरू करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी राष्ट्रगीतसाठी उभ राहायचे आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई , दोन मिनिटे थांबा, महापौर ताई

**राष्ट्रगीत सुरु करण्यात आले.**

**श्री.विष्णु भंगाळे :-** बोलुन टाक.

**श्री.रियाज बागवान :-** बोलदे बोल दे प्रशांत क्या बोलना है जल्दी

**श्री.प्रशांत नाईक :-** आयुक्त साहेब , वॉटरग्रेस कंपनीने कॉन्ट्रक्ट दिला आहे काय. आयुक्त साहेब तुम्हाला प्रश्न आहे की वॉटरग्रेस कंपनीने सबकॉन्ट्रक्ट दिला आहे काय ? दिला असल्यास त्याच्यावर कारवाई करणार का? आपण जी बँक बदललेली आहे जी दिव्य मराठीला बातमी आलेली आहे.वॉटरग्रेस कंपनीने साई मार्केटींग ला सोईसाठी बँक बदललेली आहे हि गोष्ट खरी आहे का? आयुक्त साहेब, याची माहिती द्यायची आहे आपल्याला महापौर ताई सत्ताधारी गटाने माहिती द्यायची आहे. आता पेपरला बातमी आहे कोणाच्या बाजुने उभे राहायचे आहे पालिका की वॉटरग्रेस कंपनी हे सत्ताधारी गटाने डिक्लीअर करायचं आहे. याच्यासाठी न्यायालयात जाणार का ? सत्ताधारी गटाने उत्तर द्यावे सत्ताधारी गट न्यायालयात जाणार का ? आयुक्त साहेब काही माहिती द्याल का? आता परवाच्या पेपरला होते. आयुक्त साहेब

**श्री.रियाज बागवान :-** सभा चालु है क्या हो गयी नितीनभाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** समजत नाहीये सभा चालु आहे की नाही सत्ताधाऱ्यांच वॉटरग्रेसमुळे नांव बंद आवाज बंद झालाये वॉटरग्रेसचं नांव काढल्यामुळे आयुक्तही सभागृहातुन पळालेले दिसतात. सभा सुरू आहे की बंद झाली

**श्री.नितीन बरडे :-** तुझा आवाज बंद कर प्रशांत

**श्री.प्रशांत नाईक :-** आपला आवाज कोणी बंद करू शकत नाही. आवाज शिवसेनेचा आवाज आहे.

**श्री.नितीन बरडे :-** कुणीच उत्तर देणार नाहीये

**श्री.प्रशांत नाईक :-** वॉटरग्रेस , वॉटरग्रेस ४४ नगरसेवक १५ हजार रूपयांच पाकीट मिळतय असं पेपरला वाचतोय आम्ही अभिषेक पाटील राष्ट्रवादीचे बोलतात ते पण मॅनेज झालेत असं वृत्तपत्रांमध्ये वाचताहेत.

**श्री.नितीन बरडे :-** अधिकारी पण आहेत त्याच्यात

**श्री.प्रशांत नाईक :-** वॉटरग्रेस

**श्री.नितीन बरडे :-** अधिकारी पण आहेत त्याच्यात

**श्री.रियाज बागवान :-** अपण तो तिनही दिख रहे है.

**श्री.नितीन बरडे :-** आवाज बंद केलाय कुणी बोलुच शकत नाही

**श्री.रियाज बागवान :-** राष्ट्रगीत चालु है की नही कोई भी नही दिख रहा है.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभा खतम हो गई बोले विशाल त्रिपाठी आले , चंद्रकांत पाटील आले

**श्री.रियाज बागवान :-** गोराणेसाहेब
**श्री.प्रशांत नाईक :-** वॉटरग्रेस , सभा संपली का? चंद्रकांतभाऊ पाटील डॉक्टर , वॉटरग्रेस , वॉटरग्रेस
**श्री.चंद्रशेखर पाटील :-** या जेवायला
**श्री.प्रशांत नाईक :-** वॉटरग्रेसच काय झाल पण
**श्री.चंद्रशेखर पाटील :-** जेवायला वेळेला सांगतो का या जेवायला
**श्री.प्रशांत नाईक :-** सत्ताधारी कोणाकडुन उभे राहणार आहेत डॉक्टरसाहेब
**सौ.सरिता नेरकर :-** राष्ट्रगीत चालु होतय
**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई , आयुक्त साहेब
**श्री.रियाज बागवान :-** कोणीच नाहीये.
**श्री.प्रशांत नाईक :-** आम्हाला कशाला ठेवताय येथे आम्हालाही बंद कराना

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, सन्मा.सदस्या.सौ.ज्योती शरद तायडे यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार प्र.क्र.१४ आदर्श नगर येथे ४ स्वागत कमानी तसेच जिवनमोती सोसायटी येथे २ स्वागत गेट लोकवर्गणीतून करणेस मनपाच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर ठिकाणी यापूर्वी स्वागत कमानी उभारणेस कोणास परवानगी दिली गेली नसल्याबाबत प्रशासनाने खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- तायडे ज्योती शरद**
**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**(भारती कैलास सोनवणे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**